
वसई धर्मप्रांत

जुलै २०२६

# सुवार्ता

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी



# BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD.

ESTD. 1918

(SCHEDULED BANK)

## BCCB GURU GAURAV LOAN

Supporting Teachers Who Shape Our Future!

## BCCB SAKHI LOAN

Empowering Women to Achieve their Dreams!

Unsecured Loan upto **5 Lakhs**

Interest Rate. **9.50%p.a.***

Tenure upto **60 Months**

Visit your Nearest BCCB Branch Today.

*T & C Apply

HO: Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy,
Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra.

Toll Free Number :
08069420000

## आता कार्ड न वापरता
## UPI वापरून ATM मधून पैसे काढा

BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD.

ESTD. 1918

(SCHEDULED BANK)

१. ATM मध्ये "UPI Cash Withdrawal"क्लीक करा.
२. अपेक्षित रक्कम टाका आणि "Proceed"करा.
३. स्क्रीनवरील "QR Code"स्कॅन करा.
४. तुमचा UPI PIN टाका.
५. "Proceed"वर क्लिक करा आणि तुमचे पैसे घ्या.



Bassein Catholic Bank ATM ला भेट द्या आणि BCCB UPI द्वारे कॅश काढण्याची ही सोपी सुविधा वापरा !

Toll Free Number :
08069420000

Follow Us.

Google Pay PhonePe Paytm

Design by Smartz Digiz

# सुवार्ता ८५२

## जुलै २०२६

**वर्ष ७१ / अंक १२ / मूल्य रु. २०/-**

**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

उपसंपादक : फा. रॉबर्ट गोन्साल्वीस

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट डिसोजा
फा. जॉन फर्गोज, फा. सॉलोमन रॉड्रिग्ज

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस,
नाझरेथ अथाईत, संदीप राऊत

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा

**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे

**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१ २०१.

**-: मोबाईल नंबर्स :-**

**'सुवार्ता' कार्यालय : 9702090231**

**जीवन दर्शन केंद्र : 9702090232**

**वेळ** : सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०
**रविवार बंद.**

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


### अंर्तनाद

**पोपमहोदयांचा जुलै महिन्यातील प्रार्थना हेतू**

**: मानवी जीवनाच्या आदर-सन्मानासाठी प्रार्थना :**



मानवी जीवन ही परमेश्वराची देणगी आहे हे ओळखून,मानवी जीवनाच्या सर्व अवस्थांमध्ये त्या जीवनाचा आदर करावा आणि सर्वांनी जीवनाचे संरक्षण करावे म्हणून आपण प्रार्थना करूया.



''मनात निर्माण होणाऱ्या गोंधळाच्या भोवऱ्यात सापडल्यास, बाप्तिस्म्याद्वारे मिळालेली श्रद्धा मला हमी देते: स्वत:च्या बळावर तू काहीच साध्य करू शकणार नाहीस,परंतु सर्व कृतींच्या केंद्रस्थानी परमेश्वराला ठेवलेस तर तू नक्कीच ध्येय गाठशील.''

**- पिएर जॉर्जिओ फ्रसाती**
(६ एप्रिल १९०१-४ जुलै १९२५)

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| | : अंतर्नाद | ३ |
| बिशप थॉमस डिसोजा | : अधिकृत - Magnifica Humanitas व कुटुंब | ४ |
| संपादक | : कुटुंब, कृत्रिम बुद्धिमत्ता, माग्निफिका ह्युमानितास | ६ |
| रॉबर्ट गोन्साल्वीस | : कृत्रिमतेची कौटुंबिक कसोटी | ८ |
| संकलन | : संपादकांस पत्रे | ९ |
| जॉन कोलासो व जॉन परेरा | : महापौर व उपमहापौर ह्यांची मुलाखत | १० |
| बिशप एडविन कोलासो | : महापाप | १५ |
| सिस्टर स्टेविना लोबो | : चिंता आणि नैराश्येचे मौन ओझे | १७ |
| फा. नितीन डिसोजा | : फ्रान्सिस्कन वारसा : कृपादानाचे जिवंत साक्षीदार | १९ |
| फा. ओनिल फरोज | : ओलाव्याच्या स्मृतीत परतणं | २१ |
| फा. जॉन मॅथ्यू फरोज | : संत इग्नेशियस लोयोलाची आध्यात्मिक साधना | २३ |
| फा. किरण लोपीस | : आई, मला भूक लागली! | २५ |
| मार्कुस डाबरे | : वसई किल्ला : पुरातत्त्व विभागाकडून दुरुस्ती | २७ |
| लॉईड मनवेल बुतेलो | : संत शारबेल मखलुफ | २९ |
| थॉमस ब्रिटो | : जेनेरिक औषधे | ३१ |
| लुकस ए. परेरा | : दीर्घायुषी निरोगी जीवनाचे रहस्य - इकिगाई | ३३ |
| डॉमिनिका डाबरे | : पाणी आंदोलनाची संघर्षगाथा | ४७ |
| फ्रँक मिरांडा | : पावसाळ्यात वसई पाण्याखाली का जाते? | ४९ |
| डॉ. सुभाष डिसोजा | : जागतिक निसर्ग संवर्धन दिन | ५१ |
| फा. ख्रिस्तोफर वाझ | : S.I.R. 2026 व मतदार मॅपिंग | ५३ |
| विल्यम गोन्सालविस | : आजच्या तरुणांपुढील आव्हाने | ६७ |
| स्मिता लोपीस डिकोष्टा | : बालक : सुरक्षिततेची अनिवार्यता | ६९ |
| कॅरल डिकोस्टा | : अनुकरण : आधुनिक समाजाचे वास्तव | ७० |
| सेल्मा अनिल डिकुन्हा | : ऐकण्याची क्रिया | ७१ |
| विजया डिसा | : एका हरवलेल्या व सापडलेल्या माणसाची कथा | ७३ |
| डॅनियल सांबऱ्या | : मच्छीमार निघाले देवदर्शनाला | ७४ |
| फा. बॉथम पाटील | : ख्रि. फादर एव्हरेस्ट फरेरा OFM Cap. | ७५ |
| बावतीस पेडीकर | : उद्योजक ख्रि. बॅप्टिस्ट ब्रिटो | ७७ |
| सुभाष डिसोजा, फा. ॲण्ड्र्यू डाबरे, जसिंटा डिसोजा, प्रतिभा कोलासो, सिडनी मोरायस, शिला डिकुन्हा, ब्रिनल क्रास्टो, फा. फिलीप वाझ, रुबी मच्याडो, आयरिन कोरिया, कॅथरिन फरगोज, उज्ज्वला लेमॉस, पिटर कर्नेल | : साद-प्रतिसाद : पालकांचा माझ्यावरील संस्कार | ७८ |
| ज्यो, ब्रिजदिन, जोसेफ, जेन | : कविता | ८३ |
| बॅप्टीस्ट वाझ | : माझे मत | ८४ |
| डॉ. सिसिलिया, स्टॅन्ली | : पुस्तक परिचय | ८५ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ८७ |
| संकलन | : वृत्तविहार | ८९ |
| अनिल घोन्साल्वीस | : 'सुवार्ता' शब्दकोडे - ११ | ९६ |
| फा. (डॉ.) जोएल डिकुना | : लक्ष्य : श्रद्धा व नीतिमत्त्व मानवतेसाठी | ९७ |
| धर्मप्रांतीय उपासना आयोग | : उपासना वर्ष दिनदर्शिका : जुलै २०२६ | ९८ |

# Magnifica Humanitas च्या प्रकाशात
# कौटुंबिक जीवन : आजची आव्हाने आणि देवाची हाक

आपल्या काळाच्या क्षितिजावर अनेक चिन्हे दिसत आहेत. विज्ञानाची प्रगती अभूतपूर्व आहे; कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करीत आहे. संवादाची साधने अधिक वेगवान झाली आहेत; परंतु एक प्रश्न आपल्या अंत:करणाला अस्वस्थ करतो : मानवजातीने यंत्रांना अधिक बुद्धिमान बनविले, पण कुटुंबांना अधिक प्रेमळ बनविले का? आजचे कौटुंबिक जीवन अनेक बदलांच्या वळणावर उभे आहे. तंत्रज्ञानाची प्रगती, कामकाजाच्या बदलत्या स्पर्धा आणि नातेसंबंधांतील दुरावा ह्या सगळ्यांमुळे कुटुंब हा समाजाचा मूलभूत आधार असलेला घटक अधिकच संवेदनशील झाला आहे. अशा काळात कुटुंबाबद्दल केवळ सामाजिक संस्थेप्रमाणे नाही, तर प्रेम, श्रद्धा, त्याग, संवाद आणि जबाबदारी ह्यांचे पवित्र स्थान म्हणून पुन्हा विचार करणे अत्यावश्यक ठरते. कुटुंब ही फक्त एक सामाजिक रचना नाही; ती मानवी प्रतिष्ठेची पहिली वेदी, प्रेमाची पहिली शाळा आणि विश्वासाची पहिली पायरी आहे.



पोप लिओ ह्यांचे पहिले परिपत्रक *'Magnifica Humanitas'* मानवी व्यक्तीचे रक्षण, विशेषत: कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात, ह्यावर भर देते. कोणतेही तंत्रज्ञान मानवी व्यक्तीच्या प्रतिष्ठेपेक्षा मोठे नाही. आज प्रत्येक ख्रिस्ती कुटुंबाला जागृत करणारा हा संदेश आहे, देवाचा आवाज आहे. तंत्रज्ञान कितीही पुढे गेले, तरी माणूस देवाच्या प्रतिमेत निर्माण झालेला आहे आणि म्हणूनच कुटुंबाचे मोल कोणत्याही यंत्रापेक्षा महान आहे. कुटुंबाकडे पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट होते : यंत्रने वाढत असताना माणूस कमी होऊ नये. माहितीचा वेग वाढत असताना संवादाचा अर्थ हरवू नये. सुविधा वाढत असताना आपुलकी कमी होऊ नये. आज अनेक घरांत प्रत्येकाकडे मोबाईल आहे; पण मनमोकळा संवाद नाही. प्रत्येक जण 'कनेक्टेड' आहे; पण अनेकदा 'जोडलेला' नाही. ह्या दुर्दैवी परिस्थितीतून आजच्या कौटुंबिक जीवनाची खरी परीक्षा सुरू आहे.

पवित्र शास्त्र म्हणते, ''प्रभू घर बांधीत नाही, तर बांधणाऱ्यांचे श्रम व्यर्थ'' (स्तोत्र १२७:१) यहोशवा धीराने जाहीर करतो : ''माझ्या घरी व माझ्या कुळात आम्ही परमेश्वराची सेवा करू'' (यहोशवा २४:१५) आणि प्रभू येशू विवाहाविषयी अंतिम वचन देतो : ''देवाने जे जोडले आहे ते मनुष्याने तोडू नये'' (मत्तय १९:६). म्हणून कुटुंब हे केवळ सहवास नाही; ते देवाच्या इच्छेने उभे राहिलेले पवित्र ऐक्य आहे. जे घर प्रार्थनेवर उभे राहत नाही, ते जगाच्या वादळांपुढे थरथरते. आज अनेक घरे सुंदर आहेत, पण त्यात शांतता नाही; अनेक कुटुंबे आर्थिक दृष्ट्या संपन्न आहेत, पण प्रेमाच्या बाबतीत गरीब आहेत; अनेक जण डिजिटल जगात हजारो लोकांच्या संपर्कात आहेत, पण स्वत:च्या कुटुंबापासून तुटलेले आहेत. हा काळाचा विरोधाभास आहे. आपण मुलांना नवीन तंत्रज्ञान शिकवत आहोत; पण त्यांना प्रार्थना शिकवत आहोत का? आपण त्यांना स्पर्धा शिकवत आहोत; पण करुणा शिकवत आहोत का? आपण त्यांना यशाची भाषा शिकवत आहोत; पण त्यागाची भाषा शिकवत आहोत का? देवाचा आत्मा आज समाजाला आणि प्रत्येक कुटुंबाला हाक देत आहे.

Amoris Laetitia च्या प्रकाशात कुटुंबाला आदर्श म्हणून नव्हे, तर कृपेने घडणारे जिवंत वास्तव म्हणून पाहिले जाते. त्यासाठी कुटुंबाच्या पुढील गरजांकडे लक्ष केंद्रित करू या.

कुटुंबातील पहिली आणि सर्वांत मोठी गरज म्हणजे संवाद. केवळ बोलणे नव्हे, तर ऐकणे. नवरा-बायको, पालक-अपत्ये, आजी-आजोबा, भाऊ-बहीण ह्या सर्व नात्यांमध्ये प्रेमाचा पाया संवादानेच मजबूत होतो. एकाच घरात राहणारे लोक एकमेकांशी बोलत नाहीत. स्क्रीन उजळल्या आहेत, पण अंत:करणे अंधारलेली आहेत. घरातील माणसे एकमेकांशी संवाद करत नाहीत तेव्हा गैरसमज वाढतात आणि गैरसमज वाढले की प्रेमाऐवजी संशय येतो. म्हणूनच कुटुंबात रोज काही क्षण तरी एकत्र बसणे, एकमेकांचे दिवस जाणून घेणे, प्रार्थना करणे आणि कृतज्ञतेने बोलणे ही साधी दिसणारी पण अत्यंत आवश्यक कृती आहे.

कुटुंबातील दुसरी गरज म्हणजे वेळेचे पावित्र्य. आज अनेक कुटुंबे धावपळीच्या जीवनात अडकलेली आहेत. काम, प्रवास, शाळा, परीक्षा, करिअर, आर्थिक गरजा ह्यांमुळे घर एक निवासस्थान बनते आणि घरपण कमी होते. कुटुंब म्हणजे केवळ एकत्र राहणे नव्हे, तर एकमेकांसाठी वेळ देणे. प्रेमाची भाषा वेळेतूनच प्रकट होते. ज्याला वेळ दिला जातो, त्याला आपलेपणा जाणवतो आणि ज्याला आपलेपणा जाणवतो, तोच जीवनात सुरक्षित आणि स्थिर वाढू शकतो. आर्थिक संकटापेक्षा

मोठे संकट म्हणजे आध्यात्मिक दारिद्र्य. संदेष्टा होशेयाचे शब्द आजही तितकेच खरे आहेत : ''माझे लोक माझ्या ज्ञानाच्या अभावामुळे नष्ट होत आहेत'' (होशेय ४:६). ज्या घरात देवाला स्थान नाही, देवासाठी वेळ नाही तेथे शेवटी भीती, असुरक्षितता आणि गोंधळ प्रवेश करतात.

कुटुंबातील तिसरी गरज म्हणजे नैतिक आणि आध्यात्मिक आधार. आजची संस्कृती सांगते : ''स्वत:ला प्रथम ठेवा.'' ख्रिस्त म्हणतो : ''जो माझा शिष्य होऊ इच्छितो त्याने स्वत:चा त्याग करावा'' (लूक ९:२३). त्यागाशिवाय प्रेम टिकत नाही. आजच्या जगात मूल्यांची गडबड झाली आहे. चांगले-वाईट, टिकणारे-क्षणिक, सत्य-प्रचार, प्रेम-आकर्षण ह्यांत फरक करणे कठीण झाले आहे. अशा वेळी कुटुंबाने मुलांना फक्त शैक्षणिक दृष्ट्या यशस्वी करणे पुरेसे नाही; त्यांना सज्जन, संवेदनशील, सत्यनिष्ठ आणि देवाभिमुख बनवणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रार्थना, वाचन, संस्कार, सेवा आणि संयम ह्या मूल्यांमधूनच कुटुंबामध्ये ख्रिस्ती जीवनाची गोडी निर्माण होते. विवाह साक्रामेंत भावनांवर नाही, तर वचनांवर उभा असतो. कुटुंब सोयीवर नाही, तर निष्ठेवर उभे असते. संत जॉन पॉल दुसरे ह्यांनी चेतावणी दिली होती : ''कुटुंब हे जीवन आणि प्रेमाचे अभयारण्य आहे.'' आज हे अभयारण्य अनेक शक्तींनी वेढले आहे. म्हणून कुटुंबांना आध्यात्मिक जागृतीची, नैतिकतेची गरज आहे.



कुटुंबातील चौथी गरज म्हणजे क्षमाशीलता. कोणतेही कुटुंब परिपूर्ण नसते. मतभेद होतात, चुका होतात, अपेक्षा पूर्ण होत नाहीत. पण कुटुंब टिकते ते परिपूर्णतेमुळे नाही, तर क्षमेमुळे. क्षमा म्हणजे दुर्बलता नव्हे; ती प्रेमाची सर्वोच्च शक्ती आहे. घरात क्षमा असेल, तर कटुता कमी होते. घरात नम्रता असेल, तर अहंकार मागे पडतो. घरात सहनशीलता असेल, तर संकटेही संधी बनतात. प्रेम असेल, तर क्षमा असेल; क्षमा असेल, तर पुनर्मीलन असेल आणि पुनर्मीलन असेल तर घर मंदिर बनेल. मदर तेरेसा म्हणत असत : ''तुम्हाला जगात शांतता आणायची असेल, तर आपल्या कुटुंबावर प्रेम करा.'' संत ऑगस्टीनची आठवणही आज तेजाने झळकते. शांती म्हणजे 'ranquility of order' - सुव्यवस्थेची शांतता. आपले भविष्य तंत्रज्ञानात नाही, आपले भविष्य संपत्तीत नाही; आपले भविष्य राजकारणात नाही; तर आपले भविष्य ईश्वरामध्ये आहे. आज पवित्र आत्मा आपल्याला सांगत आहे : ''पाहा, मी सर्व काही नवीन करीत आहे'' (प्रकटीकरण २१:५).

जागे होऊ या! विश्वास पुन्हा प्रज्वलित करू या! प्रार्थनेची वेदी पुन्हा उभारू या! प्रेमाचे दरवाजे पुन्हा उघडा! कारण जेव्हा कुटुंबे नूतनीकृत होतात, तेव्हा समाज नूतनीकृत होतो; जेव्हा समाज नूतनीकृत होतो, तेव्हा राष्ट्र नूतनीकृत होते आणि जेव्हा राष्ट्र नूतनीकृत होते, तेव्हा देवाचे राज्य अधिक स्पष्टपणे प्रकट होते. आजचा काळ निराशेचा नाही; तो पुनर्बांधणीचा काळ आहे. प्रभू घर बांधत आहे. जर आपण आपल्या कुटुंबात त्याला प्रवेश दिला, तर तो भग्न भिंती उभ्या करील. थकलेल्या हृदयांना बळ देईल आणि विखुरलेल्या नात्यांना एकत्र बांधील. म्हणून प्रत्येक घरातून आज हा जाहीरनामा उठवू या : ''आमच्या कुटुंबात आणि आमच्या घरी आम्ही परमेश्वराचीच सेवा करू.'' हाच कौटुंबिक जीवनाचा खरा मार्ग आहे, हाच समाजाचा श्वास आहे आणि हाच *'Magnifica Humanitas'* ह्या पोप लिओ ह्यांच्या पहिल्या परिपत्रकाचा आत्मा आहे.

**+ बिशप थॉमस डिसोजा**

## आगामी कार्यक्रम


**ब्र. लिरॉन डिकुना** (ज्योती, आगाशी)
ह्यांचा उपगुरुदीक्षा विधी (डायकनेट)
**बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या शुभहस्ते**
ज्योती माता चर्च, ज्योती (आगाशी)
**सोमवार २९ जून रोजी संध्याकाळी ६.०० वाजता**

**शनिवार ४ जुलै संध्याकाळी ४.०० वाजता**
**ईशपरिज्ञान अभ्यासक्रमाचा शुभारंभ**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज
ईशपरिज्ञान अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना
बिशपांच्या हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येतील

संपादकीय

# कुटुंब, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माग्निफिका ह्युमानितास

विचारवंतांना चर्चच्या नेतृत्वामध्ये जास्त आवडणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या पूर्वसुरींच्या नेतृत्वाप्रति असलेला सकारात्मक दृष्टिकोन. म्हणजे पूर्वसुरींच्या सेवेची दखल घेणे आणि नंतर, सध्याच्या परिस्थितीशी संबंधित आपले विचार दस्तऐवजांद्वारे मांडणे, उदाहरणार्थ, पोप तेरावे लिओ ह्यांनी औद्योगिक क्रांती, कामाची प्रतिष्ठा आणि गरिबांसाठी पर्याय आदी आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी 'रेरुम नोव्हारुम' ('नवीन गोष्टी', १५ मे १८९१) हे विश्वपत्रक प्रकाशित केले. त्यानंतरच्या पोपनी 'रेरुम नोव्हारुम' [RN] चे महत्त्व सिद्ध करणे सुरू ठेवले : पोप अकरावे पायस ह्यांनी 'क्वाड्राजेसिमोस आन्नो' ('४०व्या वर्षात', १९३१), पोप तेविसावे जॉन ह्यांनी 'मातेर एत मजिस्त्रा' ('आई व शिक्षिका', १९६१),पोप सहावे पॉल ह्यांनी 'ऑक्टोजेसिमा ॲडव्हेनिएन्स' ('८०व्या वर्धापनदिनानिमित्त', १९७१) आणि पोप द्वितीय जॉन पॉल ह्यांनी 'सेंटेसेमुस आन्नो' ('१००वे वर्ष', १९९१) लिहिले.




### कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence)

आधुनिक जगातील 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) मुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी, पोप चौदावे लिओ ह्यांनी RN च्या १३५व्या वर्धापनदिनानिमित्त *Magnifica Humanitas* ('भव्य मानवता', १५ मे २०२६) हे ऐतिहासिक विश्वपत्रक (Encyclical) जारी केले आहे. अलीकडच्या काळातील 'एआय'चा विकास तंत्रज्ञानामुळे झाला. ते संगणकांना मानवी बुद्धिमत्ता व समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचे अनुकरण करण्यास सक्षम करते; हे कार्य संगणक स्वतंत्रपणे किंवा इतर तंत्रज्ञानांच्या जोडीने करू शकते.

'एआय' (AI) ची सुरुवात १९००च्या सुरुवातीला झाली, तेव्हा त्याला 'कृत्रिम मेंदू' (artificial brain) असे म्हटले जात असे. 'कृत्रिम लोक' (artificial people) ही संज्ञा मूलत: १९२१ मध्ये झेक नाटककार, कारेल चापेक ह्यांनी वापरली होती. १९५५मध्ये 'एआय' ही संज्ञा तयार करण्याचे श्रेय जॉन मॅकार्थी ह्यांना दिले जाते. हे तंत्रज्ञान वैयक्तिक निवडी, समूह मानसिकता आणि कौटुंबिक जीवन ह्यांना नव्याने आकार देते; तसेच ते प्रशासकीय साहाय्यक आणि अध्ययनातील सोबती म्हणून काम करते, व्यक्तींना वैयक्तिक ओळख नसतानाही सल्ला देऊ शकते. कौटुंबिक आणि घरगुती बाबींमध्येही 'एआय' मदत करते, अर्थात 'एआय'ला काही मर्यादाही आहेत :

### कुटुंब आणि 'एआय'चे फायदे

मुळात, 'कुटुंब' म्हणजे पालक आणि मुले, तर 'संयुक्त कुटुंब' मध्ये आजी-आजोबा, आजारी व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती इत्यादींचा समावेश होतो. पूर्वीचा समाज 'जेवढे जास्त तेवढे चांगले' ह्यावर विश्वास ठेवत असे, तरीही 'जेवढे कमी तेवढे चांगले' ह्यावर तो समाधानी होता.

त्यामुळे वैयक्तिक पातळीवर, एआय घरगुती व्यवस्थापन, परस्पर मदत, दुर्बळ आणि अशक्तांना पूरक ठरणे शक्य करते. ते भाषांतर, रूपांतर इत्यादींसाठी उपयुक्त ठरले. कुटुंबातील एक सदस्य म्हणून एआय स्क्रीन टाइम, गोपनीयता व मानवी सहानुभूती जपण्याची गरज ह्यांसारखी आव्हाने देखील हाताळते. ते पालकांना वेळापत्रक व्यवस्थित करण्यास, कौटुंबिक संवादासाठी वेळ काढण्यास, आधार देण्यास आणि वेळेवर सुधारणा करण्यास मदत करते. एआय काही अडथळे दूर करून सुलभता वाढवते. त्यामुळे बहुभाषिक वा दिव्यांग कुटुंबांतील सदस्य संवाद साधू शकतात. सहकार्यासाठी व्यापक दृष्टिकोन विकसित करू शकतात आणि साक्षरतेसाठी एकत्रितपणे कार्य करू शकतात.

### कुटुंबासाठी एआय (AI) च्या मर्यादा

तंत्रज्ञानावर अति-अवलंबित्व, मुलांमधील भावनिक पातळी, परस्पर संबंधांची जाणीव व संयम विकसित करण्याच्या क्षमतेत अडथळा आणू शकते. सहानुभूती किंवा संवेदना कमी झाल्यामुळे कुटुंबातील व्यक्तींचा विकास असंतुलित होऊ शकतो आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व अपूर्ण बनू शकते. एआयच्या विविध सुविधा मुलांच्या भावना व संवेदनशीलतेसाठी घातक ठरू शकतात. ही पालकांसाठी चिंतेची बाब आहे. ह्यात वास्तवाला मृगजळ आणि सत्याला केवळ एक 'पर्याय' म्हणून सादर केले जाऊ शकते. त्यामुळे शाश्वत मूल्ये व सद्‌गुण हे कालबाह्य वाटू लागण्याची दाट शक्यता असते. एआय प्रणाली कौटुंबिक माहितीचे रक्षण करण्याच्या बहाण्याने खाजगी विश्वास प्रवेश करू शकतात आणि मौल्यवान माहिती हस्तगत करू शकतात; ह्यामुळे वैयक्तिक व कौटुंबिक संबंधांवर, तसेच शेजारी व हितचिंतकांशी असलेल्या नात्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, नातेसंबंध दृढ करण्याऐवजी एआय हे पालक, शिक्षक आणि अगदी ईश्वराची जागा घेण्याचा प्रयत्न करू शकते. ह्यात अध्यात्माची गरज नाही असे भासवले

जाऊ शकते आणि आध्यात्मिक अनुभव व अनुभूतींचे महत्त्व कमी लेखले जाऊ शकते.

### एआय AI च्या युगात कुटुंबाचे रक्षण व संरक्षण

एआयकडे दुर्लक्ष करून किंवा त्यापासून दूर राहून चालणार नाही, तसेच त्याला अवास्तव महत्त्वही देता कामा नये. त्याऐवजी, एआयला 'मालक' न मानता 'सेवक' म्हणून हाताळावे, आदी बाबी कुटुंबे हाताळू शकतात. शिक्षणासोबतच संस्कृती, मूल्ये आणि सद्‌गुणांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. सत्य आणि असत्य, तसेच वास्तव आणि आभास ह्यांमधील फरक ओळखण्यासाठी 'अंतरात्म्याचा आवाज' जागृत व विकसित करणे गरजेचे आहे. कृत्रिम स्वरूप बऱ्याचदा आकर्षक असते; त्यामुळे, 'मूल्यांची श्रेणी' (Hierarchy of Values) निश्चित करण्यासाठी अस्सलपणा, विश्वासार्हता आणि सर्जनशीलता ह्यांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. कृत्रिम बुद्धिमत्तेपासून खरी बुद्धिमत्ता ओळखण्याची, वेगळी करण्याची आणि सत्य-पावित्र्य-सौंदर्य ह्याची पारख करण्याची क्षमता विकसित करायला हवी; कारण आपल्या निवडीची फळे व परिणामच पारख केलेल्या बाबींची साक्ष देतील. त्यासाठी (१) कौटुंबिक प्रार्थना, (२) व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून वैयक्तिक लक्ष देणे, (३) विश्वास ठेवणे पण त्याचबरोबर खात्री करणे, (४) सर्वांसमक्ष कौतुक व एकांतात चूक सुधारणे, (५) प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी सामूहिक शहाणपणाचा वापर, (६) मार्गदर्शक/आध्यात्मिक गुरु/वेळोवेळी मूल्यमापन आदी गोष्टी एआयचा सरसकट निषेध करण्याऐवजी त्याचा लाभ घेण्यास लाभदायी ठरू शकतात.


### माग्निफिका ह्युमानितास [MH]

पोप लिओ ह्यांनी 'माग्निफिका ह्युमानितास' (MH) ह्या विश्वपत्राचा 'भव्य मानवता' हा विषय पाच प्रकरणे आणि २४५ मुद्द्यांद्वारे सविस्तर सादर केला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात त्यांनी मानवी व्यक्तिमत्त्व, सत्य, कार्य आणि स्वातंत्र्य ह्या मूल्यांवर विशेष भर दिला आहे. ह्यात बायबलमधील दोन प्रतिमांचा प्रामुख्याने उल्लेख आहे : (i) 'बाबेलचा मनोरा' (उत्पत्ती ११:१-९) हा स्वत:चे वर्चस्व गाजवण्याची वृत्ती, एकसारखेपणा, नियंत्रण, अहंकार आणि स्पर्धा ह्यांचे प्रतीक आहे आणि (ii) नेहेम्याच्या नेतृत्वाखाली जेरुसलेमच्या भिंतीची एकत्रितपणे पुनर्बांधणी (नेहेम्या २-६) ही परस्पर सहभाग व एकतेच्या उद्देशाने केलेल्या प्रार्थनापूर्ण व सामुदायिक प्रयत्नांचे प्रतीक आहे. ह्या दिव्य शिकवणुकीवर 'माग्निफिका ह्युमानितास' आधारित आहे तद्‌वत स्त्री व पुरुषाची निर्मिती ही देवाच्या 'प्रतिमेत आणि सादृश्यात' (उत्पत्ती १:२६-२७) झाली आहे हे अधोरेखित करते व ख्रिस्ताकडे निर्देश करते : 'देह धारण केलेले वचन' आहे आणि त्यात मानवतेचे रहस्य स्पष्ट होते (MH १). पोप लिओ 'गुण-संपत्तीच्या दृष्टान्ता'चा (मत्तय २५:१४-३०) संदर्भ देतात, ''वैज्ञानिक शोध ही मानवतेला सोपवलेली देणगी आहे, तिचा उपयोग करून फलदायी कार्य करावे'' (MH ९). ह्या विधायक दृष्टिकोनाची परिणती 'नव्या जेरुसलेम'मध्ये होते, ''देवाकडून, स्वर्गातून खाली येत आहे'' (प्रकटीकरण २१:२) आणि ''संपूर्ण मानवजातीसाठी एक देणगी'' आहे (MH १०).

### कुटुंब आणि MH

'सार्वजनिक हिता'च्या (Common Good) निर्मितीत योगदान देण्यासाठी कोणीही कमकुवत नसते, ह्यावर भर देत पोप लिओ हे संत पॉल ह्यांचे ''सामर्थ्य दुर्बलतेमध्येच पूर्णत्वास येते'' (२करिंथकर १२:९) हे वचन ठासून सांगतात (MH १३).

MH मध्ये ''पहा, मी एक नवीन गोष्ट घडवत आहे'' (यशया ४३:१९) ह्या वचनाचा संदर्भ दिला आहे. अगस्टीनियन पोप लिओ संत अगस्टीन ह्यांचे सुपरिचित शब्द उद्धृत करतात : ''हे प्रभू, तू आम्हाला तुझ्यासाठीच निर्माण केले आहेस आणि जोपर्यंत आमचे हृदय तुझ्यामध्ये विसावत नाही, तोपर्यंत ते अस्वस्थ राहते.''



MH मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतच्या चिंतांची नोंद आहे : नोकरीची असुरक्षितता आणि असमानता (MH १५१), माहितीचा फेरफार किंवा गोपनीयतेचे उल्लंघन (MH १०२), वैचारिक पूर्वग्रह व स्वायत्त शस्त्रप्रणाली (MH १९७) आणि 'सुधारित मानवा'ची भविष्यकालीन संकल्पना (MH ११५). (MH स्पष्ट करते की मानवी 'मर्यादा' वाटणाऱ्या गोष्टी 'दुर्बलता, आजार, वृद्धत्व, दु:ख व असुरक्षितता' ह्यांच्याकडे केवळ 'सुधारली जाण्यासारखी त्रुटी' म्हणून पाहू नये. उलट, मानवतेचे वैभव यात आहे की आपण आपल्या मर्यादा असूनही, अनेकदा त्या मर्यादांच्या माध्यमातूनच समृद्ध होतो (MH ११८). अशा कमजोर क्षणांमध्ये आपण ''नवीन शहाणपण शोधू शकतो, इतरांचा जिव्हाळा प्रत्यक्ष अनुभवू शकतो व प्रभूच्या उपस्थितीचा लाभ घेऊ शकतो'' (MH ११९). म्हणूनच, AI च्या मानवी मर्यादांतून सुटका करून घेण्याच्या मोहाऐवजी, 'मोकळेपणा व परस्पर सहजीवना' च्या धारणेचा आधार घेऊन, मानवतेच्या 'सामूहिक हिता'साठी AI द्वारे कार्य करायला हवे (MH २३१).

AI चा वापर विवेकाने आणि सदसद्‌विवेकबुद्धीने करण्यासाठी बुद्धी शाबूत ठेवण्यास आणि सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोप लिओ करीत आहेत.

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

# कृत्रिमतेची कौटुंबिक कसोटी

**-फा. रॉबर्ट जोसेफ गोन्साल्वीस**
फातिमा माता चर्च, चुळणे

कृत्रिम बुद्धिमत्ता AI (Artificial Intelligence) दिवसेंदिवस मानवी जीवनाचा अवकाश व्यापत आहे. जसजसा त्याचा पैस पसरत आहे तसतसा कौटुंबिक जीवनावर होणारा त्याचा परिणामही. आधुनिक पिढीला पडलेल्या ह्या स्वप्नात भुरळ घालणाऱ्या अनेक जमेच्या बाबी आहेत. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, अभ्यासातील शंका निरसन, संशोधन व विविध भाषा शिकण्यासाठी AI उपयुक्त ठरत आहे. प्रौढांना घरगुती व्यवस्थापनासाठी, वेळापत्रक तयार करण्यासाठी, आर्थिक नियोजनासाठी, आरोग्याच्या नोंदीसाठी; तसेच, रोग्यांना औषधांच्या वेळांची आठवण करून देण्यासाठी साहाय्यभूत ठरते आहे. वृद्धांच्या बाबतीत त्यांच्या काटेकोर आरोग्य निरीक्षणासाठी व संबंधितांना आपत्कालीन सूचना देण्यासाठी उपयोगी पडत आहे. प्रसंगी थकल्या-भागल्या जिवाचा क्षीण घालविण्यासाठी विरंगुळा व एकटेपणा कमी करण्यासाठी संवादाची अनेकविध माध्यमे उपलब्ध करून देण्याची क्षमताही AI मध्ये आहे. तथापि, AI जितकी उपयुक्त आहे तितकीच तिच्या वापराबाबत सावधगिरीचीही गरज आहे. कारण, AI - आधारित साधने आणि डिजिटल माध्यमांचा अतिरेकी वापर प्रत्यक्ष मानवी संवाद, संपर्क व सहवास कमी करतो आहे.




तथापि, एक गोष्ट आजवर आपल्याला ठाऊक झाली आहे की कोणतेही तंत्रज्ञान कधीच पूर्णपणे तटस्थ नसते. त्यामागील मानवी मूल्ये, सामाजिक उद्दिष्टे, व्यावसायिक हितसंबंध आणि सत्तासंबंध त्याच्या वापराला दिशा देतात. त्यामुळे AI ने मानवाची सेवा केली पाहिजे; मानवाने AI ची नाही. मानवी प्रतिष्ठा, कामाचे मूल्य, सामाजिक न्याय, सत्य आणि शांतता ह्यांचे रक्षण हे कोणत्याही तांत्रिक प्रगतीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. ह्या पार्श्वभूमीवर AI मध्ये संधी आहेत तितकीच आव्हाने आहेत आणि ती सर्व मानवी नात्यांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करणारी आहेत हे एव्हाना तर्कशुद्ध विचार करणाऱ्या बहुतेकांना कळून चुकले आहे.

AI मुळे माहिती मिळवणे सोपे झाले असले तरी परस्पर समजूत, सहानुभूती आणि संयम ह्यांसारखी मूल्ये केवळ तंत्रज्ञानातून विकसित होत नाहीत. म्हणूनच, AI कितीही प्रगत झाली तरी काही गोष्टी ती कधीही बदलू शकणार नाही. आईच्या मायेचा स्पर्श, वडिलांचे आश्वासक संरक्षण आणि आजी-आजोबांच्या अनुभवकथा, भावंडांचे प्रेम, वरिष्ठांचे मार्गदर्शन, मित्रत्व, त्याग, क्षमा आणि नि:स्वार्थ प्रेम - ह्या सर्व मानवी अनुभवांना कृत्रिम तांत्रिक पर्याय असू शकत नाही. AI माहिती देऊ शकते; पण ती खऱ्या अर्थाने प्रेम करू शकत नाही. ती सल्ला देऊ शकते; पण दु:खात खांद्यावर हात ठेवून आधार देऊ शकत नाही. ती शब्द निर्माण करू शकते; पण हृदयातून उमटणारी वेदना व करुणा निर्माण करू शकत नाही. ही गरज कोणतेही यंत्र पूर्ण करू शकत नाही. म्हणून AI कौटुंबिक व मानवी नात्यांना बळकट करण्यासाठी वापरली गेली पाहिजे, त्यांची जागा घेण्यासाठी नव्हे.

AI अपरिहार्य मदतनीस, उपयुक्त सेवक आहे. पण एखाद्याच्या अविचारी कृतीमुळे तीच AI असुरक्षित, अपायकारक व धोकादायक मालक ठरू शकते ह्याचे भान ठेवलेच पाहिजे. कारण, AI एखाद्याला उठवू शकते पण जागवू शकत नाही. औषधांच्या वेळेचे स्मरण देऊ शकते पण औषधे देऊ शकत नाही. पाककृती सादर करू शकते पण आई-आजीसारखा दीर्घकाळ जिभेवर रेंगाळणाऱ्या चवीचा कदापि स्वयंपाक करू शकणार नाही. थोडक्यात AI मानवी जीवनासाठी पूरक ठरू शकते, पर्याय नाही.

कौटुंबिक नात्यांचा पाया हा विश्वास, उपस्थिती आणि परस्पर बांधिलकी ह्यांवर उभा असतो. मुलांना केवळ ज्ञानाची नाही तर प्रेमाची, सुरक्षिततेची आणि आदर्शाची गरज असते. AI मुलांना शिकवू शकते, माहिती देऊ शकते, संस्कार देऊ शकत नाही. घरातील कामे सुलभ करू शकते; पण ती प्रेमळ आई होऊ शकत नाही, अपयशाने खचलेल्या मुलाला दिलासा देणारे किंवा नैतिक जबाबदारी स्वीकारून कुटुंबासाठी त्याग करणारे वडील होऊ शकत नाही. आनंद साजरा करणारे संगीत वाजवू शकेल मात्र दु:खात आधार देणारा मित्र होऊ शकत नाही. कारण कृत्रिम

प्रज्ञेची ही उधळण विजेच्या चालीवर व इंटरनेटच्या वेगावर स्वार होऊन येते. ह्याउलट, कुटुंबातील नातेसंबंध हे डेटावर नव्हे; तर विश्वास, करुणा, क्षमा आणि प्रेमावर उभे असतात. म्हणूनच AI च्या युगात सर्वांत मोठे आव्हान तंत्रज्ञान निर्माण करणे नाही; तर मानवीपणा जपणे हे आहे. म्हणूनच, *'Magnifica Humanitas'* मध्ये पोप लिओ चौदावे, 'Remain Human' - 'मनुष्य म्हणूनच राहा' - हा मूलभूत संदेश देतात.

> **कृत्रिम बुद्धिमत्तेने मानवाची सेवा केली पाहिजे; मानवाने कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) नाही.**

AI उपयुक्त आहे त्यात वाद नाही. मात्र त्यातील लपलेला धोकादेखील आपण ओळखला पाहिजे. जसजसे आपण AI वर अधिक अवलंबून राहू, तसतशी आपली विचारशक्ती, सर्जनशीलता, चिकित्सक दृष्टिकोन आणि समस्या सोडवण्याची क्षमता कमी होत जाईल. मानवी मेंदूच्या विलक्षण बुद्धिमत्तेने AI निर्माण केले; पण जर आपण स्वत:ची बुद्धी वापरणे थांबवून प्रत्येक काम आणि निर्णय यंत्रांवर सोपवू लागलो, तर आपण आपल्या स्वत:च्या निर्मितीचे बाहुले बनू. AI हे माणसाच्या हातातील साधन राहिले पाहिजे; माणूस AI च्या हातातील साधन बनता कामा नये. अन्यथा, हळूहळू आणि नकळत, ते आपल्यातील माणूसपणच हिरावून घेईल.

म्हणूनच, आजच्या काळात सर्वांत मोठे आव्हान AI स्वीकारणे नसून तिचा सुज्ञ आणि संतुलित वापर करणे हे आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच मानवी मूल्ये, कुटुंबातील संवाद, प्रार्थना, एकत्र वेळ घालवणे आणि परस्पर प्रेम ह्यांना अधिक जपण्याची गरज आहे. कारण भविष्यात AI अधिक बुद्धिमान होईल, परंतु प्रेम, करुणा आणि नात्यांची ऊब ही सदैव मानवी हृदयाचीच देणगी राहील. भविष्यकाळात यंत्रे अधिक बुद्धिमान होतील; परंतु कुटुंबाला टिकवून ठेवणारे प्रेम, त्याग, करुणा आणि आत्मीयता ही सदैव मानवी हृदयाचीच देणगी राहील. म्हणून AI आपल्याला अधिक सक्षम बनवू शकेल, परंतु मनुष्याला अधिक मानवतावादी बनविण्याची जबाबदारी ह्यापुढेही कुटुंबाचीच असेल. तेव्हा AI ची प्रचंड भीतीही नको किंवा अवाजवी कौतुक!


- robertjgonsalves@yahoo.com
Mob. : 75 88 72 56 88

## संपादकांस पत्रे

### संकटग्रस्त वसुंधरेची कहाणी

जून २०२६चा 'सुवार्ता' वाचनात आला. पर्यावरणास साजेसे असे मुखपृष्ठ आहे. आतील लेख उदा. संपादकीयापासून ते प्रासंगिक, उपक्रम, ठेवा, जागृती, आव्हान व आवाहन, कार्यवाही, दूरदृष्टी ते साद-प्रतिसाद इत्यादी सर्व नजरेखालून घातले. ह्यांवर वाचक जरूर चिंतन करतील असे वाटते. सध्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय समस्यांबरोबर पृथ्वीच्या पर्यावरण नाशाची चिंता लागून राहिलेली आहे. 'संकटग्रस्त वसुंधरेची कहाणी' 'सुवार्ता'ने अशीच अधून-मधून सांगावी व श्रद्धावंतांचे प्रबोधन शिबिरे घ्यावीत. देव-धर्म, पुजा-अर्चा व कर्मकांड ह्यात सामान्य माणूस गुंतलेला आहे. अशा वेळेला श्रद्धावंताने जगात सर्वत्र जाऊन वसुंधरा रक्षणासाठी सुवार्तांची घोषणा करावी व आनंदाच्या वाटेवरचे वारकरी व्हावे असे सांगावेसे वाटते.

**- इनास मेन,** भुईगाव




### विचारप्रवर्तक

जून २०२६चा 'सुवार्ता' वाचला. बिशप थॉमस डिसोजा ह्यांचा ८००व्या पुण्यस्मरणानिमित्त 'संत फ्रान्सिस ऑफ असिसी ह्यांचे महत्त्व' ह्या लेखातील साधेपणाचा क्रांतिकारी संदेश आजच्या जीवनातही उपयोगी पडतो. संत फ्रान्सिस असिसी हे पर्यावरणाचे रक्षणकर्ते संत होते आणि हाच धागा पुढे पकडून ह्या अंकातील पर्यावरणाचा पाठपुरावा (संपादकीय) 'ह्या उष्म्याचं करायचं काय?' (स्टीफन एम. परेरा), पर्यावरण संगोपन (दीपक मच्याडो), बावखल (सचिन मर्ती), पर्यावरण : काळाची गरज (विल्यम गोन्सालविस) ह्यांचे लेख विचारप्रवर्तक आणि ज्ञानात भर टाकणारे होते.

**- लुईजा पेगाडो,** उमराळे

### जुना चेहरा नव्याने उजळला

साधारण वर्षभरापासून आपण 'सुवार्ता' संपादक पदाची धुरा सांभाळत आहात. प्रत्येक संपादक पूर्णपणे आगळावेगळा असतो ह्याचा अनुभव आम्ही घेतला. आपण नेहमीच चैतन्याने आणि सृजनशीलतेने बहरलेले... तेच चैतन्य आणि तोच बहर आपण 'सुवार्ता'ला दिला... त्याबद्दल आपले अभिनंदन व आभार! अनेक लेखण्या बंद होत्या, त्या पुन्हा सुरू झाल्या आणि विशेष म्हणजे काही तरुण लेखण्या पुढे सरसावल्या, ही बाब कौतुकास्पद आहे. 'सुवार्ता' अंकाचा जुना चेहरा नव्याने उजळला... आणि 'सुवार्ता' लोकाभिमुख झाली... याचं सर्व श्रेय आपल्याला आहे.

आपल्या वसईमध्ये अशी काही माणसे आहेत किंवा होऊन गेली आहेत ज्यांनी समाजासाठी अत्यंत नि:स्वार्थीपणे कार्य केले आहे परंतु ते कधीच प्रकाशात आले नाहीत किंवा त्यांच्यावर कोणी प्रकाश टाकला नाही किंवा ते स्वत: प्रसिद्धीपासून चार हात लांब राहिलेले आहेत. अशा लोकांची ओळख समाजाला व्हावी, असे मला वाटते.

**- नोएल डाबरे,** निर्मळ

# वसई-विरारचा कायापालट झालेला दिसेल!

*वसई-विरारच्या प्रगतशील व प्रतिष्ठित महापालिकेवर श्री. अजीव पाटील महापौर म्हणून व श्री. मार्शल लोपीस उपमहापौर म्हणून आपली निवड झाल्याबद्दल 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!*

**सहसंवादक :**
**जॉन कोलासो,** गिरीज
**जॉन परेरा,** नानभाट

*** आपल्या प्रभागातून आपली नगरसेवकपदी निवड होण्यामागे काय कारण होते?**

**महापौर :** विरार पश्चिम विभागातून दोन वेळा बिनविरोध निवडून आलो तसेच पक्षप्रमुखांनी दिलेल्या जबाबदारीप्रमाणे ह्यावेळेला विरार पूर्व येथून निवडून आलो आहे. आमचे मामा भास्करराव ठाकूर ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, सरपंच, नगराध्यक्ष तसेच विविध संस्थामध्ये कार्यरत होते तसेच आमचे वडील समाजवादी विचारांचे व रेल्वेत नोकरी ह्यांमुळे समाजवादी व काँग्रेसी विचारांचा मनावर पगडा होताच त्याच जोडीला पंढरीनाथ चौधरी ह्यांचे मार्गदर्शन, वर्तक कुटुंबीयांची साथ-सोबत, पक्षविरहित समाजकार्य ह्यांमुळे निवडून येण्यासाठी मदत झाली.





**उपमहापौर :** समाज कार्यातून वरती आलो आहे. कॉलेजला असल्यापासून गावात कार्यरत होतो. नंतर पॅरिश कौन्सिल, शिक्षकी पेशा, संत जोसेफ महाविद्यालय कार्यकारी मंडळ, युवा काँग्रेस उपाध्यक्ष, अध्यक्ष अशा स्तरांवर समाजात कार्यरत असताना २०११साली बहुजन विकास आघाडीच्या ग्रामीण विकास योजनेत कार्य करू लागलो. महानगरपालिकेच्या स्थापनेमुळे लोकांमध्ये प्रचंड नाराजी होती ती दूर करण्यासाठी मी पुढाकार घेतला; पक्षप्रमुखांची साथ मिळाली व निवडून आलो.

*** आपल्या पक्षप्रमुखांनी व सदस्यांनी महापौर व उपमहापौराची जबाबदारी आपणावर का सोपविली आहे, असे आपणास वाटते?**

**महापौर :** नवीन लोकांना विशेषत: युवकांना संधी मिळावी ह्या विचाराने आम्ही नवीन टीम तयार करून कार्यरत होतो. वैयक्तिकपणे मला निवडणूक लढवायची नव्हती. मधल्या काळात प्रभाग रचनेत बरेच बदल झाले; ह्या सर्व बाबींचा विचार करता पक्षाने मला विरार पूर्व भागातून निवडणूक लढवायला सांगितली. संपूर्ण प्रभागाची जबाबदारी माझ्यावर सोपविली आणि ती मी पूर्णत्वास नेली. ह्या सर्वांचा विचार करून पक्षप्रमुखांनी महापौरपदाची जबाबदारी सोपविली आहे असे वाटते. अगदी अल्प बजेट, प्रतिकूल परिस्थिती व विशेष आव्हाने ह्या सर्वांचा स्वीकार करीत महानगरपालिकेची गाडी व्यवस्थित रूळावर आणून पक्षप्रमुखांकडे सुपूर्द करावी, असा विचार आहे.

**उपमहापौर :** महापौर साहेबांनी सचिव, संघटक अशा विविध पदावर पक्षामध्ये काम केलेले आहे, त्यांच्याकडून आम्हाला बरेच काही शिकायला मिळाले आहे. सर्वसामान्य कार्यकर्ता मोठा व्हावा ही आमच्या पक्षाची भूमिका आहे ह्या भूमिकेतूनच अनेक जणांना ह्या अगोदर महापौर, उपमहापौर, आमदार अशी पदे पक्षाने दिली आहेत. माझ्या बाबतीत विचार करता प्रशासकीय राजवटीच्या काळात केलेली लोकांची कामे लक्षात घेऊन तसेच अनेक नगरसेवकांनी दिलेली साथ मला उपमहापौर पदापर्यंत पोहचवू शकली.

*** आपल्या मते वसई-विरार शहर महापालिकेची प्रमुख बलस्थाने कोणती आहेत?**

**महापौर :** विकास आराखडा, उपलब्ध पिण्याचे पाणी, अग्निशामक दल, घनकचरा विल्हेवाट व्यवस्था, रुग्णालये, तलाव २२०० ते २५०० बचत गट, ३ ते ३.२५ कोटी बजेट.

*** आपली आव्हाने कोणती आहेत?**

**महापौर :** आपला वसई-विरार परिसर हा गुजरात व महाराष्ट्र उद्योग विकास क्षेत्र तसेच भिवंडी, वाडा, ठाणे, मुंबई ह्या सर्वांसाठी मध्यवर्ती भाग आहे. स्वस्त घरे मिळत असल्याने सर्वात जलद गतीने लोकसंख्यावाढ होणारा आपला परिसर आहे. अनेक पटीने वाढणाऱ्या लोकसंख्येला लागणाऱ्या मूलभूत सोयी, पिण्याचे पाणी, चांगले रस्ते, वाहतूक व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, शैक्षणिक सुविधा पुरविणे, आहेत त्या सुविधा अधिक सक्षम करणे अशी बरीच आव्हाने आपल्या समोर आहेत. ह्यात एक खंत वाटते ती म्हणजे आपली तुलना ९०कोटी बजेट

असलेल्या मुंबई महापालिकेशी केली जाते. त्याप्रमाणे कामाची अपेक्षा केली जाते. मुंबईला मूलभूत सुविधा ब्रिटिश राजवटीपासून मिळाल्या असून त्यात ते सुधारणा करीत आहेत, आपणांस सर्वच मुळापासून करायचे आहे. आपलं बजेट ३ ते ३.२५ कोटींचं आहे. पाणी योजना, रस्ते, शाळा ह्या पूर्णपणे महापालिकेकडे सुपूर्द करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे मर्यादा पडतात.

**उपमहापौर :** विकास थांबवू शकत नाही. वाढणाऱ्या नागरी वस्तीला नागरी सुविधा पूर्तता करीत 'सुजलाम् सुफलाम् वसई-विरार' बनविण्याचे आव्हान आहे. आव्हाने आहेत ती स्वीकारली आहेत व त्या अनुषंगाने कार्यवाही करीत आहोत.

*** रस्ते, वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते ह्या समस्या दूर करण्यासाठी आपली काय कृतियोजना आहे?**

**महापौर :** आपला विकास आराखडा १९९०-९२ च्या दरम्यान मंजूर होणे गरजेचे होते पण तो मंजूर झाला २००७मध्ये. उशिरा मंजूर झाल्यामुळे बऱ्याच समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषत: जागा संपादन करणे फार जिकिरीचे बनले आहे. तरीही ह्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी योजना आखण्यात आल्या आहेत. हायवेपासून शहराला जोडणारे रस्ते रुंदीकरण व काँक्रिटीकरण करणे विरार-नालासोपारा, वसई-नायगाव इत्यादी कामे हाती घेण्यात येणार आहेत. पावसाळ्यानंतर अर्नाळा-वसई रस्ता काँक्रिटीकरण, रेल्वे ओव्हरब्रिजेस विरार-नालासोपारा अल्कापुरी वसई-नायगाव, उमेळा, स्टेशन परिसर अंतर्गतरीत्या एकमेकांना जोडण्याच्या अनुषंगाने काही खाजगी रस्ते निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. गोगटे सॉल्टच्या जागेतून अशा रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. तसेच खाजगी समिती स्थापन करण्यात आली असून आणखी काही अंतर्गत रस्त्याबाबत अहवाल सादर करण्यात येत आहे. जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन ह्या कंपनीच्या मध्यस्थीने नायगाव-वसई-सोपारा-विरार-चिखलडोंगरी अशा मेट्रो रिंग रोडची चाचपणी चालू आहे. नारंगी-मनवेल पाडा, सोपारा, बोळिंज, वालीव, माणिकपूर अशा ८ ठिकाणी रोड ओव्हरब्रिजेस प्रस्तावित करण्यात आले आहेत. 'विकास हक्क हस्तांतरणा'अंतर्गत काही खाजगी मालमत्ताधारकाशी विचारविनिमय करून जागा संपादन करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. ह्या प्रक्रियेला कमीतकमी १० वर्षे लागतील. ह्या काळात वसईचा कायापालट झालेला दिसेल. विकास प्रक्रिया एकत्र होत नसते. ती टप्प्याटप्प्याने पुढे जात असते, पुढे न्यावी लागते. विभागवार प्राधान्यक्रमाने विकासकामे केली जातील. रुंदीकरण, खोदकाम, तोडफोड, लोकांच्या संघटनांचा रोष अशा विविध टप्प्यांतून ही विकास प्रक्रिया पूर्णत्वास जाणार आहे. नवघर परिसरात एक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प येत असून ग्रामीण भागात छोटे छोटे प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

*** स्टेशन परिसरांतील पार्किंगचा व गर्दीचा प्रश्न कसा सोडविणार आहात?**

**महापौर :** रेल्वे स्थानकापासून साधारण २ किलोमीटरचा परिसर हा 'ना फेरीवाला क्षेत्र' म्हणून घोषित करून तेथील गर्दी कमी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच ह्या परिसरात जे पार्किंग आहेत त्यांना विनंती करून त्या जागा संपादन करता आल्या किंवा त्यांनी स्वत: पार्किंग विकसित करावेत म्हणून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे आपल्या परिसरात जे जे पार्किंग झोन्स व मार्केट म्हणून राखीव जागा आहेत त्या संपादित करून बहुमजली पार्किंग बांधण्याचाही आमचा विचार आहे. विकास आराखड्यामध्ये नमूद केलेल्या रस्त्याच्या जागा संपादन करून हायवे ते विरार, नालासोपारा, वसई व नायगाव ह्या स्थानकांना जोडणारे रस्ते २० ते ३० मीटर रुंद करण्यात येतील. लवकरच ह्या कामाला सुरुवात होईल.

*** विरारजवळ बुलेट ट्रेनचे स्टेशन होत आहे?**

**महापौर :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील विरार स्टेशन परिसरातील झोपडपट्टी क्षेत्र हटवून ४००एकर जमिनीवर एक सुंदर शहर बनविण्याचा प्रस्ताव नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशनचा असून हा प्रस्ताव केंद्र व राज्य सरकार ह्यांच्या नियंत्रणात असून वसई-विरार शहर महानगर पालिकेकडे ह्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी असणार आहे. नागरीकरण करताना कमीतकमी ५० वर्षांचा विचार करून त्या पद्धतीने आधारभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. ह्या अनुषंगाने विकासाच्या नवनवीन कल्पना राबविण्यात येतील.

*** नागरिकांना पिण्याचे पाणी पुरेसे मिळण्यासाठी काय करता येईल?**

**महापौर :** प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी देण्यात येईल. तेथे ग्रामीण व शहरी असा भेद केला जाणार नाही. आपल्या विभागात ६९ पाण्याच्या टाक्या असून त्या महाराष्ट्र जल प्राधिकरणाच्या माध्यमातून उभारण्यात आल्या होत्या. आता ह्या टाक्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. ह्या पावसाळ्यानंतर ह्या टाक्यांमध्ये पाणी चढविले जाईल व तेथून ते गावपरिवारातील घरांना देण्यात येईल. आपण ग्रामीण भागात उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करीत आहोत. सत्पाळा सारख्या पंचायत हद्दीत देखील आपण काम करीत आहोत. भुईगावसारख्या पंचायत हद्दीत

आपण ४कोटींची कामे केली. तीसुद्धा लोकांकडे पाठपुरावा करून ती कामे करवून घेतली. महिला व बाल कल्याण योजना, विधवा महिला, एकाकी महिला अशा विविध योजनेअंतर्गत ७०% निधी आपण ग्रामीण भागात मिळवून दिला आहे.

*** आरोग्यविषयक धोरण कसे राहील?**

**महापौर :** ९० विविध आरोग्य केंद्राद्वारे गरजूंना वैद्यकीय सेवा पुरविली जात आहे. ह्यात ७ रुग्णालये, २ माता बालसंगोपन केंद्र, २१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४५ आयुष्यमान आरोग्य केंद्रे, १५ बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना', वैद्यकीय केंद्राद्वारे ७६५ खाटा वर्षागणिक १५ लाख रुग्णांची सेवा ८७५०० विविध चाचण्या, ४६४० डायलेसिस, दोन सिटिंग मोफत १०००० प्रसूती म्हणजे आपल्या विभागातील निम्मे प्रसूती नगरपालिकेच्या दवाखान्यात होत आहेत व सरकारी दवाखान्यात प्रसूती झाली म्हणून महानगरपालिकेतर्फे रु. ५०००/- मदत दिली जाते. ह्या सर्व बाबींचा विचार करता आपल्या लोकांच्या सेवेसाठी आपण आचोळे येथे ४०० खाटांचे सरकारी रुग्णालय उभे करीत आहोत. आता पुढील टेंडर प्रक्रिया चालू झाली आहे.

माणसांच्या आरोग्याबाबत विचार करत असता आम्ही जनावरांच्या आरोग्याबाबतही काळजी करीत आहोत. श्वानप्रेमींची चर्चा करून एकत्रितपणे कसे काम करता येईल ह्याचा विचार करून श्वान निवारा केंद्र त्यांचे कुटुंब नियोजन वॅक्सिनेशन टॅग त्याद्वारे रॅबिस ट्रेकिंग त्यांच्यासाठी ॲम्ब्युलन्स सेवा, खानपान देण्याच्या जागा निश्चित करणे, काही जनावर ॲग्रेसिव्ह होतात त्यांना नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. सर्पदंशावरील इंजेक्शने सर्व सरकारी रुग्णालयात उपलब्ध आहेत. विरार-नालासोपारा ह्या ठिकाणी २४ तास वैद्यकीय सेवा दिली जाते. खास विनंतीनुसार अर्नाळा पंचायत कार्यालयात देखील आपण सर्पदंशाचे इंजेक्शन उपलब्ध करून दिले आहे.

***परिवहन सेवा सक्षम करण्यासाठी योजना आहेत का?**

**महापौर :** महानगरपालिका हद्दीत एस.टी. सेवा बंद करण्यात आली असून महानगरपालिकेने देऊ केलेली परिवहन सेवा लोकांच्या गरजेनुसार सेवा देण्यास असमर्थ ठरली आहे. सरकारी नियमानुसार एखाद्या शहराची लोकसंख्या ३,५०,००० (साडेतीन लाख) वर गेली की तेथे महानगरपालिका कार्यान्वित केली जाते पण आपल्याकडे जेव्हा महानगरपालिका आली तेव्हा आपल्या शहराची लोकसंख्या १०,००,००० (दहा लाख) च्या घरात होती. एस.टी. सेवा तात्काळ बंद न करता थोड्या अवधीपुरता ती चालू ठेवावी अशी विनंतीही शासनाला करण्यात आली होती. पण ती झिडकारण्यात आली. सध्याची परिवहन सेवा स्थानिक ठेकेदारांमार्फत चालविली जात असून ती पूर्णपणे तोट्यात आहे. काही मार्गावर आपण बसफेऱ्या वाढविल्या आहेत पण प्रवाशी मिळत नाहीत. १०० नवीन विद्युत बसेस आपल्याकडे पावसाळ्यानंतर येत आहेत त्यात काही मिनी बसेसची व्यवस्था करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ह्या नवीन बसेस आल्यावर आणखी काही फेऱ्या वाढवण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत, तसेच काही नवीन बसमार्ग देखील चालू करण्याचा आमचा विचार आहे.

**उपमहापौर :** सध्याच्या स्थितीत आपण १०,००० अधिक ज्येष्ठ नागरिकांना मोफत बस प्रवास, महिलांना तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना ५०% सवलत देत आहोत. ज्येष्ठ नागरिक महिला वर्ग ह्यांची बाजार, रुग्णालय, नातलगांच्या घरी जाण्यासाठी बरीच गैरसोय होत आहे, हे आमच्या लक्षात आले आहे. त्यासाठी काही कार्यवाही करता येईल का ह्याचा विचार आम्ही करीत आहोत.

*** शहराचा विकास करताना पर्यावरणाचा समतोल कसा राखणार आहात?**

**महापौर :** पर्यावरणाच्या अनुषंगाने पूर्व-पश्चिम पट्ट्यात आपण वृक्षारोपणासाठी प्रोत्साहन देत आहोत, रस्त्याच्या दुतर्फा आपल्याला वृक्ष दिसत आहेत. उद्याने विकसित करीत आहोत. सोसायट्यांना वृक्षारोपणासाठी प्रवृत्त करीत आहोत. लाकूडतोड पूर्णपणे बंद केली आहे. खाडी व निवासी डोंगर परिसरात मॅन्ग्रोस दिसत आहेत. बंदर विभाग व खारलँड संवर्धन व उत्पादन समित्या स्थापन झाल्या आहेत, त्याच्या मार्फत वृक्ष लावणे बंधनकारक केले आहे. तसेच स्थानिक वृक्षांची लागवड वाढविण्याचाही प्रयत्न करीत आहोत. रॉबी डिसिल्वा कला महाविद्यालयाच्या आजूबाजूच्या परिसरात ते ह्या बाबतीत चाचपणी करीत आहोत. सांडपाणी प्रक्रिया केंद्रे निर्माण करण्यात येणार आहेत.

*** महत्त्वाचे म्हणजे पावसाळ्यात साचणारे पाणी ही समस्या उग्र बनत आहे...**

**महापौर :** मुंबई शहराला पाणी पुरवठा करणारी बहुतांश धरणे आपल्या विभागात आहेत. त्यांचे अतिरिक्त पाणी कळवा, वसई खाडीमार्गे समुद्रात सोडण्यात येते. मोठी भरती, मोठा पाऊस जुलै-ऑगस्ट अशा वेळी धरणाचे दरवाजे उघडले गेल्यामुळे आपल्याकडे पाणी साचते व परिसर जलमय होतो. वसई खाडी पूल-किल्ला ते हायवे अशा ठिकाणी मोठे बंधारे बांधून पूर्वेकडून पश्चिमेकडे येऊन नंतर समुद्रात जाणारे पाणी

तेथेच अडविण्यात यावे, तसेच ह्या बंधाऱ्यात तांत्रिक दरवाजे असावेत, जे योग्यवेळी उघडता वा बंद करता येतील. बंद गटारे, बुजविलेली बावखले ह्याबाबत जर आम्हांला माहिती पुरविली व संबंधितांची काही हरकत नसेल तर ती आम्ही पूर्ववत करू. साफसफाई करून खोदून देऊ. वसईला दोन तलाव तसेच नंदाखाल येथे आपण तलावाची साफसफाई केली आहे. विरार पश्चिम म्हाडा ते श्रीप्रस्थ ह्या परिसरात होल्डिंग पॉण्ड तयार करण्यात येणार आहेत. दोन ड्रेन मास्टर्सद्वारे आपण निर्मळ तलावाची साफसफाई करीत आहोत. त्यानंतर नाळे, गास असे सर्व तलाव आपण स्वच्छ करून लोकांना मच्छीमारीसाठी उपलब्ध करून देणार आहोत.

*** कचऱ्याची विल्हेवाट पुरेशा प्रमाणात होत नाही...**

**महापौर :** कचऱ्याची विल्हेवाट, परिसराची साफसफाई ह्याबाबत एखादी खाजगी एजन्सी, महिला बचत गट, तृतीय पंथीय ह्यांच्या मदतीने जनजागृती करण्याचा मानस आहे. कचऱ्याचे योग्य असे वर्गीकरण करून ऑर्गेनिक कंपोस्ट खत निर्माण करणाऱ्या मशीन्स काही ठिकाणी देण्याचा विचारदेखील सुरू आहे. दिवसाला १००किलोपेक्षा जास्त कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणाऱ्या सोसायट्यांना किंवा वस्त्यांना विशेष सवलत देण्याचा विचार सुरू आहे.

*** महापालिकेच्या नागरिकांना तुमचा काय संदेश आहे?**

**महापौर :** पहिल्या पावसात विविध प्रकारचा कचरा वाहून काही ठिकाणी तो जमा होतो व शहराला विद्रूप करतो. कृपया, असे फोटो समाज माध्यमांवर टाकून आपल्या शहराला विद्रूप बनवू नका. शहराचे सौंदर्य आपल्या नागरिकांच्या हातात आहे. स्वत:ला शिस्त लावा, कचरा इतरत्र फेकू नका, रस्त्यावर थुंकू नका. कचऱ्याचे योग्य ते वर्गीकरण करा. विधायक सूचना करा. आपल्या सूचना शहराच्या विकासासाठी उपयुक्त असतील तर त्याच्या अंमलबजावणीसाठी आम्ही नेहमीच तयार आहोत. वसई-विरार शहरवासियांना चांगल्या सुविधा मिळाव्यात म्हणून आम्ही कटिबद्ध आहोत.

**उपमहापौर :** आपली वसई-विरार महानगरपालिका अधिक सुंदर, सुजलाम्, सुफलाम् करण्यासाठी युवक आणि जागृत नागरिक ह्यांनी आपल्या ज्या नवीन कल्पना असतील त्या त्यांनी आमच्यापर्यंत शेअर कराव्यात. जेणेकरून त्या विधायक सूचनांची अंमलबजावणी करून वसई-विरारच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करता येतील. चांगल्या विचारांचे नेहमी स्वागत आहे. ●


## जेरूसालेम टूर्स ॲन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी

* **दिनांक ४ ते १८ जुलै २०२६ची वेलंकनी माता नोव्हेना ट्रिप फूल झाली आहे त्याबद्दल वेलंकनी मातेचे व माझ्या कोळी बांधवाचे मी आभारी आहे.**

१) **आता चला** दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टें. २०२६ : **वेलंकनी मातेच्या नोव्हेनासाठी.** भव्य-दिव्य अशा जागेत वसलेली बिल्डिंग व पॉश बंगले. मोठ्या रूम्स व त्यात सर्व ॲमिनिटीस हॉटेल V.P. N Residency वेलंकनीत एकमेव नावाजलेले हॉटेल. ए.सी.ट्रेन,ए.सी.रूम. Quality N Quantity फूड एकूण खर्च रुपये २८,५००/- मात्र. तसेच स्वतंत्र येणाऱ्या भाविकांसाठी ५ दिवसांसाठी खर्च रुपये ११,०००/-. (चार जणांस एक रूम)

२) **मँगलोर, उडीपी, कुर्ग सहल** : दिनांक ७ ते १४ नोव्हें. २०२६. ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईट सीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रु.२७,०००/-व लहान मुलांस रु.२२,०००/-

* **कोकण, मालवण, तारकर्ली सहल** : दिनांक २१ ते २६ नोव्हें. २०२६. थंड व हिरव्यागार निसर्गाची मजा लुटण्यासाठी ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईटसीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रुपये १९,०००/- व मुलांस रु. १५,०००/-.

* **Quality And Quantity No Compromise.**

* संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**(Whatsap)

* पायस घोन्सालवीस, उमराळे :**C/O 9766092738**

## अल्फान्सो टूर्स ॲण्ड कॅटरर्स

१) **ऑगस्ट महिन्यात वेलंकनी फेस्टिवल नोव्हेना :** दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. संपूर्ण नोव्हेना ए.सी. पॅकेज रु. २९,०००/-. पाच दिवसांचा नोव्हेना ए.सी. पॅकेज रु. १८,०००/-मात्र. व्हेज-नॉनव्हेज बुफे व जेवणाच्या रंगत मेजवानीसह.

२) **संत ज्युड नोव्हेना : झाशी, ग्वालियर-आग्रा व दिल्ली सहल :** दिनांक २४ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. २९,०००/- मात्र.

अ) फक्त झाशी व ग्वालियर सहल :दिनांक २४ ते २८ ऑक्टो. एकूण खर्च प्रत्येकी रु. २१,०००/- मात्र.

* सर्व प्रवास राजधानी व ए.सी. बसने असेल.

* सर्व सहलींची बुकींग आता दोन महिने आधी करावी लागेल.

* सहल क्रमांक २मधील प्रवास हा जाता-येता राजधानीमधला असेल. व्हेज नॉन व्हेज जेवण आणि खूप सारी मौज घेऊन आपण जात आहोत. आपली नावे लवकरात लवकर द्यावी.

* सर्व सहलींचे तपशीलवार कार्यक्रम तयार आहेत.

**संपर्क :-**

**नेल्सन अल्फान्सो, गास : 9970650770**
**नीलम कोरिया, आगाशी-पापडी : 9130541082**
**हेलन डिमेलो, रमेदी : 7559125435**
**मॅलेट फर्नांडीस, सांडोर : 9545329770**

# भारतात डॉटर्स ऑफ सेंट पॉल (DSP) ह्यांचा अमृतमहोत्सव

'डॉटर्स ऑफ सेंट पॉल' संस्थेची स्थापना १९१५ मध्ये इटलीत धन्यवादित जेम्स अल्बेरिओने आणि मदर थेकला मर्लो ह्यांनी केली. हा धर्मसंघ एका अद्वितीय कृपेवर आधारित आहे. संस्थापक धन्यवादित जेम्स अल्बेरिओने ह्यांच्या हृदयात नेहमीच विविध राष्ट्रांत आणि इतर धर्मांच्या लोकांपर्यंत सुवार्ता पोहोचण्याची तीव्र इच्छा होती. सामाजिक दळणवळणाच्या आधुनिक साधनांद्वारे सुवार्ता घोषविणे हे प्रमुख कार्य आहे.

**भारतातील महत्त्वाचा टप्पा** (१८ ऑगस्ट १९५१) : चार तरुण अग्रगण्य इटालियन मिशनरी सिस्टर्स मुंबईत दाखल झाल्या. विलेपार्ले येथील सि. स्कोलॅस्टिका डिसोजा ह्यांनी सर्वप्रथम पावलाईन संस्थेत प्रवेश घेतला. तिच्यामुळे इटालियन सिस्टर्सना इंग्रजी भाषा आणि स्थानिक रीतिरीवाज अवगत झाल्या. विलेपार्ले येथील एका घरी डॉटर्स ऑफ सेंट पॉल सिस्टर्स स्थायिक झाल्या. १५ मे १९५८ रोजी सिस्टर्स, तसेच इच्छुक आणि नवशिक्या धर्मभगिनी वांद्रे येथील १४३ वॉटरफिल्ड रोड येथे कायमस्वरूपी निवासस्थानी स्थलांतरित झाल्या. सध्या डॉटर्स ऑफ सेंट पॉल सिस्टरांचे हेच मुख्य केंद्र आहे.

**भौगोलिक विस्तार :** मदर थेकला मर्लो म्हणतात, ''सुवार्तेला पंख आणि पाय द्या. जेणेकरून ती दूरवर आणि सर्वत्र पोहचू शकेल.'' आम्ही भारतातील ११राज्यांत विस्तारलेल्या १६८ सिस्टर्स असून वांद्रे, बंगलुरू, बोरिवली, गोवा, कोलकता, दिल्ली, गुहाटी, लखनौ, मंगळुरू, नागपूर, सिकंदराबाद, सिलीगुरी, शिलाँग, त्रिवेंद्रम आणि वसई येथे १५ समुदाय स्थापन केले आहेत. आज आम्ही 'पावलाईन सिस्टर्स' म्हणून विशेष ओळखले जातो.

पावलाईन पब्लिकेशन ह्या ब्रँडखाली आम्ही इंग्रजीसह अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तके प्रकाशित करतो. ज्याचा मुख्य उद्देश विश्वास संवर्धन, कौटुंबिक जीवन आणि मूल्य शिक्षण ह्यांवर लक्ष केंद्रित करणे.

**पावलाईन बुक्स आणि माध्यम केंद्र :** आम्ही असंख्य पुस्तकांची दुकाने चालवितो. जी आध्यात्मिक साहित्य, बचतगट, कौटुंबिक जीवन, नैतिक शिक्षण, मुलांसाठी कथा-कादंबऱ्या, प्रौढांसाठी पुस्तके आणि विविध प्रकारच्या धार्मिक वस्तू प्रदान करतो.





**डिजिटल आऊटरीच आणि सोशल मीडियावरील उपस्थिती :** आम्ही 'न्यू मीडिया'वर मोठ्या प्रमाणावर काम सुरू केले आहे. त्याद्वारे आम्ही एक यु ट्युब चॅनल चालवत आहोत. ज्याच्या माध्यमातून आम्ही आध्यात्मिक संसाधने (उदा. जपमाळ/रोझरी, दैवी दयेची प्रार्थना) संताच्या जीवनावरील लघुपट आणि वर्षातील विविध महत्त्वाचे मुख्य विषय लोकांपर्यंत पोहोचत आहोत. वांद्रे येथून युकॅरिस्टिक आराधना (पवित्र संस्कार आराधना), रविवारच्या वाचनावरील चिंतन आणि मुख्य सण-उत्सवाचे सोहळे थेट प्रक्षेपित केले जातात. तसेच paulineindia.org मोबाईल ॲप विकसित केले आहेत. जिथे वापरकर्ते आभासी पुस्तक केंद्रातून ई-पुस्तके, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि बालसाहित्य खरेदी करू शकतात.

वांद्रे येथे डॉटर्स ऑफ सेंट पॉल प्रापंचिकांसाठी प्रमाणित बायबल अभ्यासक्रम आयोजित करतात. गरजू व्यक्तींना मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही वसतिगृह आणि नवजीवन समुपदेशन केंद्र सुरू केले आहे.

**ए आय युग :** सिस्टर्सना 'ए आय' आधारित सर्जनशील साधने आणि माध्यम शिक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते आणि त्या मुंबई आणि भारताच्या विविध भागांमध्ये मुलांसाठी, तरुणांसाठी आणि ह्या क्षेत्रात शिक्षण देणाऱ्या विविध प्रौढ गटांसाठी सेमिनार आयोजित करतात आणि माध्यम जागृती करतात.

आमच्या सिस्टरांचे प्रापंचिक को-ऑपरेटर्स देखील आहेत. जे आम्ही जिथे कार्यरत आहोत तिथे आमच्या कार्यात सक्रियपणे सहभागी असतात.

**वसईतील स्थान आणि संपर्क :** वसईमध्ये डॉटर्स ऑफ सेंट पॉल सिस्टर्स ह्यांच्या उपस्थितीमुळे प्रामुख्याने स्थानिक कॅथलिक समुदायाच्या मध्यभागी असलेल्या त्यांच्या पावलाईन बुक आणि मीडिया सेंटरद्वारे प्रसिद्ध आहेत. वसई-विरार भागांतील मोठ्या ख्रिश्चन लोक समुदायासाठी ह्या केंद्राला आध्यात्मिक केंद्र म्हणून स्थापित केले आहे.

- **सिस्टर मीरा** FSP

**अनुवाद : रॉकी व कॅथरीन सिक्वेरा**

**पत्ता :** G 1-3 टीबेरीयास इमारत, बिशप हाऊसच्या जवळ, स्टेला, वसई (प.) ४०१ २०२.

**मोबाईल : 91-8010141343**

# महापाप

- **बिशप एडविन कोलासो**
ख्रिस्तवासी मानद बिशप, औरंगाबाद



मराठी भाषेत एक वाक्प्रचार आहे, 'कळतं पण वळत नाही'. आपण करतो ते चुकीचं आहे ह्याची एखाद्या माणसाला पूर्ण जाणीव असते. आपण हे केलं तर आपलं नुकसान होईल, आपण बदनाम होऊ, आपल्या घरातील माणसं सुद्धा आपल्याला हसतील, त्यांना भयंकर वेदना होतील, कदाचित ह्या गोष्टीमुळे आपल्यावर मरण कोसळेल, आपली बायकामुलं उघड्यावर पडतील. ही जाणीव असूनही माणूस आपले जीवन बदलायला तयार होत नाही. ह्यालाच म्हणतात, 'कळतं पण वळत नाही.'

पर्यावरणाच्या बाबतीत तसं होऊ शकतं. उदाहरणार्थ झाडे तोडत राहिलो तर पर्यावरणाचं संतुलन बिघडेल आणि लाखो कोट्यवधी लोकांना त्याचे भयंकर परिणाम भोगावे लागतील. तरीपण माणसं पैसा, धनदौलतीच्या हव्यासापोटी जंगलंच्या जंगलं तोडत राहतात.

हे आरोग्याच्या बाबतीतही होताना दिसतं. उदाहरणार्थ मधुमेह असलेल्या माणसाला कळतं की, गोड पदार्थ आपल्याला हानिकारक आहेत, तरीपण मधुमेहाचा रुग्ण गोड पदार्थावर नियंत्रण ठेवत नाही.

'कळतं पण वळत नाही' ह्याची सर्वांत भयानक प्रचिती माणसाला आपल्या आध्यात्मिक जीवनात येऊ शकते. विशेष करून माणूस महापाप करतो व त्या पापातच रेंगाळत राहतो, जणू काय आपलं सर्व ठीक आहे अशा आविर्भावाने जीवन जगतो, आपण करीत असलेल्या पापाच्या समर्थनार्थ जगाला सोडाच; स्वत:लाही समर्थन करता येणार नाही अशा खोट्या सबबी स्वत:च सांगत राहतो, तेव्हा त्या माणसाचा पूर्ण अध:पात झालेला असतो.

पोप लिओ ह्यांच्या एका भाषणात महापापाविषयी मार्गदर्शन करताना त्यांच्या विधानांवरून दिसतं की आज सामान्य माणसंच नाहीत, तर विद्याविभूषित माणसंही, राजरोस चर्चमध्ये भक्ती करणारी लाखो कोट्यवधी माणसंही महापापांच्या स्थितीत राहतात. आजूबाजूला लोक करतात तेच आम्ही करतो असे म्हणतात. ज्या गोष्टींना महापाप म्हणतात त्या करण्यास कायद्यांमध्ये पण तरतुदी केल्या आहेत. तशा गोष्टी करण्यास सरकारी योजना राबविल्या जात आहेत. अगदी देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा सहा महिन्यांची गर्भवती सुद्धा उदरात वाढणाऱ्या बाळाचा गर्भपात करू शकते, असा कायदा पारित केला आहे. हा धडधडीत खून आहे. म्हणून आम्ही जर ह्या गोष्टी केल्या तर आम्हांला कोणतेच पाप होत नाही असे ते म्हणतात.

सगळे लोक ह्या गोष्टी करतात म्हणून त्या गोष्टी बरोबर आहेत ही फसवणूक आहे. ह्या गोष्टी मोठ्या प्रमाणावर जगात घडत आहेत, त्यांना मोठमोठे विद्वान, सामाजिक व राजकीय संस्था ह्यांचा पूर्ण पाठिंबा आहे म्हणून त्या गोष्टी नैतिक ठरत नाहीत. असत्य पुन्हा पुन्हा सांगितल्याने ते सत्य होत नाही,

हे सांगताना पोप लिओ म्हणतात की, ''महापापाच्या बाबतीत, कोणत्या बाबतीत महापाप आहे ह्याविषयी कॅथलिक धर्माची आजपर्यंतची शिकवण होती त्यात कोणताच बदल झालेला नाही.

पोप लिओ ह्यांनी अलीकडेच महापापांची यादी पुढील शब्दांत व्यक्त केली आहे. (अधिक सुलभ स्पष्टीकरणा-साठी कंसातील शब्द प्रस्तुत लेखकाचे आहेत.)

१) रविवारची कायद्याची मिस्सा न ऐकणे.

२) लग्न न करता लैंगिक जीवनाचा उपभोग घेणे, हस्तमैथुन महापाप आहे ही चर्चची शिकवण पूर्वी होती तशीच आहे. प्रसार माध्यमांनी व इतर विद्‌वानांनी केवढाही गोंगाट करून हस्तमैथुनाचे फायदे सांगण्याचा खटाटोप केला तरी हस्तमैथुन करणे महापापच आहे.

३) लग्न न करता वैवाहिक सुख घेण्यासाठी स्त्री-पुरुषाला एकाच छत्राखाली राहता येत नाही. (सोयरिक, साखरपुडा झाला असला तरी भावी दांपत्याला लग्न झाल्याशिवाय वैवाहिक सुख घेता येत नाही).

४) महापापाच्या स्थितीत असताना ख्रिस्तशरीर साक्रामेंत स्वीकारणे.

५) संभोग घेताना गर्भ टाळण्यासाठी संतती नियमनाची कृत्रिम साधने वापरणे (साधने पुरविणे, साधने वापरण्याचा सल्ला देणे).

६) गर्भपात करणे (गर्भपात करण्यास मदत करणे, गर्भपात करण्याचा सल्ला देणे, गर्भपाताची साधने पुरविणे).

७) मनुष्याचा जीव घेणे (दुसऱ्यांचा जीव घेण्यास प्रवृत्त करणे, इच्छा मरणाची तयारी दर्शविणे, इच्छा मरणास मदत करणे).

८) कामाच्या ठिकाणी अन्याय करणे (कामगारांच्या वेतनाच्या बाबतीत, सुविधांच्या बाबतीत, हक्कांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा अन्याय करणे).

९) घेतलेले कर्ज शक्य असतानाही न भरणे.

१०) चोरी करणे (पैसे, मौल्यवान वस्तू, जमीन-जुमला).

११) दुसऱ्यांचा द्वेष करणे.

१२) गर्व करणे (अहंकार, अहंपणा बाळगणे).

देवाच्या दहा आज्ञांमध्ये जी महापापे नमूद केली आहेत, तीच पापे पोप लिओ ह्यांनी लोकांच्या मनात असलेली संदिग्धता दूर करण्यासाठी वरील यादीत काही प्रचलित शब्दांचा वापर करून चर्चच्या शिकवणीत बदल झाला नाही हे स्पष्ट केले आहे.

ह्या आज्ञाचं उल्लंघन करणारी माणसं कधीकधी आपल्या आजूबाजूला येऊन राहतात. त्यांची पापे कधी ना कधी उघड्यावर येतातच. परंतु तोपर्यंत आपल्या समाजाचं खूप नुकसान होऊन गेलेलं असतं. त्यासाठी सामाजिक नेत्यांनी ह्याविषयी जागृत राहणे गरजेचे आहे.

त्याचा अर्थ असा नाही की, आपण अशा माणसांना दोषी ठरवून त्यांच्याशी संपर्क टाळा. नव्हे, अशा माणसांना त्यांचं जीवन बदलविण्यासाठी मदत करावी.

माझं वास्तव्य ज्या चर्चमध्ये होते तेथे जवळच्याच एका फ्लॅटमध्ये एक कॅथलिक माणूस राहायला आला. आमची ओळख झाली. तो वारंवार माझी भेट घेऊ लागला, आम्ही बहुधा जगात जी अनीती पसरली आहे, त्याविषयी बोलत असू. एके दिवशी मला कोणी सांगितलं की तो माणूस स्वत: लग्न न करता एका स्त्रीबरोबर त्या फ्लॅटमध्ये राहतो. मी त्याला बोलावले व सांगितले की, त्याचे तशा तऱ्हेचे राहणे महापाप आहे. त्या दिवसापासून तो मला पुन्हा भेटलाच नाही व होता त्याच स्थितीत त्या स्त्रीबरोबर राहिला. त्याचे त्याच स्थितीत राहणे म्हणजे ज्याप्रमाणे साप आपले संपूर्ण शरीर बाहेर आहे ह्याचे भान विसरून आपले डोके फक्त बिळात लपवतो व संकट टळल्याच्या भ्रमात राहतो त्याप्रमाणे असते.

माणसाला जेव्हा जाणीव होते की आपण महापापाच्या स्थितीत आहोत त्यावेळी त्याचा प्रतिसाद त्या माणसासारखा नसावा. परमेश्वर दयेचा सागर आहे. माणूस अनेकदा चुकेल, परंतु परमेश्वर त्याला क्षमा करायला तयार असतो. त्याचसाठी प्रायश्चित्त साक्रामेंताची तजवीज करून ठेवली आहे. त्या साक्रामेंतात आपल्या पापांची कबुली देऊन महापापातून मुक्त झाल्यानंतर आपण  सुटकेचा श्वास घेऊ शकतो. अन्यथा त्याचे महापाप त्याच्यासाठी दिवसाचे चोवीस तास नरक बनून राहते.

महापापाच्या स्थितीत असलेला माणूस नरक अनुभवतो हे महापापाच्या व्याख्येतच अंतर्भूत आहे. कॅथलिक शिकवणीप्रमाणे माणूस जेव्हा महापाप करतो तेव्हा त्याचं देवाशी असलेले नाते तुटते. येशूच्या शब्दांत सांगायचे म्हणजे द्राक्षवेलीला तो चिकटून राहत नाही. द्राक्षवेलीतून मिळणाऱ्या दैवी जीवनाचा पुरवठा माणूसरूपी फांदीत झिरपत नाही. ती फांदी शुष्क होते, जाळण्यासाठी पात्र ठरते. ह्यालाच 'नरक' ह्या शब्दापेक्षा अधिक उचित शब्द नाही.

(पुढील वचने देवाच्या पापी माणसावरील प्रेमाप्रमाणे आहेत. यहेज्केल ३४:११-१६, रोमकरांस पत्र ५:५-११, लूक १५:३-७).

●

## लिहिते व्हा : दक्षता सूत्र

**आपले कोणत्याही प्रकारचे लेखन महिन्याच्या १० तारखेपर्यंत सुवार्ता कार्यालयात पोहोचवावे.**

* अन्य नियतकालिकात किंवा व्हॉट्अॅपवर आलेला मजकूर 'सुवार्ता' मासिकात छापला जात नाही.
* आपण पाठविलेल्या साहित्याची एक प्रत कृपया, आपल्या दप्तरी असावी.
* आपला लेख शक्यतो ५५० ते ६०० शब्दांपर्यंत असावा. कविता ६० ते ८० शब्दांपर्यंत असावी.
* आपले लेखन पुढील स्वरूपाचे असू शकते : लेख, कविता, संपादकास पत्र, विषयानुरूप प्रतिसाद, ललित, कथा, वैचारिक, प्रासंगिक, विनोद, इत्यादी.
* आपले लेखन संपादक मंडळापुढे ठेवले जाईल.
* 'सुवार्ता' मासिकाच्या ध्येय-धोरणाप्रमाणे लेखन असेल तर त्या त्या महिन्याच्या विषयांप्रमाणे यथावकाश प्रसिद्ध केले जाईल.
* मजकूर स्वीकारणे अगर नाकारणे आदींचा अधिकार संपादक मंडळाचा असेल.

**- संपादक**

मानसिक आरोग्य


# चिंता आणि नैराश्येचे मौन ओझे

**- सिस्टर स्टेविना लोबो**
नंदाखाल / बांद्रा

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, जगातील प्रत्येक आठ व्यक्तींपैकी एक व्यक्ती मानसिक आरोग्याच्या समस्येसोबत जगत असल्याचा अंदाज आहे. त्यामध्ये चिंता आणि नैराश्य हे सर्वांत सामान्य आहेत. एक समुपदेशक म्हणून, मी अनेकदा कौटुंबिक समस्या, दु:ख, नातेसंबंधातील अडचणी, कामाचा ताण किंवा एकटेपणाशी झुंजणाऱ्या लोकांना भेटते. ह्यापैकी अनेक समस्यांमागे चिंता किंवा नैराश्य दडलेले असते. ह्या परिस्थिती विशेष आव्हानात्मक असण्याचे कारण म्हणजे त्या अनेकदा अदृश्य असतात. शक्यता आहे की तुमच्या ओळखीतील कोणीतरी आता झुंजत असेल, कदाचित मौनपणे.

मी शिकलेली सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे चिंता आणि नैराश्य हे अनेकदा हास्यामागे, व्यग्र वेळापत्रकामागे आणि अगदी सामान्य दिसणाऱ्या आयुष्यामागे लपलेले असतात. अनेकांना वाटते की नैराश्यग्रस्त व्यक्ती नेहमी दु:खी असते किंवा चिंताग्रस्त व्यक्ती स्पष्टपणे घाबरलेली दिसते. प्रत्यक्षात, अनेक लोक काम करत राहतात, कुटुंबाची काळजी घेतात, चर्चला जातात आणि त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडतात, पण आतून एक मोठे भावनिक ओझे वाहत असतात.

आपण सर्वजण अधूनमधून काळजी करतो. मात्र, चिंता ही दैनंदिन जीवनातील सामान्य काळजीपेक्षा वेगळी असते. ती सततची साथीदार बनू शकते, ज्यामुळे आराम करणे, झोपणे किंवा एकाग्र होणे कठीण होते. मन एका चिंतेवरून दुसऱ्या चिंतेकडे उड्या मारत राहते आणि अनेकदा वाईटात वाईट कल्पना करते.



साधे निर्णयही असह्य वाटू शकतात. चिंता केवळ मनावरच परिणाम करत नाही; तर ती शरीरातही डोकेदुखी, थकवा, स्नायूंचा ताण, पोटाचे विकार किंवा धडधड वाढणे ह्याद्वारे दिसून येते.

नैराश्यही तितकेच गैरसमजुतीचे असू शकते. ते निराशा किंवा नुकसान झाल्यानंतर वाटणाऱ्या दु:खापेक्षा अधिक असते. नैराश्य अनुभवणारे लोक अनेकदा भावनिक दृष्ट्या थकलेले, रिकामे किंवा अलिप्त असल्याचे वर्णन करतात. एका व्यक्तीने मला सांगितले, ''इतर सर्वजण सुखी आयुष्य जगत असताना मी काळ्या-पांढऱ्या रंगात जगत आहे असे वाटते.'' ज्या गोष्टींमध्ये त्यांना पूर्वी आनंद मिळायचा त्यात आता आनंद मिळत नाही. ते इतरांपासून दूर जाऊ शकतात, प्रेरणा गमावतात किंवा असे वाटते की जणू ते एक अदृश्य ओझे वाहत आहेत जे इतर कोणालाही दिसत नाही.

धोक्याची चिन्हे नेहमीच स्पष्ट नसतात. जी व्यक्ती पूर्वी आनंदी आणि सक्रिय होती ती इतरांपासून दूर जाऊ लागते. ज्या छंद आणि क्रियांमध्ये पूर्वी आनंद मिळायचा त्यांचे आकर्षण राहत नाही. दैनंदिन कामे असह्य वाटू लागतात आणि आयुष्य भेटवस्तूपेक्षा ओझे वाटू लागते. जेव्हा हे बदल आठवडाभर टिकून राहतात आणि दैनंदिन जीवनावर परिणाम करू लागतात, तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करू नये.

आधुनिक जीवन अनेक आव्हाने उभी करते जी ह्या संघर्षांना कारणीभूत ठरू शकतात. जीवनाची गती अधिकाधिक मागणी करणारी झाली आहे. अनेक लोक काम, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक दबाव आणि सामाजिक अपेक्षा ह्यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहेत. तंत्रज्ञान आपल्याला सतत जोडलेले ठेवते, तरीही अनेक लोक पूर्वीपेक्षा अधिक एकटे वाटतात. सोशल मीडियामुळे आपल्याला अनेकदा इतरांच्या जीवनाच्या काळजीपूर्वक संपादित केलेल्या आवृत्त्या दिसतात, ज्यामुळे काही लोक त्यांच्या दैनंदिन वास्तवाची तुलना इतरांच्या 'हायलाईट रील'शी करतात.

तरुणांना अभ्यास, करिअर आणि नातेसंबंधांशी संबंधित दबावांचा सामना करावा लागतो. प्रौढ लोक आर्थिक, नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांची काळजी करतात. वृद्धांना एकटेपणा, आरोग्याच्या चिंता किंवा प्रियजनांच्या नुकसानीचा सामना करावा लागू शकतो. चिंता आणि नैराश्य जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर लोकांवर परिणाम करू शकतात. आधुनिक जीवन अनेक आव्हाने उभी करते जी ह्या संघर्षाला कारणीभूत ठरू शकतात, जरी क्वचितच एकच कारण असते. जीवनातील अनुभव, व्यक्तिमत्त्व, नातेसंबंध, शारीरिक आरोग्य आणि तणावपूर्ण परिस्थिती ह्या सर्वांचा वाटा असू शकतो.

चांगली बातमी ही आहे की चिंता आणि नैराश्येवर उपचार शक्य आहेत. योग्य मदतीने, अनेक लोक बरे होतात, आत्मविश्वास परत मिळवतात, नातेसंबंध पुन्हा बांधतात आणि जीवनात अर्थ आणि आनंद पुन्हा शोधतात. बरे होण्यातील सर्वांत मोठा अडथळा म्हणजे मदत मागणे ही कमजोरीची निशाणी आहे ही समजूत. अनेक लोक स्वत:ला सांगतात, ''मी हे स्वत: हाताळू शकलो पाहिजे.'' किंवा ''इतरांच्या समस्या माझ्यापेक्षा मोठ्या आहेत.'' परिणामी, ते मौनपणे झुंजत राहतात. तरीही आपण शारीरिक आरोग्याबाबत असा विचार करत नाही. जेव्हा आपल्याला सतत छातीत दुखणे, जास्त ताप किंवा हाड मोडणे ह्यांसारखे त्रास होतात तेव्हा आपण वैद्यकीय मदत घेतो. आपल्याला समजते की आपल्या शरीराला कधीकधी काळजी व उपचारांची गरज असते. हेच आपल्या भावनिक आणि मानसिक आरोग्यासाठीही खरे आहे.

ख्रिस्ती म्हणून, आपला विश्वास आहे की प्रत्येक व्यक्ती देवाच्या प्रतिमेत निर्माण केली गेली आहे आणि तिला अंगभूत प्रतिष्ठा आणि मूल्य आहे. म्हणून आपल्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही सूट नसून देवाने आपल्यावर सोपवलेल्या जीवनाची काळजी घेण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रार्थना, साक्रामेंतांमधील सहभाग आणि काळजी घेणाऱ्या श्रद्धा समुदायाचा आधार कठीण काळात शक्ती देऊ शकतो. त्याच वेळी, गरज असताना व्यावसायिक मदत घेणे ही कमकुवत श्रद्धेची निशाणी नाही. देव अनेकदा आपल्या जीवनात ठेवलेल्या लोकांद्वारे कार्य करतो, ज्यामध्ये कुटुंबातील सदस्य, मित्र, समुपदेशक, डॉक्टर आणि इतर मदत करणारे व्यावसायिक ह्यांचा समावेश होतो.

**मानसिक आरोग्याची काळजी घेणे म्हणजे देवाने आपल्यावर सोपवलेल्या जीवनाची काळजी घेण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे.**

जर ह्या लेखामुळे तुम्हाला तुमच्या स्वत:च्या काही संघर्षाची जाणीव झाली असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका आणि जर यामुळे तुमच्या ओळखीच्या कोणाची आठवण झाली असेल, तर कदाचित आज दयाळूपणा आणि समजूतदारपणाने त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची संधी आहे. कधीकधी झुंजणाऱ्या व्यक्तीला आपण देऊ शकणारी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सल्ला नव्हे, तर आपली उपस्थिती, संयम आणि ऐकण्याची तयारी. बरे होणे नेहमीच त्वरित होत नाही, पण जेव्हा आपण आपल्या संघर्षाची कबुली देतो आणि इतरांना आपल्यासोबत चालू देतो तेव्हा त्याची सुरुवात होते. मी तुम्हाला एकच संदेश देऊ इच्छिते : आशा आहे. चिंता आणि नैराश्य कितीही असह्य वाटले तरी मदत उपलब्ध आहे, लोक काळजी करतात आणि परिस्थिती सुधारू शकते. तुम्हाला हा प्रवास एकट्याने करावा लागत नाही.

मोबाईल : 75 07 86 60 99

**अनुवाद : फादर ॲश्ली भंगा** ●


## 'सुवार्ता' जाहिरात दर

**कमर्शियल**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २६,२५०/- |
| अर्धे पान | रु. १३,६५०/- |
| पाव पान | रु. ७,३५०/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १५,७५०/- |
| अर्धे पान | रु. ७,३५०/- |
| पाव पान | रु. ५,२५०/- |
| छोटी (१/६) | रु. ३,१५०/- |
| छोटी (१/१२) | रु. २,१००/- |

**शोक/अभिनंदन फोटो**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २३,१००/- |
| अर्धे पान | रु. ११,५५०/- |
| पाव पान | रु. ६,३००/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १२,६००/- |
| अर्धे पान | रु. ६,३००/- |
| पाव पान | रु. ४,२००/- |
| छोटी (१/६) | रु. २,६२५/- |
| छोटी (१/१२) | रु. १,५७५/- |

## 'सुवार्ता' वर्गणी दर

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| पोस्टाने वार्षिक वर्गणी | रु. २५०/- |
| पाच वर्षांची वर्गणी | रु. ९५०/- |

**संपर्क : 'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१२०१.
**मोबाईल : 9702090231**
E-mail : suvartavasai@gmail.com



**URGENT REQUIRED**

Govt. Recognised
Gyaankung Academy English Medium School & Jr. College, Vasai Phata, Vasai (E),
requires Female Teachers (Preferred) for Grades VI-X in English Maths, Science, History & Geography. Salary Rs. 1.20 – 1.50 LPA. School Van Facility Available. No Age Limit.
B.Ed is not Mandatory.
**: Contact :**
**7977914035, 8369298705**



**ग्लोरिया मंडप डेकोरेटर**

**३०% ते ४०% पर्यंत सूट.**
रु. २,५०,००० चा मंडप फक्त
रु. १,५०,००० मध्ये.
१ऑक्टो. ते ३०नोव्हें. २०२६पर्यंत.
एकदा फोन करायला काय हरकत आहे?
१फोन तुमचे १लाख रुपये वाचवणार!
**Gloria Mandap : 9822608898**
पावसाळ्यात बांधण्यासाठी काळ्या रंगाची चांगल्या प्रतीची ताडपत्री तसेच ग्रीन नेट विक्रीसाठी उपलब्ध आहे.

विशेष

# फ्रान्सिस्कन वारसा : कृपादानाचे जिवंत साक्षीदार

**- फादर नितीन डिसोजा**
संत जोसेफ चर्च, उमराळे

माणसाच्या आयुष्यातील काही ओझी डोळ्यांना दिसत नाहीत. ती वैद्यकीय अहवालांत नोंदली जात नाहीत. त्यांच्या खुणा शरीरावर उमटत नाहीत; पण मनाच्या आत खोलवर त्यांचे वजन सतत जाणवत राहते.

आजच्या जगाला यशापेक्षा अधिक गरज आहे ती करुणेची. कारण यश टाळ्या मिळवून देते. करुणा माणूस वाचवते. आपण अनेक भाषणे विसरतो. अनेक चेहरे काळाच्या प्रवाहात विरून जातात. पण आयुष्यात एखाद्या वेळी भेटलेली माया... एखाद्याने दिलेला आधार... एखाद्याने दाखवलेला विश्वास... हे मात्र मनाच्या कप्प्यात कायम जिवंत राहतात. कधीकधी ऐकून घेणारा कान, समजून घेणारी नजर किंवा उघडे मन, माणसाचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकू शकते. अशाच करुणेचा स्पर्श असिसीकर संत फ्रान्सिस ह्यांच्या जीवनातून जगाने अनुभवला.

आठशे वर्षांपूर्वीचा तो तरुण सुरुवातीला आपल्यासारखाच होता. त्याचीही स्वप्ने होती. त्यालाही मान-सन्मान हवा होता. त्यानेही आयुष्याबद्दल काही ठरवून ठेवलेले विचार होते. पण देवाच्या योजना अनेकदा आपल्या योजनांपेक्षा वेगळ्या असतात. जीवनाने त्याला थांबवले. प्रश्न विचारायला भाग पाडले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इतरांच्या वेदना पाहायला शिकवले. त्या दिवसापासून फ्रान्सिसची दृष्टी बदलली. त्याला गरीब माणूस आपला वाटला. त्याला आजारी माणूस किळसवाणा वाटेनासा झाला. त्याला पापी माणूस नाकारण्यासारखा वाटेनासा झाला. प्रत्येकामध्ये त्याला देवाचे लेकरू दिसू लागले आणि ह्याच बदललेल्या हृदयातून उगम झाला अशा जीवनदृष्टीचा, जी आजही जगाला प्रेरणा देते. संत फ्रान्सिसकडे फारसे काही नव्हते. पण त्याने असंख्य आयुष्ये समृद्ध केली. त्याच्याकडे सत्ता नव्हती; पण त्याचा प्रभाव अनेक राजांपेक्षाही दूरवर पोहोचला. त्याच्याकडे



सैन्य नव्हते; पण त्याने माणसांची मने जिंकली. फ्रान्सिस महान ठरला तो त्याने काय मिळवले ह्यामुळे नव्हे; तर तो काय बनला ह्यामुळे. विभाजित जगात शांततेचा दूत. संपत्तीच्या मोहात अडकलेल्या जगात साधेपणाचा संदेशवाहक. दु:खाच्या छायेतही आनंद शोधणारा एक प्रवासी व ख्रिस्ताच्या प्रेमाचे प्रतिबिंब बनलेला एक माणूस.

आठशे वर्षांनंतरही जगाला फ्रान्सिसने दिलेल्या साक्षीची गरज आहे. अधिक गोंगाटाची नव्हे, अधिक वादांची नव्हे, अधिक न्यायनिवाड्यांची नव्हे. जगाला गरज आहे करुणेने भरलेल्या हृदयाची. सेवेसाठी पुढे सरसावणाऱ्या हातांची आणि प्रत्येक माणूस प्रेमास पात्र आहे ह्याची जाणीव करून देणाऱ्या जीवनांची. आज आपण पूर्वीपेक्षा अधिक जोडले गेलो आहोत. तरीही एकटेपणा वाढत आहे.


> **आठशे वर्षांनंतरही संत फ्रान्सिस असिसी ह्याने दिलेल्या साक्षीची गरज आहे.**

संवाद वाढला आहे. पण समज कमी होत आहे. माहितीचा साठा वाढला आहे. पण माणुसकीचा स्पर्श दुर्मीळ होत चालला आहे. अशा काळात संत फ्रान्सिस आपल्याला एक वेगळेच आव्हान देतो. संत फ्रान्सिसने कधीच लोकांना स्वत:ची स्तुती करायला सांगितले नाही. त्याने लोकांना ख्रिस्ताचा मार्ग स्वीकारायला शिकवले. त्याने शांततेचा संदेश दिला, कारण तो स्वत: शांततेने जगला. त्याने नम्रतेबद्दल सांगितले, कारण ती त्याच्या स्वभावाचा भाग बनली होती. त्याने प्रेमाची शिकवण दिली, कारण त्याने प्रथम स्वत:ला त्या प्रेमाने बदलू दिले होते आणि कदाचित प्रत्येक पिढीला हेच निमंत्रण दिले जाते. फ्रान्सिसला फक्त स्मरणात ठेवण्याचे नव्हे; तर त्याने जगलेली मूल्ये आपल्या जीवनात उतरवण्याचे. निराशेच्या ठिकाणी आशा नेण्याचे. मतभेदांच्या ठिकाणी शांतता नेण्याचे. कटुतेच्या ठिकाणी क्षमा नेण्याचे आणि प्रत्येक व्यक्तीत देवाचे प्रतिबिंब ओळखण्याचे.

कल्पना करा - आपल्या सहवासानंतर एखाद्याचे मन थोडे हलके झाले तर? आपल्या शब्दांमुळे एखाद्याच्या जखमेवर फुंकर घातली गेली तर? आपल्या उपस्थितीमुळे एखाद्याला पुन्हा आशेची किरणे दिसली तर? कदाचित तेव्हाच फ्रान्सिसची शिकवण आपल्या जीवनात उतरू लागते. हीच फ्रान्सिस्कन वारशाची खरी ओळख आहे. वारसा जपला जात नाही कारण तो इतिहासात लिहिला आहे. वारसा जिवंत राहतो कारण तो कोणाच्यातरी जीवनात उतरतो.

ह्या विशेष फ्रान्सिस्कन वर्षात आपण स्वत:ला एक प्रश्न विचारूया - लोक आपल्या आयुष्यात येतात तेव्हा त्यांना काय अनुभवायला मिळते? न्याय की समजुतदारपणा? दूरावा की स्वीकार? कठोरता की करुणा? जे जसे आले तसेच परत जातात? की थोडे हलके होऊन निघून जातात? आठशे वर्षांनंतरही संत फ्रान्सिस जगाशी संवाद साधत आहे.

भव्य स्मारकांतून नव्हे, समारंभांतून नव्हे, इतिहासाच्या पानांतूनही नव्हे; तर प्रत्येक त्या जीवनातून - जे न्यायापेक्षा प्रेम निवडते, संघर्षापेक्षा शांतता निवडते आणि स्वार्थापेक्षा सेवा निवडते. संत फ्रान्सिस ह्यांनी आयुष्यभर वारसा निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी फक्त ख्रिस्ताच्या पावलांवर चालण्याचा प्रयत्न केला. वारसा आपोआप निर्माण झाला. ●



FLORENCE TOURS & TRAVEL
FLORENCE
TOURS & TRAVELS
INTERNATIONAL
BHUTAN
5th November 2026
6N / 7D
SRI LANKA
5th November 2026
5N / 6D
JAPAN
CHERRY BLOOSAM
29th March 2027
SOUTH KOREA
CHERRY BLOOSAM
15th April 2027
CHINA HONG KONG AND MACAO
6th November 2026
29th Mar 2027
7N / 8D
DUBAI
5th November 2026
11th January 2027
4N / 5D
VIETNAM
5th November 2026
26th January 2027
7N / 8D
DOMESTIC
CORDELIA CRUISE 2N WITH KERALA 3N
12th Oct 2026 | 23rd Oct 2027
ASSAM MEGHALAYA
10N / 11D
03rd Nov 2026 | 20th Apr 2027
DARJILING AND GANGTOK
05N / 06D
04th Nov 2026 | 18th Apr 2027
INCLUSIONS
Pickup Drop
Flight
Visa
Hotels
Sightseeing
All Meals.
Brian Dabre
7710027271
Wilfred Pereira
9922638520

ललित

# ओलाव्याच्या स्मृतीत परतणं

**-फा. ओनिल फरोज**
वाडा

आभाळ हलू लागते फक्त पावसाने नाही, तर एखाद्या दीर्घकाळ दडपलेल्या श्वासाने आणि मग रिमझिम थेंबांच्या भाषेत पृथ्वीशी संवाद सुरू करते, ही केवळ पावसाची सुरुवात नाही, हा एक पुनर्भेटीचा क्षण असतो. जिथे माती, हळूच म्हणते, मी अजूनही इथेच आहे, तुझ्या प्रत्येक विस्मरणानंतरही जिथे विस्मरण संपते, तिथेच ओळखीचा पहिला अंक सुरू होतो आणि हरवलेले अस्तित्व पुन्हा स्वत:ला सापडते.

थेंब आले की फक्त मातीच नव्हे, तर काळाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मनाच्या कोरड्या वाटाही ओलावतात. तेव्हा कळते मातीलाही मन असते, तिच्या कुशीतून जीवन पुन्हा उगवते आणि आपण आपल्या जगण्यालाही नव्या अर्थाने स्पर्श करतो.

मग उन्हालाही पालवी फुटते कारण पावसाने एक सत्य शिकवले आहे, प्रत्येक कोरड्या क्षणातही जीवन दडलेले असते आणि ह्या सगळ्यात टपटप पडणाऱ्या त्या साध्या नादात एक मोठं रहस्य दडलंय, की पाऊस फक्त जमिनीला भिजवत नाही तो आपल्या आतल्या कोरड्या जागांनाही हळूच स्पर्श करतो.

झाडेही आपले हात उघडतात, त्या अदृश्य स्पर्शासाठी जो केवळ देहाला नाही, तर अस्तित्वालाच ओलावा देतो. स्वीकार म्हणजे नि:शब्द प्रार्थना असते, जिथे काही मागायचं नसते, फक्त उघडं व्हायचं असते.

वेलींच्या पुलावरून घाईने निघणारे थेंब वेळेच्या काठावरून घसरत जाणाऱ्या आठवणींसारखे असतात, काही धरून ठेवाव्याश्या वाटतात, काही निसटू द्याव्या लागतात. प्रत्येक पानात आपल्या न सांगितलेल्या कथा, आपल्या न वाचलेल्या वेदना कुंडलीसारख्या दडलेल्या असतात. पानात दुमडलेल्या आठवणी म्हणजे जगण्याच्या गोंगाटात कोणीतरी अजूनही आपल्यासाठी एक शांत कोपरा राखून ठेवला आहे. हे शांत कोपरेच खरे आश्रयस्थान असतात, जिथे न बोललेलंही पूर्ण ऐकलं जाते.



गवताच्या नाजूक गोफात पाण्याचे मन ओवले जाते, तिथे प्रत्येक थेंब एक भावना होते आणि प्रत्येक भावना एक शांत स्वीकार असतो. पण स्वीकार हा शेवट नसतो, ती एक सुरुवात असते, जिथे प्रत्येक प्रतिकार विरघळून जातो.

डोंगरभर पसरणारा गारवा केवळ थंडावा नसतो, तो एक विराम असतो, धावपळीच्या आयुष्यात जिथे आपण स्वत:ला पुन्हा पहिल्यांदा ऐकू लागतो.

Pause is not emptiness,
It is where the self returns
between two breaths,
you hear your own name again.

धूसर निळा पारवा त्या साऱ्या दृश्याचा साक्षीदार, ना पूर्ण आकाशाचा, ना पूर्ण जमिनीचा, तर दोघांच्या मध्ये अडकलेल्या मानवी मनासारखा, पूर्णपणे एका शोधात हरवलेला. पांढरे झरे डोंगराच्या कातळावरून वाहू लागतात. जणू काळाच्या कठीणतेलाच हळूहळू झिजवत सांगतात की कोमलतेतही एक विलक्षण सामर्थ्य असते. ओले पाखरू डोळ्यांत नभाचा गूढ काजळ भरून थबकते. ते उडत नाही, ते आकाशाला स्पर्शून परत येते आणि मग निळाईच स्वत:ला त्याच्या पंखांत थेंबथेंब ओतते. धुके जेव्हा उतरते, ते केवळ दृश्य लपवत नाही, ते जाणिवेवर पडदा टाकते. वारा त्याला अलगद ओढतो, सत्य उघड करण्याची एक नि:शब्द चाचपणी.

रान अचानक उघडे पडते, हिरव्या रंगाला एक वेगळेच भान येते, अस्तित्वाला क्षणभर स्वत:चे भान मिळते. थेंब रानात फिरतात उजळ माथ्याने, जणू कुणी संन्यासी अनवाणी चालत आहे पानांच्या मंदिरात. श्रावणी ऊन ओल्या पानांत आरती घडवते आणि प्रत्येक किरण जळणाऱ्या वातेसारखा क्षणाचा अर्थ उजळवतो.

ह्या नव्या पालवीखाली दिवसही हिरवे झालेली असतात. प्रकाशाचे हे रूपांतर फक्त रंगाचं नसते, तर दृष्टिकोनाचं असते. प्रकाशालाही समजून आलं असते

की केवळ उजळणं पुरेसं नाही, तर जीवनाला स्पर्श करायला त्याला मृदू व्हावं लागते, संवेदनशील व्हावं लागते. ह्या हिरव्या उजेडात असंख्य आठवणींची शांत सावली असते. जिथे आनंद आवाज करत नाही, दु:ख ओझं राहत नाही आणि प्रत्येक क्षण नव्याने जगता येतो.

नदी ती फक्त वाहत नाही, ती माहेरवाशीण बनते आणि रानभर झिम्मा खेळताना आपल्या लहरींमध्ये आठवणींचे कंकण वाजवते. पण तिच्या प्रवाहातच आठवणींचे खरे घर असते, थांबणं म्हणजे कधीकधी विसरणंही असते.

सागरात लाटांचा उंच फणा उठतो. ते केवल उधाण नसते, ते असते एक अंत:स्पंदन, एक उसळी जी दीर्घकाळ साचलेल्या शांततेतून अचानक स्वत:चं अस्तित्व जाहीर करते. त्या क्षणी लाट

> **जिथे थेंब थांबतात, तिथेच शांततेची बीजं उगवायला लागतात.**

स्वत:लाच ओळखत असते, तिच्या उंचीमध्ये एक क्षणिक अभिमान दडलेला असतो आणि मग ती किनाऱ्याकडे येते. आपली शुभ्र कात टाकून, आपला सारा आवेग विसरून.

प्रत्येक उन्माद शेवटी स्वत:च्या विरघळणाऱ्यातच पूर्णत्व शोधतो. इंद्रधनुष्य आभाळावर रेखाटलेली एक नाजूक भविष्यवाणी, ऊन आणि पाण्याच्या संगमातून जन्मलेली एक शांत घोषणा की विरोधांतूनी सौंदर्य उगवते. हा हिरवा प्रदेश फक्त दृश्य नाही, तो एक आदेश आहे अंतर्मनाला दिलेला, की सोडून दे आपली सुरक्षित खुराडे आणि धारण कर पावसाचा वेष, भिज, विरघळ, सीमा विसर, कारण रानात भिजताना कधी कधी असे वाटते आपण कुठेतरी जात नाही, तर परतत आहोत त्या पहिल्या स्पर्शाकडे, त्या मातीच्या उबेकडे, जिथे अस्तित्व पहिल्यांदा स्वत:ला घर म्हणाले होते आणि शेवटी पाऊस थांबतो, पण त्याचा ओल मातीच्या स्मरणात राहतो. कदाचित हा पाऊस बाहेर पडत नसतोच तो आतच कोसळत असतो आणि प्रत्येक थेंब आपल्याला आपल्याकडेच परत नेत असतो.

जिथे थेंब थांबतात, तिथेच शांततेची बीजं उगवायला लागतात आणि त्या शांततेत आपण स्वत:ला पहिल्यांदा निर्व्याजपणे स्वीकारतो. कदाचित म्हणूनच प्रत्येक पाऊस हा शेवट नसतो, तो एक आतून उमलणारा प्रारंभ असतो.

मोबाईल : 76 20 70 21 96

●


## INFANT TOURS & TRAVELS

1) **Jaipur, Jodhpur, Jaisalmer,** Sand Dunes, Stay in Super Deluxe Tenst in the desert fully furnished
Date : 08th Nov. to 16th Nov. 2026.
Cost : Rs. 31,000/- Twin Sharing.
Rs. 29,000/- Triple Sharing.

2) **(Kerala) Cochin Alleppey, Munnar, Trivandrum, Kovalam**
Date : 13th Nov. to 22nd Nov. 2026.
Cost : Rs. 33,000/- Twin Sharing.
Rs. 31,000/- Triple Sharing.

3) **Hyderabad Ramoji Film City**
Date : 16th Nov. to 20th Nov. 2026.
Cost : Rs. 16,500/- Twin Sharing.
Rs. 14,500/- Triple Sharing.

* Train Journey by 3Tier A.C., Stay in Star category hotels. Breakfast, Lunch, Dinner (Veg. And Non-Veg.). Sightseeing by A/C Buses.

* **For Booking & Details Contact :-**

1) Johnson Miranda : 7387483220
2) Vijay D'Souza : 8796848900
3) Branklyn Rodrigues : 8976442743
4) Sunny Gadekar : 9892074548
5) Rohin Damania : 9987190500

## जॉली टूर्स

**१) वेलंकनी मातेचा नोव्हेना :** (हॉटेल मॉर्निंग स्टार चर्चपासून १ मिनिटावर) : दि. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६.
**संपूर्ण नोव्हेना :**
१) ए.सी. प्रवास व रूम रु. २७,५००/-
२) नॉन ए.सी. प्रवास व रूम रु. १८,५००/
**पाच दिवसांचा नोव्हेना :**
१) ए.सी. प्रवास व रूम रु. १८,५००/-.
२) नॉन ए.सी. प्रवास व रूम रु. १३,५००/-
३ किंवा चार व्यक्तीस एक रूम. स्वतंत्रपणे येणाऱ्यास राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध.

**पावसाळ्यातील सहली**

**१) महाबळेश्वर :** दि. ७ ते ९ ऑगस्ट २०२६. रु. १०५००/-.
**२) भंडारधरा :** दि. २२ ते २३ ऑगस्ट २०२६. रु. ६०००/-.

**दिवाळी सुट्टीतील सहली**

**१) केरळ दर्शन-त्रिवेंद्रम-कन्याकुमारी-अलॅप्पी-कोचीन, टेक्कडी व मुन्नार :** दि. ५ ते १४नोव्हें.'२६. रु.३९०००/-.
**२) हैद्राबाद-रामोजी सिटी-स्नोवर्ल्ड-गोवळकोंडा सहल** दिनांक ७ ते १२ नोव्हेंबर २०२६. रु. १५५००/-.

**संपर्क :-** १) श्री. डॉमणिक : **8087036615**
२) श्री. लुईस : **9823844883**
३) श्री. पिटर : **8806212751**

# संत इग्नेशियस लोयोलाची आध्यात्मिक साधना...

-फा. जॉन फरोज, ये.सं.
उपलाट, तलासरी



१५२२ मध्ये स्पेन देशातील मनरेसाच्या नदीकिनारी संत इग्नेशियसला परमेश्वराचे दर्शन घडले. परमेश्वराच्या दर्शनानंतर त्याच्या जीवनाच्या दिशा, वाटा बदलल्या. संत इग्नेशियसने मनरेसाच्या गुहेत तप-साधना केली. देवाचा सखोल अनुभव घेतला. त्या अनुभवातून आणि इतर सकारात्मक अनुभवातून त्यांनी आध्यात्मिक साधनेचे धडे तयार केले. ती आध्यात्मिक साधना स्वत: करून, त्यांनी इतर भाविकांना त्या साधनेचे धडे दिले. हे आध्यात्मिक धडे पुस्तकी आणि इतर आध्यात्मिक ज्ञानाच्या पलीकडील होते, म्हणून अनेक भाविक ह्या साधनेकडे आकर्षित झाले.

१५३७ मध्ये संत इग्नेशियस आणि त्याचे सहकारी रोममध्ये पोपना भेटण्यासाठी जात असताना, रोमच्या वाटेवर पुन्हा एकदा संत इग्नेशियसला परमेश्वराचे प्रभावी दर्शन त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्याबरोबर झाले. हे दर्शन म्हणजे संत इग्नेशियसचे पाचारण होते. त्या दर्शनाने परमेश्वर आपल्या पुत्रासह संत इग्नेशियसला येशू ख्रिस्ताची आणि त्याच्या मिशनची, लोकांची सेवा करण्यास बोलावीत होता. पोपची भेट घेण्यास संत इग्नेशियसला देव म्हणतो, ''मी रोममध्ये तुला आणि तुझ्या साथीदारांना साथ देईन.'' ही घटना, हे दर्शन पोपची मान्यता आणि जेज्वीट संस्थेच्या स्थापनेचा महत्त्वाचा क्षण ठरला. ह्या दर्शनातून १५४० साली जेज्वीट संघाची स्थापना झाली.

आपल्या सर्वच कार्याचा परमेश्वराचा शोध आणि अनुभव घेणे, हा मूलभूत मंत्र संत इग्नेशियसने जेज्वीटांना दिला. ह्यासाठी संत इग्नेशियसची आध्यात्मिक साधना उपयुक्त ठरत आहे. ''परमेश्वराने आपला पुत्र येशू ह्याच्या देहधारणाद्वारे निर्मितीबरोबर एक प्रेमाचे अतूट नाते निर्माण केले.'' ह्या प्रेममय रेशमी धाग्यांतून आध्यात्मिक साधनेमध्ये परमेश्वराच्या प्रेमाचा शोध अनेक साधकांनी ध्यान-साधनेद्वारे घेतला आहे आणि घेत आहेत. ध्यानसाधना ही आध्यात्मिक चिंतन आणि साधना संत इग्नेशियसने आपल्या जेज्वीट सभासदांपुढे आणि चर्चपुढे मांडली आहे. परमेश्वराचा अनुभव घेण्यास भाविकांनी ह्या साधनेद्वारे ध्यानमग्न अवस्थेत जीवन जगावे ही संत इग्नेशियसची अपेक्षा आहे.


संत इग्नेशियस प्रणित अध्यात्म साधना पद्धती ही ख्रिस्ती विश्वासातून उत्स्फूर्तपणे आलेली आहे. म्हणून संत इग्नेशियसचा अध्यात्म मार्ग ख्रिस्तावरील श्रद्धा, ख्रिस्ताची करुणा, पवित्र त्र्यैक्याचे ऐक्य, पवित्र मरियेवरील भक्ती आणि मानवी न्यायप्रीती वाटचाल करणारा एक आध्यात्मिक मार्ग आहे. मानवी जीवनाची प्रगती घडवून आणायची असेल आणि आपल्याला सर्वस्वी समर्थ बनायचे असेल, तर संत इग्नेशियसच्या ख्रिस्तप्रणित अध्यात्माच्या मार्गाने वाटचाल करावी लागेल.

**मानवी जीवनाची प्रगती घडवून आणायची असेल; तर संत इग्नेशियसच्या ख्रिस्तप्रणित अध्यात्माच्या मार्गाने वाटचाल करावी लागेल.**

संत इग्नेशियसची आध्यात्मिक साधना येशू ख्रिस्ताच्या जीवनमूल्याकडे, जीवनमार्गाकडे आणि मानसिकतेकडे दृष्टिक्षेप टाकते. ह्या साधनेद्वारे सर्वस्वी सर्वांच्या भल्याचा विचार केला जात आहे. ''परमेश्वर आपल्या प्रत्येक निर्मितीत, सर्व व्यक्तीत, निसर्गात आहे'', हा व्यापक विचार आध्यात्मिक साधनेत व्यक्त केला आहे. पवित्र त्रैक्य, पवित्र आत्मा आणि मिस्सा विधी साजरे करण्यात भावनापूर्वक ख्रिस्ताचे जीवन साजरे करणे आणि आपली श्रद्धा, भक्ती कृतिशील बनवणे, हेच संत इग्नेशियसचे आध्यात्मिक साधनेविषयी ध्येयस्वप्न होते आणि आहे.

संत इग्नेशियसच्या आध्यात्मिक रोजनिशीत व साधनेत निसर्ग मानव मुक्ती, धर्म, आणि समाज आणि आध्यात्मिक विकास ह्या परमेश्वराच्या योजनेचे प्रयोजन व उपयोजन सामावलेले आहे. ह्या रचनेद्वारे साधक प्रार्थनामय बनतो. त्यांची अंत:दृष्टी व्यापक बनते आणि तो नेहमी परमेश्वराच्या सान्निध्यात वावरतो. आध्यात्मिक साधनेच्या काही दिवसांच्या तपसाधनेत साधकाचे परिवर्तन होते आणि तो परमेश्वराच्या मिशनकार्यात कार्यशील होतो, प्रेरक बनतो. ही साधना एक प्रक्रिया आहे. ती सातत्याने करावी लागते. परमेश्वराशी पूर्णपणे एकरूप होणे, प्रार्थनेद्वारे व साधनेद्वारे पावित्र्याचा अनुभव घेऊन पवित्रमय जीवन जगणे हा ह्या साधनेचा मुख्य गाभा, आत्मा आहे.

संत इग्नेशियसनी साधकांना नकारात्मक हेतूच्या बाहेर पडून नेहमी सकारात्मक भावनेने जीवन जगण्याचे आवाहन केले आहे. संत इग्नेशियसच्या अनुभवानुसार सकारात्मक आणि प्रेरणादायी उद्दिष्टे साधकास तारण प्राप्ती करून देते. साधकाच्या जीवनातून दैवीपणाचे प्रकटीकरण होत जाते आणि साधकाचे जीवन सुसंगत बनविते. साधक परमेश्वराशी ऐक्य साधतो, परमेश्वराच्या मिशनकार्यात सेवामय बनतो. ●


Angel Tours & Travels Pvt. Ltd.
IATA
29 August to 3 September 2026
Rooms are Available
VELANKANNI
September 2026 & May 2027
11 Nights & 12 Days
AMERICA
September 2026
04 Nights & 05 Days
SINGAPORE
September November 2026
04 Nights & 05 Days
SRILANKA
September November 2026
04 Nights & 05 Days
BAKU
September 2026
05 Nights & 06 Days
ALMATY
September November 2026
06 Nights & 07 Days
BHUTAN
October November December 2026
06 Nights & 07 Days
KERALA WITH CORDELIA
03 Nights & 04 Days
GOA WITH CORDELIA
October November December 2026
04 Nights & 05 Days
DUBAI WITH ABU DHABI
November 2026
06 Nights & 07 Days
SRI LANKA & MALDIVES
September November 2026
04 Nights & 05 Days
THAILAND
November 2026
07 Nights & 08 Days
SOUTH KOREA
November 2026
07 Nights & 08 Days
VIETNAM
January May 2027
08 Nights & 09 Days
SOUTH AFRICA
November 2026
05 Nights & 06 Days
HONGKONG & MACAU
angeltravels
angeltravels_
Angel tours and travels Pvt Ltd
Follow us on our Social Media Platform
or write us at
operations@angeltravels.co.in
www.angeltravels.co.in
Terms and Conditiond Applied *
Joyce Carneiro 8830845202
8799853496 / 7499832889 / 9325767404
Suvarna Mundiyath (Malad)
9511891845
Anand Michael Dias. 9975256556
Krupa Ratna, Village - Nonodi Vatar, Nandakhal
Branch Office, Shop No 02, Spring Field Building, 1 A Sundar Lane, Behind St. Annes School, Malad, Orlem 400064

# आई, मला भूक लागली!

-फा. किरण लोपीस
प्राचार्य, टी.बी. कॉलेज, पापडी


''शाळा सुटली, पाटी फुटली, आई मला भूक लागली, जेवायला काय? जिळा-मोडी तवकट फोडी!'' हे वाक्य ऐकल्यानंतर बालपण आणि त्यामधील शाळा व घरातील सर्व घडामोडी आठवत असतील. शाळेतून येताना प्लास्टिकच्या किंवा कापडी पिशवीतील आपल्या खांद्यावरील दप्तर, अंगभर घाम, रस्त्यावरून येताना ऋतुनुसार दगड मारण्यासाठी निवडलेली झाडे व त्यावरील फळे, शाळेबाहेर बसणाऱ्या बोरेवाली, करवंदवाली, भेळवाले आणि शाळेतील गुरुजींचा रागीट पण मायेचा स्वभाव हे सारे डोळ्यांसमोर उभे राहते.

ह्या सर्वांसोबत चेहऱ्यावरचा प्रचंड घाम, पोटात ओरडणारे कावळे, घराकडे धावणारी पावले, घरातील पहिल्या पायरीवर टाकलेले पाऊल आणि आईला मारलेली हाक - ''आई, मला भूक लागली!'' ह्यात फक्त शरीराची भूक नव्हती; त्याही पलीकडचे भावनेचे रूप होते.

कवी विजयकुमार मिठे ह्यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर -

*''तुझ्या हातची भाकर, तिला गोडी अमृताची,*
*नुसत्या वासानेच भरले पोट आम्हां लेकरांचे*
*तुझा चंदनाचा देह झाला चंदनी देव्हारा,*
*साऱ्या काळजाच्या वाती, शब्द गाभारा.''*

सध्या कौटुंबिक स्वरूप बदललेले आहे. आईची 'मम्मी' झाली. मम्मीची 'मॉम' झाली; पण मुलांची भूक तीच आहे आणि आईची माया तसूभरही कमी झालेली नाही. मात्र आधुनिक युगातील आईची भूमिका निश्चितच बदललेली आहे. हा बदल समजावून घेताना बालकाच्या जीवनातील मूल्यसंस्कार, त्यांच्या जीवनातील आहाराची आध्यात्मिकता आणि पौष्टिक अन्नाचा शास्त्रशुद्ध अभ्यास ह्यांचा विचार



करावा लागतो. आपल्या मुलांनी काय खावे, किती खावे आणि केव्हा खावे ह्याचे भान देण्याची नैतिक जबाबदारी आज आईवर येऊन पडलेली आहे. म्हणूनच आई म्हणजे -

*''भाजीतलं मीठ जणू काही,*
*ते पहिलं विद्यापीठ*
*फळातला गर,*
*घरच्या कष्टाची भाकर.''*

> **पूर्वी आई घरात राहून मुलांची काळजी घेत असे. आज ती परिस्थिती बदलली आहे.**

पूर्वी आई घरात राहून मुलांची काळजी घेत असे. आज ती परिस्थिती बदलली आहे. अनेक माता नोकरी करणाऱ्या आहेत. त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या आहेत. आव्हानात्मक परिस्थितीत आपल्या मुलांच्या शारीरिक वाढीमध्ये तिची जबाबदारी प्राधान्य क्रमावर आहे. मुलांच्या आरोग्यदायी भवितव्यासाठी सर्व मातांनी काही गोष्टी विशेष लक्षात घेणे आवश्यक आहे. आईने मुलांना घरातील अन्नासाठी विशेष प्रवृत्त करावे. मुलांच्या आहारात घरगुती आणि पौष्टिक पदार्थांचा समावेश असावा. ताज्या भाज्या, फळे, दुग्धजन्य पदार्थ, डाळी, कडधान्ये, अंकुरित धान्ये, भाकरी, पोळ्या, भात तसेच नैसर्गिक ऊर्जा देणारे पदार्थ ह्यांचा समावेश असणे आवश्यक आहे. हे सर्व पदार्थ शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने पुरवतात.

दुसरीकडे बाजारातील जंक फूड, अति तेलकट पदार्थ, शीतपेये आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ. हे पदार्थ मुलांना खूप आवडतात; किंबहुना त्यांनाच ते अधिक हवे असतात. अशा अयोग्य पदार्थांच्या अति सेवनामुळे लठ्ठपणा, पचनाचे विकार आणि इतर आरोग्य-विषयक समस्या उद्‌भवू शकतात. ह्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. शाळेमधील पोळी-भाजी हाही एक महत्त्वाचा भाग आहे. शाळेत जाताना मुलांना दिल्या जाणाऱ्या डब्यात पोळी-भाजी, विविध प्रकारची फळे आणि पौष्टिक पदार्थ असणे आवश्यक आहे. त्यांचा वापर अधिक प्रमाणात झाला, तर तो मुलांच्या शारीरिक वाढीसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

एक आई म्हणून आपल्या मुलांची निगा राखताना तिने ह्या सर्व बाबींमध्ये संयम पाळणे आवश्यक आहे. ''आई, मला भूक लागली!'' ह्या ओळीमध्ये त्या आईची मुख्य भूमिका आपल्या मुलाच्या शारीरिक, भावनिक आणि आध्यात्मिक वाढीशी जोडलेली आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आईने ह्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. उत्कृष्ट आहार, नियमित व्यायाम आणि शाळेतील अध्ययन-अध्यापन ह्या त्रिसूत्रींच्या साहाय्याने तुमची मुले यशाचे शिखर गाठू शकतील, ह्याची खात्री आहे.

मोबाईल : 91 58 45 43 34

# ॲरॉन टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : श्री. मायकल बरबोज व सौ. आर्पिना बरबोज**
**मो. : ९८५०५३३२१४, ९२८४५०३९६१**

१) **मद्रास वेलंकनी नोव्हेना :** दि. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. एकूण खर्च रु. २९,५००/-. प्रत्येकी. ३ ए. सी रेल्वे प्रवास-ए.सी. रूम-जेवण. रु. २४,५००/-. प्रत्येकी. ए.सी. रूम व जेवण रु. १३,५००/- प्रत्येकी. ५ दिवस दि. २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर ए.सी रूम व जेवण रु. १५,५००/- प्रत्येकी, ६ दिवस, दि. ३ ते ८ सप्टेंबर ए.सी. रूम व जेवण. २ बेडरूम ४ जणांसाठी, ३ बेड ५ जणांसाठी व ४ बेड ६ जणांसाठी, डिलक्स रूम व दोघांसाठी एक्स्ट्रा चार्ज असेल. हॉटेल पिकनीक, मॉर्निंग स्टार चर्च जवळ.

२) **बडोदा (Statue of Unity) व सुरत सहल :** दि. १४ ते १६ ऑगस्ट २०२६. मुंबई-बडोदा वंदेभारत व सुरत-विरार. ए.सी.ट्रेन प्रवास. डिलक्स ३ स्टार हॉटेल. व्हेज-नॉनव्हेज बुफे. खर्च प्रत्येकी रु. १३,०००/- व १२ ते १४ सप्टेंबर. गणपती हॉलीडे.

३) **सेंट ज्युड - झांशी :** दि. २४ ते २९ ऑक्टोबर २०२६.

४) **केरळ सहल :** दि. ४ ते १४ नोव्हेंबर २०२६.

५) **राजस्थान सहल :** दि. ४ ते १५ नोव्हेंबर २०२६.

*Best Compliments From Dolly & Sunil Dmello*

## SAHIL FOREX AND TRAVEL PVT. LTD.

PAN : AAMCS1130L
GSTN : 27AAMCS1130L2X7(MH)
CIN : U63040MH2008PTC183589

(RBI Aproved Authorised Money Changer, Since - 2009)

- Buying And Selling Of Foreign Currencies.
- Travel Cards For Foreign Travel.
- Travel Insurance
- Send Money Abroad
- Domestic Money Transfer
- Western Union
- Money Gram.



Foreign Currency Exchange Services
For Your Business And Personal Needs

Foreign Exchange, Multi Currency Travel Cards
And Send Money Abroad

Lawrence Trade Center, Below Bassien Catholic Co-op. Bank,
Manickpur Branch, Vasai Road (W) 401 202,
Tel : 9324087038, Email: sahilforex@gmail.com • Web.: www.sahilforex.com

## SARAH TOURS ADVENTURES

**Vasai's Trusted Travel Partner**
*Every Journey Matters!*

★ LOYAL & REPEAT CUSTOMERS– SPECIAL DISCOUNTS ★

"You Dream It — We Handle Everything"

SIT BACK &TRAVEL · WE TAKE CARE OF THE REST

❖ OUR SERVICES ❖

✈ **FLIGHT BOOKINGS:** Domestic & international at best fares
**TRAIN TICKETS:** IRCTC bookings – we do the hard part
✓ **PASSPORT WORK:** New, renewal & urgent applications
**VISA PROCESSING:** All countries – fast & reliable
⚡ **FAST TRACK IMMIGRATION:** Skip the queue – stress-free airport
**HOLIDAY PACKAGES:** India & worldwide – all budgets

❖ UPCOMING GROUP TOUR DEPARTURES ❖

**EXPEDITION 01 — Discover China**

10 Nights · 11 Days | 20th– 30thSeptember 2026
• Great Wall & Forbidden City
• Terracotta Army,
*Guangzhou * Shanghai *Beijing

**STARTING FROM Rs. 1,24,000 / person**

**EXPEDITION 02 — Winter in Sri Lanka**

5 Nights · 6 Days | 20 – 25 September 2026
• Bentota Beach & Galle Fort
• Nuwara Eliya Tea Trails
• Kandy & Colombo · 4★ Hotel

**STARTING FROM Rs. 80,000 / person**

**EXPEDITION 03 – LADIES & TEACHERS SPECIAL – EXPLORE VIETNAM**

6 Nights · 7 Days | 9thNovember to 15thNovember 2026
• Phu Quoc Island & Beaches
• Ho Chi Minh City Tour
• Cu Chi Tunnels · Hotel Incl.

**STARTING FROM Rs. 85,000 / person**

👩 🏫 Ideal for Teachers, School Staff & Ladies Groups

❖ VISIT US ❖

H.No 699, First Floor, Dnyandeep Niwas,
Lembhatwadi, Vasai – 401 201
CALL / WHATSAPP
Sarah Pereira: 7020268389
Malcolm Pereira: 9823037894
*sarahtoursandadventures@gmail.com*

SARAH TOURS &ADVENTURES · EVERY JOURNEY MATTERS! · VASAI
DOMESTIC & INTERNATIONAL TRAVEL EXPERTS

# वसई किल्ल्यातील तीन ऐतिहासिक चर्चेसची भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून (ए.एस.आय.) दुरुस्ती ?

**अनुवाद : मार्कुस डाबरे**, पापडी

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग (ए.एस.आय.) ऐतिहासिक वसई किल्ल्यातील सेंट बॅप्टिस्ट चर्च, सेंट डॉमिनिक चर्च आणि सेंट अगस्टीन चर्च ह्या पुरातन चर्चच्या अवशेषांवर संवर्धनाचे काम हाती घेणार आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई मंडळाच्या एका अधिकृत निवेदनाद्वारे मुंबईस्थित विनोद रोशन डिसोजा ह्यांनी पंतप्रधानांच्या तक्रार निवारण पोर्टलवर दाखल केलेल्या सार्वजनिक तक्रारीला निवेदन दिले आहे.

ह्या विस्तीर्ण किल्ल्याच्या संकुलाचा घेरा सुमारे ३,३०० मीटर असून ते सुमारे १०९ एकर परिसरात हा संपूर्ण किल्ला पसरलेला आहे. तटबंदीयुक्त ह्या परिसरामध्ये सात चर्च, तुरुंग, इस्पितळ, गोदाम, जकात घर, म्युनिसिपालिटीची



इमारत आणि अनेक वास्तूंचे अवशेष आहेत.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागा (ए.एस.आय.)ने सांगितले की सेंट फ्रान्सिस्कन चर्च, सेंट गोन्सालो गार्सिया चर्च आणि ऐतिहासिक 'बाले किल्ला' परिसरात महत्त्वपूर्ण जीर्णोद्धाराचे काम आधीच पूर्ण झाले आहे. ह्या कामांमध्ये भिंतीवर उगवलेल्या वनस्पती काढून टाकणे, दगडी फरशी, दगडी आवारांचे बांधकाम, तुटलेल्या भिंतींची जोडणी, जलरोधक आणि कचरा साफ करणे ह्यांचा समावेश होता. अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी रस्त्याच्या कडेला जाळीचे कुंपणही बसवण्यात आले आहे.

मिझरेकोर्दिया ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वास्तूच्या संवर्धनाचे प्रयत्न सुरू असून, तेथे वनस्पतींची साफसफाई, भिंतीची दुरुस्ती आणि माती-दगडांचे ढिगारे हटवण्याचे काम सुरू आहे. किल्ल्याच्या समुद्राकडील आणि जमिनीवरील दोन्ही प्रवेशद्वारांवर मूळ दरवाजांप्रमाणे लाकडी दरवाजे बसवले जात आहेत, तर उर्वरित भागांमध्ये जाळीचे कुंपण उभारले जात आहे, असेही भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

*(सौजन्य : फ्री प्रेस, ४ जून २०२६)*


**ROYAL WORLD TOURS PVT. LTD.**

TRAVEL WITH THE MOST TRUSTED NAME FOR PILGRIMAGE & WORLDWIDE TOURS

| | |
|---|---|
| *Grand Europe Tour - 17 Days*<br>*Travel date - 21st September 2026*<br>*Italy / Vatican / Austria / Germany / Switzerland / Luxembourg / Belgium / Liechtenstein / France / Spain / Portugal*<br>*Tour Cost (INR) - ~~4,30,000/-~~ 4,00,430/- all inclusive* | *Vietnam Tour - 10 Days (4 Cities)*<br>*Travel date - 5th November 2026*<br>*Hanoi / Ha Long / Da Nang / Ho Chi Minh*<br>*Tour Cost (INR) ~~1,49,000~~ 1,35,000/- all inclusive* |
| *USA Tour - 13 Days*<br>*Travel date – 17th August & 28th September 2026*<br>*New York / New Jersey / Philadelphia / Washington DC / Hershey / Niagara Falls / Buffalo / Las Vegas / Hollywood / Grand Canyon / Los Angeles / California / San Francisco*<br>*Tour Cost (INR) ~~6,70,000~~ 5,59,999/- all inclusive* | *Glory of Europe Tour - 15 Days (8 countries)*<br>*Travel date - 21st September 2026*<br>*Italy / Vatican / Austria / Switzerland / Germany / France / Spain / Portugal*<br>*Tour Cost (INR) ~~379,800/-~~ 353,000/-all inclusive* |
| *Eastern Europe Tour - 15 Days (8 countries)*<br>*Travel date - 19th August & 20th September 2026*<br>*Italy / Vatican / Croatia / Bosnia & Herzegovina / Austria / Hungary / Poland / Czech- Republic*<br>*Tour Cost (INR) ~~3,43,299/-~~ 339,930/- all inclusive* | *Holy Land Tour - 12 Days*<br>*Travel dates - 21st Sept, 19th Oct 6th, 23rd Nov & 20th Dec 2026*<br>*Jordan / Israel / Palestine / Egypt*<br>*Tour Cost (INR) - ~~1,95,000~~ INR 184,000/- all inclusive* |

Inclusions:- Air Fare / Visa / 4* Hotels / All 3 meals / Tips / City Tax / Travel Insurance up to 69 years / GST

*120 & 121, 1 st Floor, B Wing, Bhaveshwar Arcade, LBS Road, Ghatkopar (W), Mumbai - 86*
*Charles: +91-98338 32893 ; Vishakha: +91-99202 20022 ; Paul:+91-99670 14409*
*Email: charles@royalworldtours.in / Website: www.royalworldtours.in*
*Offices in INDIA, UK & USA*

*More than 29,000 satisfied passengers in last 15 years!*

# निसर्ग टूर्स आयोजित सहल

**आयोजक : ऑस्टीन : 9270080947 / 9422681516**
**विनय : 9225432233**

**१) वेलंकनी मातेचा नोव्हेना :** २७ ऑगस्ट ते १० सप्टें. २०२६. १० दिवसांसाठी वास्तव्य, ए.सी.रूम, नाश्ता, जेवण व ए.सी. रेल्वे तिकीटासहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ३०,०००/-. प्रति व्यक्ती (एका रूममध्ये चार व्यक्ती) पाच दिवसांची बुकींग करू शकता. वास्तव्य : हॉटेल व्ही.पी.एन रेसिडेन्सीमध्ये असेल.

**२) पावसाळी सहल : भंडारदरा धरण व धबधबा :** दोन दिवसीय. प्रवास २×२ ए.सी.बसने असेल. गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ६,०००/-.

**३) बरोडा : स्टॅच्यू ऑफ युनिटी, सुरत सहल :** दिनांक १४ ते १६ सप्टें. २०२६. ए.सी.रेल्वे प्रवास, वंदे भारत ए.सी.बस, श्री स्टार हॉटेल, हॉटेल सयाजी इफ्फोटेल, बुफे जेवण, सुरत मार्केट व साईड सीनसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १३,५००/-मात्र. (दोन जणांस एक रूम). रु. १२,५००/- (प्रत्येकी तीन जणांस एक रूम). रु. ११,५००/- (प्रत्येकी चार जणांस एक रूम)

**४) दिवाळी रजेतील सहल : केरळ :** कोचीन, मुन्नार, टेकडी (पेरियार), अलॅप्पी, बॅक वॉटर, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी सहल. दिनांक ७ ते १७ नोव्हें. २०२६. श्री टायर ए.सी.रेल्वे प्रवास, हॉटेल, जेवण साईड सीन व गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ४०,०००/- मात्र.

*** आम्ही ग्रुप, स्कूल, सिनियर सिटीझन पिकनिक आयोजित करून देतो.**

# WILLY TOURS & TRAVELS

**1) Velankanni Novena Tour :** 27th Aug. to 10th Sept. 2026.
Full Novena Package with 3-Tier A.C. Train Travel.
Hotel Packages : * Hotel Joy – Rs. 30,500
* Hotel Emirates – Rs. 35,500 * Hotel Balaji – Rs. 38,500
* 5 Days Package Also Available.

**2) Diwali Vacation – Rajasthan Tour** : 4th Nov. to 15th Nov.
**Tour Includes :** * 2 Nights – Jaipur, * 1 Night – Bikaner * 1 Night – Jaisalmer Hotel Stay, * 1 Night – Jaisalmer Tent Stay, * 1 Night – Jodhpur, * 2 Nights – Udaipur * 1 Night – Mount Abu. * 3-Tier AC Train Travelling Included.

**3) Assam – Guwahati, Meghalaya, Shillong & Cherrapunji Tour** : 16th Nov. to 22nd Nov.
* Flight to Flight Travelling * Package Cost : Rs.54,000
* Including Complete Tour Package.

* **Office Address :** Umbargothan Naka, Nani Apartment, Shop No. 13, Ground Floor, Agashi Vasai Road, Opposite Bhujing Center. Email: willytour123@gmail.com

| *** Contact :** | | | |
|---|---|---|---|
| | Rixon Tuscano | : | 8329084821 |
| | William Dabre | : | 8983452715 |
| | Viju Vaz | : | 9867024543 |
| | Nirmala Lopes | : | 9765347024 |

# न्यू अ‍ॅन्जल टूर्स

**आयोजक : श्री. मायकल वाझ, दारसेंग, गोम्स आळी**
**मो. : ९२०९८०३६०२**

**१) ऑगस्ट महिन्यातील वेलंकनी मातेचा नोव्हेना :**
दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. रु. २८,५००/- संपूर्ण नोव्हेना ए.सी. प्रवास ३ ए.सी. + ए.सी. रूम + घरगुती जेवण (४ जणांस १ रूम) . (वसई / मुंबई ते वेलंकनी व रिटर्न).

* रु. १७,५००/- पाच दिवसांचा नोव्हेना ए.सी. प्रवास ३ ए.सी. + ए.सी. रूम+ घरगुती जेवण (४ जणांस एक रूम). (वसई / मुंबई ते वेलंकनी व रिटर्न).

* रु. १९,०००/- सहा दिवसांचा नोव्हेना ए.सी. प्रवास ३ ए.सी. + ए.सी. रूम+ घरगुती जेवण (४ जणांस एक रूम). (वसई / मुंबई ते वेलंकनी व रिटर्न).

*** फक्त रुम्स व जेवणाचा पर्याय उपलब्ध. स्पेशल रुम्सचा पर्याय उपलब्ध.**

**२) सेंट ज्यूड नोव्हेना : झांशी, ग्वालियर सहल :**
दिनांक २४ ऑक्टो. ते २९ ऑक्टो. २०२६. जाता-येताना ३ए.सी. राजधानी + ए.सी.रूम+ घरगुती जेवण + ग्वालियर सिटी व झांशी सिटी साईटसीन (चार जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. १७,०००/- मात्र.

**३) सेंट ज्यूड नोव्हेना, झांशी, ग्वालियर आग्रा, दिल्ली सहल :**
दिनांक २१ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२६. जाता-येताना ३ए.सी. राजधानी + ए.सी.रूम+ घरगुती जेवण + ग्वालियर सिटी व झांशी सिटी साईटसीन (चार जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. २५,०००/- मात्र.

**४) संपूर्ण केरळ दर्शन : कोचीन, मुन्नार, टेकडी, अलॅप्पी, कोवलम, त्रिवेंद्रम सहल :** दिनांक ६ ते १४ नोव्हें. २०२६. जाताना ३ए.सी. (वसई ते कोचीन) येताना राजधानी (त्रिवेंद्रम ते वसई)+ ए.सी.रूम+ घरगुती जेवण + साईटसीन (तीन जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. ३४,०००/- मात्र.

**५) रॉयल राजस्थान - जयपूर, उदयपूर, बिकानेर, जैसलमेर, माऊंट अबू सहल :** दिनांक ४ ते १४ नोव्हें. २०२६. जाता-येताना ३टायर ए.सी.+ ए.सी.रूम+ घरगुती जेवण+ साईट सीन (४जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. ४०,०००/- मात्र.

**६) पावसाळ्यात भंडारदरा धबधबा सहल :**
दिनांक १५ ते १६ ऑगस्ट २०२६. (शनिवार व रविवार) २×२ पुश बॅक बस + ए.सी.रूम+ घरगुती जेवण+ साईट सीन (४ जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. ५,८००/- मात्र.

**७) दुबई फेस्टिवल निमित्ताने दुबई दर्शन जानेवारी २०२७.**

*** लग्न, कुमसार, बर्थडे पार्टीच्या ऑर्डस स्वीकारल्या जातील.**

| **संपर्क :** | | | |
|---|---|---|---|
| | प्रितम आल्मेडा, भुईगाव | : | ९२७१९३८२११ |
| | क्लिफर्ड वाझ, दारसेंग | : | ८१४९२०८०२७ |
| | अ‍ॅलीयन डाबरे, वाघोली | : | ९९८७३३६८३० |

# संत शारबेल मखलुफ

- लॉईड मनवेल बुतेलो
ओळंबवाडी, पापडी

आज लेबनॉनच्या अन्नाया येथील मठ हा जगभरातील लोकांसाठी तीर्थक्षेत्र बनला आहे. दर वर्षी दहा लाखांहून अधिक लोक येथे येतात.

आजच्या धावपळीच्या जगात आपण थकलो आहोत. नात्यांमध्ये ताण-तणाव आहेत. मनात अनामिक भीती आहे, शरीरं रोगाने त्रस्त आहेत. अशा वेळी कधीही उपदेश न केलेली, पुस्तके-लिखाण न केलेली, प्रभावी भाषणे न दिलेली एक मठवासी व्यक्ती आपणांस मदत करू शकते आणि ती व्यक्ती आहे संत शारबेल मखलुफ!



लेबनॉनच्या उत्तरेकडील बर्फाने झाकलेले, समुद्रसपाटीपासून उंचावर वसलेले बेकाकाफ्रा ह्या गावात ८ मे १९२८ रोजी योसेफ मखलुफ ह्या मुलाचा जन्म झाला. अत्यंत धार्मिक व भक्तिमय वातावरणात योसेफ लहानाचा मोठा झाला.

वयाच्या तेविसाव्या वर्षी मठात प्रवेश मिळविण्यासाठी योसेफने घर सोडले व तेथे त्याने ‘शारबेल’ हे नाव घेतले. शारबेल म्हणजे दुसऱ्या शतकातील अँटिओकचा रक्तसाक्षी संत होता व त्या नावाला साजेसं जीवन जगण्याचा संकल्प शारबेलने त्या दिवसापासून केला. मठातील कठोर शिस्त म्हणा, गरजेपुरतेच बोलणे म्हणा, अंग-मेहनतीचे काम म्हणा, शारबेल ह्याने सर्वच बाबतीत प्रावीण्य मिळविले. त्यांच्या सहकारी बंधूंना तर वाटायचे, हा माणूस पृथ्वीवर असूनही स्वर्गात राहतो.

१८७५मध्ये शारबेलने एक असाधारण मागणी केली. त्याने वरिष्ठांना सांगितले, ‘‘मला एकटे राहून कठोर तपश्चर्या करायची आहे.’’ मात्र मठ प्रमुखांनी स्पष्ट नकार दिला. पण शारबेलच्या नम्र व प्रामाणिक जीवनापुढे ते नमले व त्यांना वनाश्रमात राहण्याची परवानगी दिली. त्या आश्रमात ना दिवा-बत्ती, ना कुठला आराम, ना कुणी सोबती! फक्त एक छोटी खोली व त्यामध्ये डोके टेकण्यापुरती लाकडाची उशी.

संन्यासी शारबेल दिवसभर प्रार्थना करायचे, उपवास करायचे व रात्री थोडी झोप घ्यायचे. त्यांचा आहारदेखील तटपुंजा! बर्फ, थंडी, पाऊस, वारा कशाचीही त्यांना पर्वा नव्हती.

त्यांच्या पवित्र जीवनाविषयी ऐकून खेड्यातील लोक त्यांना भेटायला येत. आजार, कुटुंबातील मतभेद, आर्थिक अडचणी इत्यादींसाठी ते त्यांच्याकडे येत असत. शारबेल फक्त त्यांच्या डोक्यावर आशीर्वादरूपी हात ठेवून प्रार्थना करीत आणि आश्चर्य म्हणजे अनेकांना त्यांच्या प्रभावी मध्यस्थीचा अनुभव येत असे.

वयाच्या सत्तराव्या वर्षी २४ डिसेंबर १८९८ रोजी त्यांनी शांतपणे ह्या जगाचा निरोप घेतला. मृत्यूनंतर चार महिन्यांनी लोकांना त्यांच्या कबरीजवळ दिव्य प्रकाश दिसला. जेव्हा त्यांची कबर उघडण्यात आली तेव्हा शारबेल ह्यांचं शरीर अजूनही मऊ, लवचिक होतं. जणू काही ते झोपले आहेत असे भासत होते. त्यांच्या शरीरातून रक्तासारखा तरल पदार्थ सतत वाहत होता. मात्र वैद्यकीय तपासणीत त्यांना कोणतेही नैसर्गिक कारण सापडले नाही.

आजही त्या ठिकाणी असंख्य चमत्कार घडत आहेत. शेकडो वर्षे झाली असली तरी आजही लोक ‘संत शारबेलचे आशीर्वादित तेल’ आपल्या कपाळाला, जखमेवर लावतात किंवा पाण्यात मिसळून ते पितात आणि अनेक जण बरेही होतात.

पोप पॉल सहावे ह्यांनी ९ ऑक्टोबर १९७७ रोजी रोममध्ये त्यांना संत म्हणून घोषित केले. त्या समारंभात पोप म्हणाले, ‘‘संत शारबेल हे पूर्व आणि पश्चिम ख्रिस्तसभेच्या एकतेचे प्रतीक आहेत.’’

**‘‘संत शारबेल हे पूर्व आणि पश्चिम ख्रिस्तसभेच्या एकतेचे प्रतीक आहेत.’’**

२४ जुलै हा संत शारबेल ह्यांच्या सणाचा दिवस!

मोबाईल : 95 61 29 09 97

## साद-प्रतिसाद

**‘सुवार्ता’ ऑगस्ट २०२६च्या अंकासाठी**

**विषय : माझ्या मते,**

**आपल्या भारत देशाची सर्वांत गौरवशाली बाब**

शब्दमर्यादा : १०० शब्द

आपला अभिप्राय/अनुभव १० जुलै २०२६पर्यंत

**‘सुवार्ता’ भ्रमणध्वनी**

**9702090231 (Whatsapp)**

**किंवा**

**E-mail : suvartavasai@gmail.com वर पाठविणे.**

# St. John College of Engineering & Management

A CHRISTIAN MINORITY INSTITUTE

AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI / MSBTE

ALDEL EDUCATION TRUST




| COURSES OFFERED | INTAKE |
|---|---|
| **BACHELOR OF TECHNOLOGY** | |
| Computer Engineering | 120 |
| Computer Science & Engineering (Data Science) | 60 |
| Information Technology | 60 |
| Artificial Intelligence and Machine Learning | 120 |
| Electronics & Computer Science | 60 |
| Mechanical Engineering | 60 |
| Civil Engineering | 60 |
| BBA — Specializations [HR / Information Technology, Operations / Marketing/ Finance] | 60 |
| MBA | 60 |
| **MASTER OF TECHNOLOGY** | |
| Computer | 18 |
| Information Technology | 18 |
| **MASTER OF COMPUTER APPLICATIONS (MCA)** | 60 |
| **DIPLOMA IN ENGINEERING** | |
| Civil Engineering | 60 |
| Mechanical Engineering | 60 |
| Computer Engineering | 60 |
| Information Technology | 60 |

| FACULTY DETAILS | |
|---|---|
| No. of Faculty | : 115+ |
| Faculty Members with Ph.D. | : 20+ |
| Faculty Members Pursuing Ph.D. | : 22+ |
| Average Experience of Faculty | : 8+ |
| No. of Research Publications | : 200+ |
| No. of Patents | : 26 |
| No. of Books Published | : 13 |

SCAN QR CODE TO APPLY

## ADMISSIONS AS PER UOM, DTE & MSBTE Guidelines

## 51% SEATS RESERVED FOR CHRISTIAN MINORITY

### Why make St. John Your Career Partner

- Qualified & Experienced Faculty
- Assured Placement Assistance
- Industry Institute Interaction
- NEP Compliant Syllabus
- Project Based Experiential Learning
- State-of-the-art Infrastructure
- National Industrial Visits
- Sports Culture
- Placement & Internships in MNC's

### COE

AICTE Approved IDEALab

UltraTech Cement — The Engineer's Choice

- Drone Lab
- Robotics Lab
- AR/VR Lab
- 3D Printing
- IIT-B E-Yantra Lab


### PLACEMENT PARTNERS

JK Lakshmi, Infosys, Tata Steel, Digital Automation Enterprises, Viraj Profiles Limited, Mastek, Tech Mahindra, UltraTech Cement, accenture, Capgemini, LTI, Tata Consultancy Services

www.sjcem.edu.in office@sjcem.edu.in 7387203232 / 7709177843

# जेनेरिक औषधे

-थॉमस ब्रिटो, आक्टण, सांडोर
व्हा.चेअरमन - कार्डिनल ग्रेशस मेमो.हॉस्पिटल, बंगली



ज्या औषधाच्या निर्मितीसाठी कोणतेही नवीन संशोधन न करता आणि प्रस्थापित औषधातील घटकांचे व त्यांच्या प्रमाणाचे अनुकरण कोणतेही शुल्क न देता करून ज्यांची निर्मिती झाली आहे व विक्री करताना जी वैद्यकीय औषधे सामान्यनामाने (कोणत्याही 'ब्रँडनेम'शिवाय) विकली जातात, त्यांना आपण 'जेनेरिक औषधे' म्हणून ओळखतो.

कोणत्याही औषधाची निर्मिती प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीची, दीर्घकाळ चालणारी व खर्चिक असते. ह्या औषधाच्या पूर्व चिकित्सात्मक चाचण्या होतात. ह्यामध्ये उंदीर, माकडे ह्यांसारख्या प्राण्यांवर त्या औषधाचा काय परिणाम होतो ते पडताळणाऱ्या ॲनिमल टेस्टचा समावेश असतो. त्यानंतर त्या औषधाच्या क्लिनिकल टेस्ट हेतात. ह्यात सुरुवातीला १० व्यक्ती, मग ३० व्यक्ती त्यानंतर १०० आणि अखेर २०० व्यक्तींना ते औषध दिले जाते व त्याची परिणामकारकता तपासली जाते. नंतरच ते औषध विक्रीसाठी बाजारपेठेत येते. तदनंतरही काही काळापर्यंत त्या औषधाच्या परिणामावर देखरेख (फार्माको व्हिजिलन्स) ठेवली जाते व त्याचे अहवाल शासनाला द्यावे लागतात. कारण काही औषधे थोडे दिवस घेतल्यानंतर गुणकारी असली तरी दीर्घकाल घेतल्याने त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात.

एवढ्या खटाटोपानंतर जी कंपनी औषध निर्माण करते ती साहजिकच त्या औषधावर स्वामित्वहक्क (पेटंट) राखते. निर्मिती खर्च भरून काढण्यासाठी औषधाची किंमत जास्त ठेवते. ह्या कंपनीद्वारे हे औषध ठरावीक ब्रँड नावाने विकले जाते. त्या औषधाला 'ब्रँडेड औषध' म्हटले जाते. परदेशामध्ये हा स्वामित्वहक्क २०वर्षे असतो. तो पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या औषध कंपन्या त्याच औषधाचे उत्पादन करण्यासाठीची परवानगी मागतात व ती त्यांना मिळते. औषध संशोधनाचा खर्च नसल्यामुळे मूळ औषधातील सर्व मूळ घटक कायम ठेवून ह्या कंपन्या औषधे बनवतात, ह्यालाच 'जेनेरिक औषधे' असे संबोधितात व ही औषधे ब्रँडेड औषधापेक्षा बरीच स्वस्त असतात. जेनेरिक औषधे व ब्रँडेड औषधे हा ॲलोपॅथिक औषधांशी संबंधित विषय आहे. 'क्रोसिन' ह्या नावाने परिचित असलेले ताप कमी करणारे औषध हे ब्रँडेड आहे आणि त्यामध्ये असलेले रसायन पॅरासिटॅमॉल हे जेनेरिक औषध आहे.

**औषधाची निवड नैतिकता व व्यावसायिक मूल्ये ह्या आधारावर होणे खूप महत्त्वाचे आहे.**

ते ब्रँडनेम लक्षात राहावे म्हणून कंपनीकडून बराच खर्च केला जातो. मधुमेह, अति रक्तदाब ह्यांवरील एखादे औषध देताना विशिष्ट ब्रँडचेच लिहावे ह्यासाठी डॉक्टरांना आमिषे दिली जातात. त्यामुळे डॉक्टर महागडी औषधे लिहितात. तेच औषध कमी किमतीला मूळ नावाने (जेनेरिक) उपलब्ध असते. ही रुग्णांची आर्थिक पिळवणूक असल्याने जेनेरिक औषधांचाच आग्रह धरावा असे ग्राहक संघटनांचे मत असते. त्यासाठी जेनेरिक औषधांचीच मेडिकल स्टोअर्स चालविली जातात. रुग्णांच्या दृष्टीने हे चांगलेच आहे. परंतु जेनेरिक नावानेच औषधे लिहावीत ह्यास डॉक्टरांचा विरोध आहे. ह्याची कारणे : अनेक ब्रँड औषधांमध्ये बरीच रसायने एकत्र दिलेली असतात, त्यामुळे डॉक्टरांना एका औषधाऐवजी बरीच औषधे लिहावी लागतील. दुसरे कारण, जेनेरिक औषधांची गुणवत्ता तपासण्यासाठी आणि नियंत्रित करण्याची आपली व्यवस्था भ्रष्टाचाराने बजबजलेली आहे. त्यामुळे अनेक औषध कंपन्या निकृष्ट दर्जाची औषधे तयार करू लागतील. अमेरिकेत जेनेरिक औषधे दिली जातात परंतु तेथे त्यांची गुणवत्ता उत्तम राहील ह्याची पूर्ण दक्षता घेतली जाते.

आज अनेक औषधांच्या किमती गगनाला भिडलेल्या आहेत. मल्टिनॅशनल औषध कंपन्यांची ताकद जबरदस्त असून अनेक देशांची औषधविषयक धोरणे ह्या कंपन्याच ठरवतात ही वस्तुस्थिती आहे. सर्वसामान्य माणसाच्या हिताच्या दृष्टीने औषधांच्या किमती कमी झाल्या पाहिजेत हे खरेच आहे पण त्यासाठी डॉक्टर आणि रुग्ण ह्यांचे निकोप नाते निर्माण होणे आवश्यक आहे. काही औषध कंपन्यांमध्ये डॉक्टरच त्यांचे भागीदार आहेत व हे डॉक्टर त्यांच्याच कंपन्यांची औषधे लिहितात. मग ती महाग असली तरी रुग्णास घेणे भाग पडते. आज अनेक प्रामाणिक डॉक्टरही आहेत जे औषधांच्या गुणवत्तेची खात्री करून घेऊन कमीत कमी किमतीची औषधे रुग्णांना देत असतात. जेनेरिक औषधे न लिहिण्याचे आणखी एक कारण म्हणजे आपल्याकडे औषधांचा दर्जा व गुणवत्तेचे प्रमाणीकरण करण्याची व तपासण्याची कोणतीही चोख आणि खात्रीलायक अशी यंत्रणा किंवा व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे असे औषध लिहायला डॉक्टरांच्या मनात शंका असते. औषधाची निवड नैतिकता व व्यावसायिक मूल्ये ह्या आधारावर होणे येथे खूप महत्त्वाचे आहे.

मोबाईल : 94 22 66 87 22


ALDEL EDUCATION TRUST
ST. JOHN TECHNICAL & EDUCATIONAL CAMPUS, PALGHAR
CHRISTIAN MINORITY INSTITUTES
AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI / MSBTE
EXCELLENCE IN PHARMACY EDUCATION
SINCE 2008
ADMISSIONS OPEN 2026-27
51% SEATS RESERVED FOR CHRISTIAN MINORITY
ST. JOHN INSTITUTE OF PHARMACY AND RESEARCH
AUTONOMOUS
DTE CODE 3240
M. PHARM
• PHARMACEUTICAL QUALITY ASSURANCE (15)
• PHARMACEUTICAL CHEMISTRY (15)
• PHARMACEUTICS (09)
• PHARMACOLOGY (15)
B. PHARM (100)
D. PHARM (60)
ACCREDITED WITH GRADE A NAAC
9975316616
office@sjipr.edu.in
aldel.sjipr
sjipr_official
www.sjipr.edu.in
ALDEL COLLEGE OF PHARMACY AND RESEARCH
D. Pharm(60)
B. Pharm(100)
DTE CODE 3714
9920841900
office@acpr.in
aldel.acpr
acpr_official
www.acpr.edu.in

# दीर्घायुषी निरोगी जीवनाचे रहस्य - इकिगाई

**-लुकस ए. परेरा**
खरभाट, सालोली, सांडोर

दुसऱ्या महायुद्धामध्ये अणू बॉम्बच्या हल्ल्यामध्ये जपानच्या ओकिनावा ह्या प्रदेशाचे फार मोठे नुकसान झाले होते. झाडे, बागा उद्‌ध्वस्त झाल्या. मनुष्यहानी झाली. त्यामुळे त्या भागातील लोकांना उपासमार व साधनांच्या कमतरतेचा सामना करावा लागला. ह्यानंतर ते त्या धक्क्यातून सावरले व एकमेकांस मदत व सहकार्य करणे हाच त्यांच्या जीवनाचा उद्देश त्यांनी बनविला. ओकिनावा हा प्रदेश ज्वालामुखीच्या उद्रेकामधून तयार झाल्यामुळे हा भाग खडकाळ डोंगराचा आहे. त्यामुळे ट्रेन, बसेस जाऊ शकत नाहीत. म्हणून नागरिकांस सायकल किंवा पायी प्रवास करावा लागतो.

ओकिनावा येथील ८०% लोक १०० वर्षांपेक्षा जास्त जगतात व येथील लोक हे खूप आनंदी जीवन जगत आहेत. ह्यामुळे पुष्कळ चिकित्सक लोकांनी ह्या ओकिनावा संस्कृतीचा अभ्यास केला. फ्रान्सिस मिरालीस व हेक्टर गार्सिया ह्यांनी अभ्यास करून ‘इकिगाई’ हे पुस्तक लिहिले.

‘इकिगाई’ ह्या शब्दाचा अर्थ आहे, जीवनाचे ध्येय, उद्दिष्ट किंवा कार्यसिद्धी ठरविणे. लोकांची गरज काय आहे त्याप्रमाणे आपले ध्येय ठरविणे व त्याच ध्येयाने प्रेरित होऊन सकाळी लवकर उठून कामाला लागणे. ती गरज उत्कृष्टपणे, कलात्मकतेने कशी भागवू शकतो व हे काम करीत असता माझी उपजीविका चांगल्या प्रकारे होण्यासाठी मिळकतीची कशी सोय होईल हे पाहणे. ह्या उत्कृष्टतेच्या ध्यासामुळे प्रेरित झाल्यामुळे त्यास जीवनाचा आनंद मिळतो, जीवन सार्थक होते व ते शतायुषी होत असतात.

**इकिगाई संस्कृतीमध्ये लेखकास पुढील गोष्टी आढळल्या :-**

१) जीवनाचा उद्देश निश्चित करून कार्य करणे. तसे केल्याने जीवन सार्थक होते.

२) ध्यानधारणा, प्राणायम, योग, सूर्यनमस्कार, रेडिओवरील दैनंदिन टायसो



व्यायाम, हळू चालण्याचा व्यायाम, नेहमी सक्रिय राहणे, लिफ्टऐवजी जिन्याचा वापर करणे.

३) रोजच्या दैनंदिन कामातील आनंद : जपानमधील लोक नेहमी छोट्यामोठ्या कामामध्ये दंग असतात. त्यामध्ये भांडी

**‘इकिगाई’ ह्या शब्दाचा अर्थ आहे, जीवनाचे ध्येय, उद्दिष्ट किंवा कार्यसिद्धी ठरविणे.**

घासणे, घर झाडणे, फडका मारणे, कपडे धुणे, बागकाम करणे, स्वयंपाक करणे, परिसर स्वच्छ करणे, त्याचवेळी आवडती गाणी ऐकत दोन-तीन वेळा ग्रीन टी/जाई टी घेणे, कामाला ओझे न समजणे, ह्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून न राहणे. त्यांचे घर छोटे असते परंतु अत्यंत टापटिपीने ठेवलेले असते. ज्या माणसाकडे शेती, बागायती नाही ते सार्वजनिक ठिकाणी स्वयंसेवकाची कामे करतात. उदा. गजबजलेल्या रेल्वे स्टेशनवर आलेल्या व वाट चुकलेल्या प्रवाशांना मार्गदर्शन करणे, जुने किल्ले, बागा, पुरातन वास्तू ह्या ठिकाणी विनामोबदला प्रवाशांना मार्गदर्शन करणे, रस्त्यावरील वाहतूक खोळंबा टाळण्यासाठी आर. टी.ओ.चे काम करणे, हॉस्पिटलमध्ये एकाकी रुग्णास सोबत करणे, त्यास पुस्तके वा बायबलमधील गोष्टी वाचून दाखविणे इत्यादी.

जपानमधील खाद्यसंस्कृती व दीर्घायुष्य ह्यावर ‘द ओकिनावा प्रोग्राम’ हे पुस्तक प्रसिद्ध आहे. त्यामध्ये :

१) जपानमधील माणसे जेवताना फार सावकाश जेवतात.

२) जेवणासाठी छोट्या थाळीचा वापर करतात.

३) ग्रीन टी व जाईचा चहा दिवसातून तीन-चार वेळा घेतात.

४) आहारामध्ये मिठाचे प्रमाण ०७ ग्रॅमपेक्षा कमी ठेवतात.

५) दररोज विविध प्रकारची फळे, भाज्या, मसाला, कडधान्ये, मेवा इत्यादी प्रकारांचे १८ पदार्थ आहारात घेतात.

६) रोज भात किंवा भाताचे नूडल्स खातात.

७) आहारामध्ये कृत्रिम साखरेचे प्रमाण अत्यंत कमी ठेवतात.

८) आठवड्यातून कमीत कमी तीन वेळा मासे खातात व आठवड्यातून एकदा डुकराचे मटण खातात.

९) ज्या भाज्या स्वत:च्या बागेमध्ये पिकवितात त्याचा जास्तीत जास्त वापर करण्यामागे त्यांचा कल असतो. रंगीबेरंगी फळांची थाळी सजविणे हा त्यांचा शौक.

१०) दररोजचे जेवण हे भुकेच्या ८०% घेण्याचा त्यांचा कटाक्ष असतो. कमी खा व भरपूर जगा हे तत्त्व पाळले जाते.

११) ओकिनावा खाद्य संस्कृतीमध्ये १७ नैसर्गिक ॲन्टीऑक्सीडंट पदार्थांचा समावेश होत असतो. त्यामुळे कॅन्सरचे व हृदयाचे प्रमाण नगण्य आहे :-

१) टोफू (सोयाबीनपासून बनविलेले) २) मिसो सॉस ३) टूना ४) गाजर ५) कारले ६) समुद्री वनस्पती ७) कोबी ८) नोरी (समुद्री वनस्पतीचा प्रकार) ९) कांदा १०) सोया ११) जपानमधील काकडी १२) रताळे १३) मिरपूड १४) जाईचा चहा १५) ग्रीन टी

१६) शिकूवासा लिंबासारखे फळ १७) सोयाबीन.

१२) आठवड्यातून एकदा उपास केला जातो.

१३) दररोज फक्त १५०० ते १८०० कॅलरीएवढी अन्न घेतात. त्यामुळे त्यांचा बॉडीमास इंडेक्स सरासरी २० पर्यंत असतो.

**इकिगाईची इतर वैशिष्ट्ये**

१) ओकिनावा येथील लोकांनी सहजीवनासाठी एकत्र येण्याची प्रथा सुरू केली. त्यास 'मोआई' म्हणतात. ते एकत्र येऊन मित्रांच्या सहवासात छोटे छोटे समारंभ साजरे करतात. त्यावेळी काही वर्गणी काढून गरजवंत कुटुंबास मदत केली जाते. तसेच उरलेली रक्कम पुढील समारंभासाठी वापरली जाते. हे समारंभ खर्चिक नसतात.

२) जपानच्या जुन्या सांस्कृतिक इतिहासाचे पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूने कलात्मक मातीची भांडी तयार करून त्यावर कलाकुसर करणे, चिनी मातीची भांडी तयार करणे, लाकडी वस्तू तयार करणे, बिंगाटा ही जपानची वस्त्रकला आहे. सुंदर-उंची कशिदा काम करणे, ९० वर्षांच्या स्त्रियासुद्धा वस्त्रावर वेलबुट्टीची कामे करीत असतात. यंत्रसामुग्रीचा आकार छोटा ठेवून कामास प्राधान्य देण्यात येते.

३) रात्री ८ ते ९ तास निवांत झोप घेताता व सकाळी ५.००च्या सुमारास उठून कामास लागतात.

४) जीवन संथपणे जगण्याच्या हेतूने एकावेळी एकच काम करण्याची पद्धत अंगीकारतात. मल्टिटेस्टींगपासून दूर राहतात.

५) दिवसातून फक्त एखादा तास मोबाईल बघण्यासाठी राखून ठेवतात. शक्यतो आवाज व गोंधळापासून मुक्त जीवन जगण्याचा प्रयत्न करतात.

६) आठवड्यातील एखादा दिवस यंत्रापासून मुक्त ठेवतात.

७) नेहमी वर्तमानात व तणावरहित जगतात. निसर्गाप्रति कृतज्ञता कृतीने प्रकट करतात.

८) कमी खाणे, कमी बोलणे, हळू चालणे, हळू जेवणे इत्यादी कृतींमधून स्व-नियंत्रणाला महत्त्व दिले जाते.

वसईच्या संदर्भामध्ये इकिगाई संस्कृतीचा अवलंब करावयाचा असल्यास आपणास ह्यापुढील आयुष्य निरामयतेत जगण्यासाठी प्रथम आपला उद्देश निवडावा लागेल. ध्यानधारणा, प्रार्थना, योग, व्यायाम ह्यांद्वारे मन व शरीर सुदृढ राखता येईल. तसेच आपल्या गरजा कमी करून आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने निसर्गाने जे विपुल दिले आहे उदा. सूर्यऊर्जा, पावसाचे पाणी त्याचा संचय करून ते वापरणे योग्य ठरेल. वसईत मिळणारा भाजीपाला, फळे ह्याचा उपयोग करून दररोज फक्त ८०%च जेवण घेण्याचा प्रयोग केल्यास आजार कमी होतील व शेवटी मित्रपरिवार, गावपरिवार, चर्चपरिवार व कुटुंब, नातेवाईक ह्यांच्याबरोबर सालेख्याने संबंध व कृतज्ञता ठेवल्यास आपणांस निरामय आयुष्य लाभेल.

मोबाईल : 99 60 28 98 34

•


## डिसिल्वा टूर्स अँड कॅटरर्स

**आयोजक : क्लेमेंट एलायस डिसिल्वा,** गास चर्चसमोर.

**९८६०५६८५५३, ९५७९०२४६२०, ८४४६४३१९६९**

**१) ऑगस्ट महिन्यातील मद्रास माऊलीचा नोव्हेना :** दि. २७ ऑगस्ट ते १० सप्टें.२०२६. संपूर्ण नोव्हेना नॉन ए. सी. रूम,नॉन ए.सी. रेल्वे तिकीट व जेवण. एकूण खर्च प्रत्येकी रु. १९,५००/- व ए. सी. रूम व ए. सी. रेल्वे तिकिट एकूण खर्च रु. २८,५००/-. पाच दिवसांचा नोव्हेना - नॉन ए.सी.पॅकेज खर्च रु.१४,५००/-. पाच दिवसांचा नोव्हेना ए. सी. पॅकेज खर्च रु. १८,०००/-. सहा दिवसांचा नोव्हेना नॉन ए. सी. एकूम पॅकेज खर्च रु. १६,०००/- सहा दिवसांचा ए.सी. एकूम पॅकेज खर्च रु. १९,५००/-मात्र. वसई ते वेलंकनी व वेलंकनी ते वसई ट्रेनची व विमानाची बुकींग केली जाईल.

**२) पावसाळी सहल -** भंडार दारा धरण व धबधबा. दोन दिवसीय सहल : दिनांक २५ जुलै ते २६ जुलै २०२६. डिलक्स हॉटेल. २×२ पुश बॅक ए.सी. बसने प्रवास. सर्व साईटसीन व गेटटुगेदर पार्टीसहित एकूण खर्च प्रत्येकी रु. ६,०००/-मात्र.

**३) सेंट ज्युड झांशी नोव्हेना : अ)** दिनांक २४ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२६. ३ स्ट्रार ए.सी. हॉटेल. जाता-येताना राजधानी ३ ए.सी. तिकीट. जेवणासहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १८,५००/-. **ब)** दिनांक २४ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२६. झांशी, ग्वालियर, साईडसीन व सर्व एट्रीफीसहीत, ३ स्ट्रार ए.सी हॉटेल, जाता-येताना राजधानी ३ ए.सी. तिकीट. एकूण खर्च प्रत्येकी रु. २०,५००/-.

**४) रॉयल राजस्थान सहल : जयपूर, बिकानेर, जैसेलमेर, जोधपूर, उदयपूर. चित्तोडगड सहल :** दिनांक ४ नोव्हे. ते १४ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-. (दोन व्यक्तीस एक रूम प्रमाणे) व रु. ४२,०००/-. (फॅमिलीसाठी).

**५) संपूर्ण केरळ दर्शन :** दिनांक ६ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२६. एर्नाकुलम, कोची, मुन्नार, टेकडी, कोट्टयम, त्रिवेंद्रम, अलेप्पी कन्याकुमारी. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-. (दोन व्यक्तीस एक रूम प्रमाणे) व रु. ४२,०००/-. (फॅमिलीसाठी).

* **सर्व सहलींमध्ये रु. ५,०००/- अॅडव्हान्स भरून नांवनोंदणी करणे. सर्व सहलीमध्ये बुकीग चालू आहे.**

**: संपर्क :**

१) वेलंकनी भुजींग सेंटर, किरावली : 8552009748,9049110595 २) सुनिता पोसा, उत्तन : 9833801263, 9222111269
३) स्वाधिना परेरा, मारीभाट, गिरीज : 9823614664 ४) क्लेरा आल्मेडा, माणिकपूर : 9892252117
५) अॅन्ड्र्यू रूमाव, नंदाखाल : 9788592847, 9284106936 ६) कॅरोल बडी, उत्तन : 9221311122

CHRISEL TECHNOLAB
INNOVATE YOUR WAYS

# पुस्तक प्रकाशन सोहळा

13th May 2026

## विवियन बरबोज आणि रेऑन नुनीस लिखित "फक्त तुमच्यासाठी" हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.




### मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन



**सन्मा. आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो, सन्मा. बिशप आयवन परेरा** आणि इतर मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

### गरजू रुग्णांसाठी आर्थिक मदत



**गरजू रुग्णांसाठी मदतीचा हात**

क्रिसेल टेक्नोलॅबतर्फे गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांच्या उपचारासाठी आर्थिक मदतीचा धनादेश हॉस्पिटलचे चेअरमन **मा. श्री. पुरी घोन्सालविस** यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. समाजसेवेची बांधिलकी जपणारा हा एक स्तुत्य उपक्रम आहे.

### "संत कार्लोस" पुरस्कार
### श्री. जोसेफ आल्मेडा



अनुभव, कर्तृत्व आणि प्रेरणेचा गौरव
**श्री. जोसेफ आल्मेडा**

समृद्ध अनुभव आणि नव्या विचारांचा संगम जेव्हा घडतो, तेव्हा यश केवळ प्राप्त होत नाही, तर इतिहास घडतो. त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून "संत कार्लोस पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

### "संत कार्लोस" मानवतेचा दीपस्तंभ
### फादर रेमंड रुमाव



**"संत कार्लोस पुरस्कार"**


आदरणीय **फादर रेमंड रुमाव** यांना साहित्य, समाजसेवा आणि मानवतेच्या मूल्यांसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावाचा गौरव करणारा हा प्रेरणादायी आणि अभिमानास्पद क्षण ठरला.

### सुवर्ण क्षण... अभिमानाचा क्षण



**भारत सरकारकडून पेटंट प्राप्त – नवकल्पनेला मान्यता**

भारत सरकारकडून पेटंट प्राप्त करून क्रिसेल टेक्नोलॅबने नवकल्पना, संशोधन आणि जिद्दीचा मानाचा टप्पा गाठला आहे. हे यश संस्थेच्या दूरदृष्टी आणि परिश्रमाचे प्रेरणादायी प्रतीक आहे.




**"क्रिसल टेक्नो लॅब – कौशल्य, मार्गदर्शन आणि आपल्या उज्ज्वल करिअरच्या नव्या संधींसाठी आजच संपर्क साधा!"**


+91 8806828175
+91 7558340162
Address: 3rd Floor, Chrisel Technolab Private Limited, [illegible]

Turn Your Passion into a

# Global Hospitality Career



Since 2002, ITM Institute of Hotel Management (ITM IHM) has been developing future-ready hospitality professionals through globally relevant education and industry-integrated learning. With campuses in Mumbai and Navi Mumbai, ITM IHM offers specialized programs in Hospitality Management, Culinary Arts, and Global Hospitality, supported by international exposure, professional certifications, paid internships, and on-the-job training.

## PROGRAMS OFFERED:

> BBA in International Hospitality & Tourism Management

> BBA in Global Hospitality Management

> BA in International Culinary Arts

> B.Sc in Hospitality Studies

> B.Sc. in Hospitality Management

**OUR GLOBAL PLACEMENTS**



Samidha kashid
Food & beverage Service
Sasu Les Falaises, France



Sumedh Nilangekar
Food & beverage Service
JW Marriott Marquis Hotel Dubai



Tanay Pawar
Food Production
The Ritz-Carlton Tenerife, Spain

## WORKSHOPS AT OUR CAMPUS



**Few Of Our Esteemed Recruiters**

Oberoi Hotels & Resorts · Westin Hotels & Resorts · Hyatt · ITC Hotels · JW Marriott · The Iron Horse Hotel · ibis Hotel · Sofitel Hotels & Resorts · Trident Hotels · The Park Hotels

ITM Institute of Hotel Management
ITM SKILLS UNIVERSITY

ADMISSIONS OPEN FOR 2026
Mumbai: +91 88281 11084
Navi Mumbai: +91 93202 18007

Scan to Apply Online



# महाराष्ट्र वेलंकनी यात्रेकरु संघटना आयोजित

## आरोग्यदायीनी वेलंकनी मातेची नवदिन भक्ती - जन्मोत्सव व मिस्साविधी कार्यक्रम

कालावधी; रविवार दि. ३० ऑगस्ट ते सोमवार दि. ७ सप्टेंबर २०२६

ठिकाण : आरोग्यदायीनी वेलंकनी माता महामंदीर वेलंकनी, नागापट्टीनम, तामिळनाडू ६११११

**नियोजित मिस्सा - नोव्हेना -पवित्र तास कार्यक्रम**

आगमन मिस्सा शनिवार दि. २९ ऑगस्ट २०२६ सकाळी १० वा. मॉर्निंगस्टार चर्चमध्ये

संध्याकाळी ५.०० वाजता झेंडा मानवंदना - मिरवणूक - आशीर्वाद विधी

| | |
|---|---|
| स. ६.४५ वा. | जपमाळेची प्रार्थना : मॉर्निंगस्टार चर्च |
| स. ७.१५ वा. | पवित्र मिस्साबली, नोव्हेना भक्ती : मॉर्निंगस्टार चर्च |
| स. ९.३० ते ११वा. | प्रायश्चित्त संस्कार (कुमसार) स्थळ : समेट मंदिर |
| स. १० वा. | पवित्र वाचनाचा सराव : २०३, गोल्डन सँड हॉटेल गॅलरी |
| स. १०वा. | गायनाचा सराव : कॅरिकल बंगला, काशिमीरा ग्रुप |
| दु. १२ वा. | दुताचा संदेश आणि झेंडावंदन |
| सं. ५ वा. | पवित्र मार्गावर क्रुसाच्या वाटेची भक्ती |
| रात्री ८ वा. | मिरवणूक व जपमाळेची प्रार्थना |
| स. ९.३० ते १२.००वा. | शुक्र. ४ सप्टें. तपसाधना रिट्रीट हाऊस, वेलंकनी |

**नियोजित पुरोहित : रेव्ह. फा. ॲग्नेल कर्वाल व रेव्ह. फा. ख्रिस्तोफर वाझ**

**महाराष्ट्र वेलंकनी यात्रेकरु संघटनेच्या आमंत्रणाला मान देऊन, वसई धर्मप्रातांचे मेंढपाळ सन्माननीय बिशप थॉमस डिसोजा हे दि. ६ ते ८ सप्टेंबर २०२६ ह्या दिवशी वेलंकनीला येणार आहेत, त्यांचे हार्दिक स्वागत!**

**सणाची मिस्सा - मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६ सकाळी मॉर्निंगस्टार चर्च**

**प्रमुख पुरोहित : बिशप थॉमस डिसोजा (वसई धर्मप्रांत)**

**अध्यक्ष - श्री. मायकल बरबोज**
ज्योती, मो. 9850533214

**सरचिटणीस - श्री. गॉडफ्री फलकाव**
पापडी, मो. 8169832912

म. वे. या. संघटना पदाधिकारी व सदस्य



# पिटरमेरी इंडिया निधी लि. (वित्तसंस्था)

PETERMARY

**मुख्य कार्यालय व शाखा: वसई**


पहिला माळा, बिल्डींग नं. १, न्यु श्रीजी कृपा कॉम्प्लेक्स, कार्डिनल ग्रेशियस हॉस्पीटल समोर, बंगली, सांडोर, वसई (प), पालघर - ४०१ २०१.

Registration No -: U65999MH2019PLC323412

Establishment -: 2019

**Contact Details : 8669955317 / 18 | email: petermary.nidhi@gmail.com | web: www.petermary.com**

वसईत प्रथमच !!! कंपनी कायदा २०१३ व कंपनी (स्थापना) नियम २०१४ अन्वये नोंदणी झालेली निधी कंपनी



**आमची वैशिष्ट्ये**

- आकर्षक व्याजदराच्या बचत ठेव / आवर्त ठेव व मुदत ठेव योजना.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर अधिक व्याजदर.
- कंपनी कायद्या अंतर्गत पारदर्शक व्यवहार.
- संगणकीय / मोबाईल बँकींग सुविधा.
- तत्पर सौजन्याची सेवा / घरपोच सेवा.
- वसईच्या भुमीपुत्राकडून संचलित वित्त संस्था

## Enjoy Higher Returns in FIXED DEPOSIT Scheme

| Sr. No. | Deposit Period | Interest % General | Interest % Sr. Citizan |
|---|---|---|---|
| 1. | Deposit for 12 Months | 9.00% | 9.30% |
| 2. | Deposit for 60 Months | 11.00% | 11.50% |
| 3. | Dam Duppat in | 72 Months | |


**ALOYSIUS PEREIRA**
**Managing Director**

कार्यालयीन वेळ: सकाळी १०:३० ते संध्याकाळी ७:०० पर्यंत

**Heartfelt wishes on your 80th Birthday**

**19/07/1946 To 19/07/2026**







**Mr. Anthony Amar Gonsalves**

**Umrale, Maradi**

Dear Papa,

On 19th July 2026, you complete 80 years. Wishing you a very Happy Birthday on this special day. May God's blessings always remain upon you, and my humble prayer at the feet of the Almighty is that you be blessed with good health and a long life!



**Granddaughter : Angel Brian Gonsalves**
**Son : Brian Anthony Gonsalves**
**Daughter-In-Law : Shirley Brian Gonsalves**



## हार्दिक अभिनंदन



**डॉ. लिसा जोनीता मोसेस परेरा**

गास, फातिमा माता शेजोळ

प्रिय लिसा,

ईश्वराच्या कृपेने आणि तुझ्या अथक परिश्रमाने तू तेरना मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, नवी मुंबई येथून दिनांक २४-०४-२०२६ रोजी एम.बी.बी.एस. ही पदवी प्रथम श्रेणीत संपादन केलीस, त्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन व तुझ्या पुढील वाटचालीसाठी प्रार्थनामय शुभेच्छा!

**-: शुभेच्छुक :-**

**तुझी बाय व नाना : सौ. रिटा पॅट्रीक रिबेलो**

**फातिमा माता शेजोळ, गास**

## ५०व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

**२४/०७/१९७६ ते २४/०७/२०२६**



**सौ. अलबेला ब्लेस डिसोजा**

नाळईवाडी, सालोली

प्रिय मम्मी,

परमेश्वराच्या कृपेने दिनांक २४/०७/२०२६ रोजी तू आपल्या वयाची ५० वर्षे पूर्ण करीत आहेस, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुझे हार्दिक अभिनंदन!

तुझे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानी जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**ॲलीस व बिकन डिसोजा**

## हार्दिक अभिनंदन



**डॉ. रेचलरोज मायकल लोपीस**

(हुस्टन - टेक्सास, अमेरिका) एम.डी.

मायकल हाऊस, माणिकपूर, मेरी व्हिला

प्रिय रेचलरोज,

पवित्र मरियेच्या मध्यस्थीने व परमेश्वराच्या आशीर्वादाने तुझ्या स्वप्नातील ध्येयाला अथक परिश्रमाने, चिकाटीने साकार करून तू MD ही परीक्षा UT Medical Branch Galveston, USA येथून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केल्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन! आम्हांला तुझा सार्थ अभिमान आहे. देवाला धन्यवाद! तुझ्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी प्रार्थनामय शुभेच्छा!

**मम्मी - डॅडी : सबीना व मायकल लोपीस**

**बहीण : ऑलिविया मायकल लोपीस**

**शुभेच्छुक :-**

**आजी-आजोबा : रोजमेरी व मॅथ्यू लोपीस**

**हार्दिक अभिनंदन**



**क्रिस विलास कजार**
वाघोली, निर्मळ



**हार्दिक अभिनंदन**



**लिन्सी लुईस रिबेलो**
चौकाळे, निर्मळ (Daughter-In-Law)

प्रिय क्रिस,

देवाच्या कृपेने व तुझ्या अथक परिश्रमाने तू California State University, Los Angeles, USA येथून M.S. in Computer Science ही पदवी प्रथम श्रेणीत संपादन केल्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन व तुझ्या पुढील वाटचालीसाठी प्रार्थनामय शुभेच्छा!

प्रिय लिन्सी,

देवाच्या कृपेने व तुझ्या अथक परिश्रमाने तू San Jose State University, USA येथून M.S. in Applied Data Intelligence ही पदवी प्रथम श्रेणीत संपादन केल्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन व तुझ्या पुढील वाटचालीसाठी प्रार्थनामय शुभेच्छा!

**-: शुभेच्छुक :-**

**मम्मी-पप्पा : रेजीना व विलास कजार; बहीण : ब्लिथ विलास कजार**

---

निस्वार्थी कार्यकर्त्यांच्या दुनियेतील एक **राजा** माणूस

# श्री युस्टेश सायमन सिक्वेरा



अध्यक्ष : दुमना चॅरीटेबल ट्रस्ट
सदस्य : शांतता कमिटी, माणिकपूर पोलिस स्टेशन
सदस्य : महिला दक्षता समिती, रेल्वे लोहमार्ग वसई
अध्यक्ष : जिल्हा परिषद शाळा चुळणे व्यवस्थापन कमीटी
सदस्य : परिवहन समिती, सेंट थॉमस हायस्कूल–देवतलाव



आपणाला (२८ जुलै) **५०** व्या वाढदिवसाच्या **हार्दिक शुभेच्छा !**

शुभेच्छुक
सिक्वेरा कुटुंबिय व मित्र परिवार

REX AIRCONDITIONING CO
तुमच्यासाठी एक्स्पर्ट AC सोल्यूशन्स

तुमच्या एसीचा थंडपणा कमी झाला आहे?
एसी चे लाईट बिल जास्त येते?
एसी मधुन सारखा पाणी गळतो?

कॉल करा: 93222 28859




सर्व कंपनीच्या नवीन एसी | नवीन बंगल्याची कॉपर पायपिंग आणि प्रॉपर ड्रेनेज लाईन | स्प्लिट एसी, डक्टेबल एसी इंस्टॉलेशन आणि रिपेरिंग

३० वर्षांचा विश्वास! वसई व मुंबईत एसी दुरुस्तीची अनुभवी सेवा!

Rudolf Dmello
93222 28859

Chatriwala Bldg, 2nd Floor, Wadia Street,
Tardeo, Mumbai Central west, 400007.

Pokharni Wadi,
Tamtalao, Vasai west

**७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा**
**१८/०७/१९५१ ते १८/०७/२०२६**



**श्री. सायमन मनवेल डाबरे**
भुईगाव, नवाळे नाका

प्रिय पप्पा,

दिनांक १८/०७/२०२६ रोजी तुम्ही वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन!

तुमचे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :- स्नेडन, जॅसलीन, क्रिसलीन**

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी इजाबेल सायमन डाबरे**
भुईगाव नवाळेनाका
मृत्यू : ०५/०१/२०१५



**ख्रिस्तवासी ग्रेसी मनवेल डाबरे**
भुईगाव, एखाद
मृत्यू : २५/०१/२०२३

**प्रेमळ स्मरणार्थ : ख्रिस्तवासी मनवेल फरसू डाबरे**
**ख्रिस्तवासी अतीबाई मनवेल डाबरे**
**ख्रिस्तवासी मनवेल इनास डाबरे**

***प्रभू येशू म्हणतो, ''जेथे मी आहे तेथे त्यांनीही असावे, अशी माझी इच्छा आहे.''***
(योहान १७:२४)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

VISHNU WAMAN THAKUR
CHARITABLE TRUST, VIRAR

# VIVA COLLEGE
# DEPARTMENT - HOTEL AND TOURISM MANAGEMENT

## B.Sc. HOSPITALITY STUDIES
**Full time Degree Course**
**(Affiliated to University of Mumbai)**

## B.A.CULINARY ARTS
**Full time Degree Course**
**(Affiliated to University of Mumbai)**



**100%**
**PLACEMENT ASSISTANCE**

**22 SUCCESSFUL YEARS**

VIVA COLLEGE, OLD CAMPUS, VIRAR (W) | 9637466668 | www.vivacollege.org

VISHNU WAMAN THAKUR CHARITABLE TRUST, VIRAR

SCAN QR

VIVA COLLEGE, OLD CAMPUS | 9307274602 | www.vivatrust.in

**VIVA INSTITUTE OF TECHNOLOGY**

**B.E.** DEGREE IN ENGINEERING
MECHANICAL, CIVIL, COMPUTER, ELECTRICAL AND COMPUTER, ELECTRONICS & TELECOMMUNICATION
COMPUTER SCIENCE & ENGINEERING (AI & ML)

**M.E.** MECHANICAL ENGINEERING

**M.C.A** VIVA SCHOOL OF M.C.A
2 YEARS
FOR ALL GRADUATE STUDENTS

**DIPLOMA** MECHANICAL, CIVIL, COMPUTER, ELECTRONICS & TELECOMMUNICATION AI & ML

7770002544 | www.viva-technology.org

**VIVA INSTITUTE OF APPLIED ART**

**B.F.A.** APPLIED ART, PAINTING
12th PASS STUDENTS OF ANY STREAM & CET (MAH-AAC-CET)

7756937795 | www.vivaappliedart.org

**VIVA INSTITUTE OF PHARMACY**

**B.Pharm | M.Pharm** (Pharmacology)

7875905000 | www.vivapharmacy.org

**VIVA SCHOOL OF ARCHITECTURE**

**B.ARCH** - BACHELOR OF ARCHITECTURE
**DIPLOMA** - DIPLOMA IN ARCHITECTURE

74474 91000 | www.vivaarch.org

**VIVA INSTITUTE OF MANAGEMENT & RESEARCH**

MMS (MBA)/Ph.D. Research Centre

7770002544 | www.vivaimr.org

**VIVA COLLEGE - (ARTS, COMMERCE, SCIENCE)**

**B.A.** ENGLISH, ECONOMICS, HISTORY, PSYCHOLOGY, POLITICAL SCIENCE, B.A.M.M.C (ADVERTISING, JOURNALISM),

**M.A.** ECONOMICS

**B.Sc.** CHEMISTRY, BOTANY, ZOOLOGY, PHYSICS, MATHEMATICS, STATISTICS, I.T., COMPUTER SCIENCE, DATA SCIENCE, BIOTECHNOLOGY, BIOCHEMISTRY

**M.Sc.** PHYSICS, ANALYTICAL CHEMISTRY, ORGANIC CHEMISTRY, BIOANALYTICAL SCIENCES ENVIRONMENTAL SCIENCE, COMPUTER SCIENCE, BIOTECHNOLOGY, IT

**B.Com** ACCOUNTS & FINANCE, BANKING & INSURANCE, FINANCIAL MARKETS, FINANCIAL MANAGEMENT, INVESTMENT MANAGEMENT, B.M.S (FINANCE, MARKETING, HUMAN RESOURCE)

**M.Com** ACCOUNTANCY, BANKING & FINANCE, BUSINESS MANAGEMENT

9765742335 | www.vivacollege.org

**VIVA COLLEGE OF LAW** 5 YEARS LAW (LLB) AFTER 12TH
3 YEARS LAW (LLB) AND L.L.M

8149246436 | www.vivalaw.org

**VIVA CENTRE FOR ADVANCE RESEARCH & DEVELOPMENT**

Soil & Water testing Labortory approved by **dept. of Agriculture, Govt. of Maharashtra**, Reg. no 9665.

7507819718 | www.vivacollege.org

**एक महिन्याची आठवण** **दहा वर्षांची आठवण** **सोळा वर्षांची आठवण**







**ख्रिस्तवासी एलायस पिटर रोझारिओ**
**ख्रिस्तवासी इजाबेल पिटर रोझारिओ**
वाघेश्वरी रोड, भागाळी, वाघोली
मृत्यू : २८/०५/२०२६ (वय ६५ वर्षे) मृत्यू : फेब्रुवारी २०१६

**ख्रिस्तवासी कॅजीटन अमर गोम्स**
भुईगाव, जोसोडी
मृत्यू : १६/०६/२०१०


***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या प्रियजनांना सदैव सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल : लिओ कॅजीटन गोम्स, मार्तीन कॅजीटन गोम्स, नाताल पावलू दोडती**

---

**९० वा जन्मदिवस व एक वर्षाची आठवण**



**ख्रिस्तवासी जॉकी जशीन घोन्साल्वीस**
नान्शेरवाडी, मुळगाव
जन्म : २७/०७/१९३६; मृत्यू : १२/०७/२०२५
वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १२/०७/२०२६
सकाळी ७.३०वाजता, सेंट मेरी मॅग्दलेना चर्च, मुळगाव.
***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो!*
**पत्नी : कॉलेट; मुले-सुना : निलेश-श्वेता, मॅक्सन-डॅग्नी,**
**मुली-जावई : सिल्वीया-संजय स्मिता-ब्रायन व नातवंडे**

---

**एक वर्षाची आठवण**



**ख्रिस्तवासी रोजी सेबेस्टीयन लोपीस**
कातरवाडी, मेनरोड, शिर्लय
जन्म : २९/०८/१९४८; मृत्यू : १३/०७/२०२५
एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक १२/०७/२०२६
सकाळी ७.०० वाजता, शिर्लय चर्च.
***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.***
***जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*
**कुटुंबीय**

## मासिक स्मृती



**ख्रिस्तवासी रेजीना ॲलेक्स डायस**

आगाशी, धोबीतलाव-खारोडी

जन्म : ०२/०६/१९५७; मृत्यू : २८/०५/२०२६

एक महिन्याची मिस्सा : २८/०६/२०२६

सकाळी ७.०० वाजता, सेंट जेम्स चर्च, आगाशी

***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***

(स्तोत्र ११६:१५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो!*

**पती : ॲलेक्स;**
**मुले-सुना : रूबेन-ग्लोरिया, रसेल-मॅकेलीना;**
**नातवंडे व कुटुंबीय**

## दहा वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी निर्मला सायमन मिरांडा**

उमराळे, जोसघर

जन्म : ०८/१२/१९५८; मृत्यू : २४/०७/२०१६

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या मम्मीला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पती : सायमन; मुलगा-सून : सेलविन-गीता**
**मुलगी-जावई : स्विनल स्टॅन्ली डिब्रिटो;**
**नातू : कियान डिब्रिटो व मिरांडा कुटुंबीय**

## One year Memorial



**Late Margaret Lawrence D'mello**

Nansher Wadi, Mulgon

D.O.B : 18/10/1946; D.O.D : 11/07/2025

One year Mass : Sunday 12/07/2026

7.30 a.m. at Mulgaon Church.

***"Blessed are the pure in heart, for they shall see God."***

(Mathew 5:8)

**Fondly remembered By :- Son : Sandeep**
**Daughter : Shirley Cerejo**
**Daughter-in-law : Joan D'mello**
**Son-in-law : Neel Cerejo**

## दोन वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी कोसू रॉकी (सावरोक) लोपीस**

गोखिवरे

जन्म : १८/०२/१९५४; मृत्यू : ११/०७/२०२४

स्मरणार्थ मिस्सा : रविवार दिनांक १२/०७/२०२६

सकाळी ७.३० वाजता, संत रॉक चर्च, गोखिवरे.

***''नीतिमानांचे आत्मे देवाच्या हातात आहेत. कोणतीही पीडा त्यांना स्पर्श करणार नाही.''***

(ज्ञानग्रंथ ३:१)

*परमेश्वराच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो!*

**पती : रॉकी; मुलगा व सून : मॅक्सन व कविता**
**नात : कियारा मॅक्सन लोपीस**

| पंचवीस वर्षांची आठवण | चौदा वर्षांची आठवण | दोन वर्षांची आठवण | एक वर्षाची आठवण |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| **ख्रिस्तवासी एलिस चिमा कर्वाल** | **ख्रिस्तवासी कार्मेल चिमा कर्वाल** | **ख्रिस्तवासी अतीबाई आगुस्तीन कर्वाल** | **ख्रिस्तवासी लॉरेन्स चिमा कर्वाल** |
| भुईगाव, एखाद | | भुईगाव, फादरवाडी | भुईगाव, एखाद |
| जन्म : १५/१०/१९४७ | जन्म : १७/०९/१९२६ | जन्म : २९/०५/१९३५ | जन्म : २३/११/१९५२ |
| मृत्यू : ०३/०७/२००१ | मृत्यू : ११/०५/२०१२ | मृत्यू : ०७/०६/२०२४ | मृत्यू : २६/०७/२०२५ |

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कर्वाल कुटुंबीय**

## Six Month's Remembrance



**Late George Domnic Colaco**

Loni Wadi, Giriz, Vasai

D.O.B. : 28/01/1962; D.O.D. : 20/01/2026

Six Month Mind Mass : Sunday 26/07/2026

7:00am at St. Francis Xavier's Church, Giriz.

***"If we live, we live for the Lord and if we die, we die for the Lord, So then, whether we live or die, we are the Lords."***

(Romans 14:8)

**Fondly Remembered By :- Wife : Elbira; Son : Elvis; Daughter-in-Law : Decenta**

## वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी राफायल पास्काल फरेरा**

मडवाडी, पापडी

जन्म : २४/१०/१९४३; मृत्यू : ०२/०७/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक ०५/०७/२०२६

सकाळी ७.१५ वाजता, पापडी कथिड्रल.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

# पाणी आंदोलनाची संघर्षगाथा


-डॉमिनिका डाबरे
गिरीज

'जल आहे तर जीवन आहे', ही म्हण आपण नेहमी ऐकतो; पण तिचा खरा अर्थ आजच्या काळात अधिक प्रकर्षाने जाणवतो. पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. माणूस अन्नाशिवाय काही दिवस जगू शकतो, पण पाण्याशिवाय जगणे अशक्य आहे. त्यामुळे पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून जीवनाचा मूलभूत आधार आहे. पाणी केवळ तहान भागवण्यासाठीच नव्हे; तर स्वच्छता, शेती, उद्योग, वीज निर्मिती आणि पर्यावरण संतुलनासाठीही अत्यंत आवश्यक आहे.

एकेकाळी वसई परिसर निसर्गसंपन्न आणि जलसमृद्ध म्हणून ओळखला जात होता. येथील अनेक शेतकरी शेतीवाडीवर आपला उदरनिर्वाह करत असत. बाजारपेठांबरोबरच मुंबईच्या विविध भागांत दूध, भाजीपाला आणि दादर मार्केटमध्ये फुले ही वसईच्या नावावरच चांगल्या भावाने विकली जात असत. त्या काळी मिळणारे पाणी इतके शुद्ध होते की ते उकळून पिण्याचीही गरज भासत नव्हती.

मात्र १९८०च्या सुमारास परिस्थिती बदलू लागली. सुरुवातीला पश्चिम पट्ट्यातील काही भागांतून वसई स्टेशन परिसरात पाणी नेले जाऊ लागले. हळूहळू पाण्याच्या उपशाचे प्रमाण वाढत गेले. सुरुवातीला दिवसातून काही टँकर ये-जा करत होते; परंतु नंतर दिवस-रात्र पाण्याचा उपसा सुरू झाला. हे पाणी केवळ पिण्यासाठी नव्हे; तर मोठमोठ्या इमारतींच्या बांधकामासाठी वापरले जाऊ लागले.

झाडाझुडुपांनी व्यापलेल्या परिसराच्या जागी सिमेंट-काँक्रिटचे जंगल




उभे राहू लागले. विरार, नालासोपारा, वसई स्टेशन ह्या परिसरात मोठ्या प्रमाणावर इमारती उभारल्या जाऊ लागल्या. कमी दरात सदनिका उपलब्ध होत असल्याने मुंबईतील लोकसंख्या वसई-विरारकडे वळू लागली. त्यामुळे बिल्डर लॉबी अधिक सक्रिय झाली आणि त्याचबरोबर टँकर लॉबीचाही प्रभाव वाढू लागला.

सन १९८९नंतर पश्चिम पट्ट्यातील बोअरिंग आणि विहिरींमधून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर उपसा होऊ लागला. गिरीज, मुळगाव, सांडोर, निर्मळ, वाघोली, सत्पाळा, नाळा, उमराळे अशा भागांतून दिवसाला शेकडो टँकर धावू लागले. भरधाव टँकरमुळे अपघात वाढले. रस्त्यावर सांडणाऱ्या पाण्यामुळे वाहतुकीचा धोका निर्माण झाला. त्याच

**हा लढा केवळ पाण्यासाठी नव्हता; तो पर्यावरण संरक्षण आणि भावी पिढ्यांच्या अस्तित्वाचा होता.**

बरोबर पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांच्या लक्षात येऊ लागले की पश्चिम पट्ट्यातील विहिरींची पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे. पाण्यात क्षारांचे प्रमाण वाढत हाते आणि त्याचा परिणाम शेतीवर दिसू लागला. भाजीपाला लागवड प्रभावित झाली. पूर्वी पावसाळा संपल्यानंतरही पाण्याने भरलेली बावखले, तलाव आणि विहिरी मार्च-एप्रिलमध्येच कोरड्या पडू लागल्या.

ह्याच काळात 'हरित वसई संरक्षण समिती' ह्या संघटनेने पुढाकार घेतला. ख्रिस्तवासी फा. फ्रान्सिस दिब्रिटो आणि मार्कुस डाबरे ह्यांच्या नेतृत्वाखाली जनजागृती मोहीम सुरू झाली. संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली. बैठका, चर्चा आणि प्रत्यक्ष भेटींमधून पाणी उपशामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव प्रशासनाला करून देण्यात आली. हरित वसईच्या कार्यकर्त्यांनी पाणी विकणाऱ्या व्यक्तींनाही भेटून हात जोडून विनंती केली; पण पाणी उपसा मात्र थांबला नाही.

शेवटी जनतेने रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. हा संघर्ष साधा नव्हता. टँकर लॉबीच्या मागे प्रभावशाली शक्ती उभ्या असल्यामुळे लोक भयभीत होते. तरीही गिरीज येथून 'टँकर रोको आंदोलन' सुरू झाले. ह्या आंदोलनात महिलांचा सहभाग विशेष लक्षणीय होता. महिलांनी रस्त्यावर उतरून टँकर अडवले आणि 'आमच्या भूमीतील पाणी आम्ही लुटू देणार नाही', अशी ठाम भूमिका घेतली.

टँकर चालकांकडून अरेरावी सुरू झाली; पण महिला अक्षरशः टँकरसमोर रस्त्यावर झोपल्या. 'एकही टँकर आमच्या भागातून जाऊ दिला जाणार नाही', असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली आणि प्रशासनावर दबाव वाढला.

तथापि, संघर्ष सोपा नव्हता. आंदोलन मोडून काढण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न झाले. पाणी उपसा होत

असलेल्या विहिरींमध्ये रंग टाकून आंदोलकांवर विष टाकल्याचा खोटा आरोप करण्यात आला. पोलीस चौकशांना सामोरे जावे लागले. ‘पश्चिम पट्ट्यातील लोक इतरांना पाणी देत नाहीत’, अशा अफवा पसरवल्या गेल्या. धार्मिक तेढ निर्माण करण्याचाही प्रयत्न झाला.

रात्री पहारा देणाऱ्या महिलांवर गुंडांकडून हल्ले झाले. सिस्टर सुजान ह्यांच्यावरही हात उगारण्यात आला. आंदोलक महिलांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले व जेलमध्ये जावं लागलं. नालासोपारा स्टेशनवर ख्रिस्ती समाजाच्या दुकानांवर हल्ले झाले. मुंबईला दूध, भाजीपाला आणि फुले घेऊन जाणाऱ्या लोकांचे मोठे नुकसान करण्यात आले. गळ्यातील क्रॉस किंवा हातातील रोझरी पाहून लोकांना लक्ष्य करण्यात आले. तरीही आंदोलक मागे हटले नाहीत.

हा लढा केवळ पाण्यासाठी नव्हता; तो पर्यावरण संरक्षण, स्थानिकांच्या हक्कांचा आणि भावी पिढ्यांच्या अस्तित्वाचा होता. ‘हरित वसई संरक्षण समिती’ने गावागावांत जाऊन लोकजागृती केली. ह्या आंदोलनास युवा पिढीची मोठ्या प्रमाणात साथ मिळाली. प्रशासनाशी चर्चा, निवेदने, आंदोलन आणि लोकसंघटना ह्या सर्व माध्यमांतून संघर्ष सुरू ठेवला.

हळूहळू ह्या आंदोलनाला यश मिळू लागले. लोक अधिक जागृत झाले. आपल्या भागांतील पाणी उपशा विरोधात त्यांनी आवाज उठवायला सुरुवात केली. अखेरीस १९८०पासून वाढत चाललेला पाण्याचा अनियंत्रित उपसा मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यश आले.

**आंदोलनाचा विजय**

वसईत वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या पाणी आंदोलनाने सिद्ध करून दाखवले की, जनतेची एकजूट आणि जिद्द कोणत्याही मोठ्या शक्तीपेक्षा अधिक प्रभावी असते. महिलांच्या धैर्याने, कार्यकर्त्यांच्या निष्ठेने, युवा शक्तीच्या पाठिंब्याने आणि समाजाच्या सामूहिक सहभागाने हा संघर्ष यशस्वी झाला. आजही वसईच्या पर्यावरण रक्षणाच्या इतिहासात हे आंदोलन एक प्रेरणादायी अध्याय म्हणून स्मरणात आहे.

ह्या आंदोलनाने वसईकरांना केवळ पाण्याचे महत्त्वच शिकवले नाही; तर आपल्या भूमी, पर्यावरण आणि नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणासाठी जागरूक राहण्याची प्रेरणाही दिली. भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित आणि जलसमुद्ध वसई देण्यासाठी हा संघर्ष एक दीपस्तंभ ठरला आहे.

मोबाईल : 98 22 92 97 64



समस्या


# पावसाळ्यात वसई पाण्याखाली का जाते?

-फ्रँक मिरांडा
उमराळे

पावसाळा सुरू झाला आहे आणि त्याबरोबर वसईतील पूर संकट प्रत्येक वर्षाप्रमाणे आता डोकं वर काढील. गेल्या पंधरा-वीस वर्षांत वसईच्या एकूण रचनेत मोठा बदल झाला आहे. जी वसई पूर्वी कधीच पाण्याखाली जात नव्हती, तिथे आता दोन-दोन, तीन-तीन फूट पाणी साचते आणि तेही अनेक दिवस तसेच राहते. मग ह्यासाठी जबाबदार कोण? फक्त शासन की आपणही? प्रत्येक वेळी सगळी जबाबदारी शासनावर ढकलून आपण मोकळे होऊ शकत नाही. कारण ह्या परिस्थितीसाठी जितके शासन-प्रशासन जबाबदार आहे, तितकेच नागरिकही जबाबदार आहेत. प्रश्न फक्त पाऊस जास्त पडण्याचा नाही, तर पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग आपण कितपत जपले आहेत ह्याचाही आहे.

दोन-तीन दशकांपूर्वीची वसई वेगळी होती. एका बाजूला डोंगर आहेत, तर दुसऱ्या बाजूला समुद्र. तरीही तेव्हा पावसाचे पाणी साचत नव्हते. कारण पाण्याचे नैसर्गिक मार्ग मोकळे होते. गावागावांत बावखले होती. आपल्या पूर्वजांनी कित्येक दशकांपूर्वी पाण्याचा निचरा आणि संवर्धन करण्यासाठी ही व्यवस्था निर्माण केली होती. पावसाचे अतिरिक्त पाणी ह्या बावखलात साचून राहत असे आणि उरलेले पाणी नाल्यांमधून सहजपणे वाहून जात असे. पण आज अनेक ठिकाणी बावखले बुजवून त्यावर घरे, बंगले आणि इमारती उभ्या राहिल्या आहेत. अनेक ठिकाणी खाडी, समुद्र आणि नैसर्गिक जलसाठ्यांच्या बाजूला अवैध भराव टाकून त्या भागांत मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली आहेत.

विकास होणे आवश्यक आहे, पण तो निसर्गाचा समतोल राखून झाला पाहिजे. पाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद करून केलेला विकास शेवटी आपल्याच अडचणी



वाढवतो. आज अनेक नाले आणि ओढे अनधिकृत बांधकामांमुळे अरुंद झाले आहेत किंवा पूर्णपणे बुजले आहेत. काही ठिकाणी नाल्यांवर स्लॅब टाकून त्यांचा मूळ आकारच कमी झाला आहे. हे सगळे आपल्या डोळ्यांसमोर घडते, पण आपण फारसा विरोध करत नाही. शासन गप्प राहते आणि अशा कामांना अप्रत्यक्षपणे पाठिंबा देते. अनेकदा आपल्याला त्याचे परिणाम लगेच दिसत नाहीत. मात्र काही काळानंतर त्याची किंमत संपूर्ण गावाला मोजावी लागते. ह्याशिवाय घरातील प्लास्टिक कचरा, बांधकामाचा मलबा आणि इतर कचरा गटारांमध्ये व नाल्यांमध्ये टाकण्याची सवयही अधिक गंभीर बनवत आहे. पावसाळ्यापूर्वी नाले साफ केल्याच्या कधी घोषणा केल्या जातात; तर कधी प्रत्यक्ष साफ केले जातात, पण काही दिवसांतच त्यात पुन्हा कचरा जमा होतो. मग पावसाचे पाणी वाहून जाणार तरी कसे?

> **पाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद करून केलेला विकास शेवटी आपल्याच अडचणी वाढवतो.**

पूर्वी ज्या गावांमध्ये एक इंचभरही पाणी साचत नव्हते, तिथे आता अनेक दिवस पाणी तुंबून राहते. वाहतूक विस्कळीत होते आणि घरांमध्ये पाणी शिरते. अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान होते. त्यातून डास वाढतात, रोगराई वाढते आणि सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत होते. आपण एक प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे. मागील अनेक दशके किंबहुना शतके वसई अशा प्रकारे पाण्यात तुंबत नव्हती. मग आता अचानक असे काय बदलले? उत्तर स्पष्ट आहे. आपण निसर्गाचे नियम धाब्यावर बसवले. पाण्याचे मार्ग बंद केले. जिथे पाणी मुरायचे, तिथे काँक्रिट टाकले. जिथून पाणी वाहायचे, तिथे बांधकामे उभी केली. ह्यावर शासनाने कारवाई करणे अपेक्षित होते, पण तसे काही घडले नाही आणि नागरिक म्हणून आपण आवाज न उठवता बघ्यांची भूमिका घेतली.

शासनाने आपले काम चोख केले पाहिजे. गटारे आणि नाले वेळेवर साफ करणे, योग्य नियोजन करणे, अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई करणे, पाण्याचे नैसर्गिक मार्ग मोकळे करणे आणि जलसाठ्याचे संरक्षण करणे, ही त्यांची जबाबदारी आहे. नागरिक म्हणून आपलीही जबाबदारी तेवढीच महत्त्वाची आहे. फक्त टीका करून किंवा दोष देऊन प्रश्न सुटणार नाहीत. गावांतील बावखले, नाले, ओढे आणि पाण्याचे नैसर्गिक मार्ग जपण्यासाठी आपणही पुढाकार घेतला पाहिजे. कारण प्रश्न फक्त आजच्या पावसाचा नाही; प्रश्न उद्याच्या वसईचा आहे. जर अशीच बेफाम बांधकामे होत राहिली आणि नैसर्गिक जलमार्ग नष्ट होत राहिले, तर पाणी जाणार कुठे? हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वत:ला आणि शासनाला विचारण्याची गरज आहे. आज दोन-तीन फूट पाणी साचते आहे. उद्या परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. त्यामुळे अजूनही वेळ गेलेली नाही. वसई आपली आहे आणि ती वाचवण्याची जबाबदारीही आपलीच आहे. शासन आणि नागरिक ह्यांनी एकत्रितपणे प्रयत्न केले तरच भविष्यातील वसई सुरक्षित, स्वच्छ आणि पाणी तुंबण्याच्या समस्येपासून मुक्त राहू शकेल.

•


ST. JOHN TECHNICAL & EDUCATIONAL CAMPUS, PALGHAR
CHRISTIAN MINORITY INSTITUTES
AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI / MSBTE
ALDEL
EXCELLENCE IN HOLISTIC EDUCATION
SINCE 2008
ADMISSIONS OPEN 2026-27
BEST CAREER STARTS WITH THE BEST EDUCATION
MBA / BBA
DTE CODE 3218
Human Resource
Information Technology
Marketing
Operations
Finance
SCAN QR CODE TO APPLY
We accept CAT, MAT, XAT, CMAT, GMAT, MH-CET & ATMA Scores for Admissions
7387203232 / 9867027714
office_bba@sjcem.edu.in
sjimr_official
St. John Technical and Educational Campus, Vevoor, Manor Road, Palghar (East), Dist. Palghar - 401 404, Maharashtra, India.

# जागतिक निसर्ग संवर्धन दिन

-डॉ. सुभाष डिसोजा
उपप्राचार्य, सेंट जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा

जगभरात २८जुलै हा दिवस 'जागतिक निसर्ग संवर्धन दिन' म्हणून साजरा केला जातो. निसर्गाचे रक्षण करणे ही केवळ सामाजिक किंवा वैज्ञानिक गरज नसून ती एक नैतिक व आध्यात्मिक जबाबदारी देखील आहे. आज मानवाच्या अवाजवी हव्यासापोटी निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे. आज मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मोठी प्रगती केली आहे; परंतु ह्या प्रगतीमुळे निसर्गाचा समतोल ढासळत आहे. नद्या प्रदूषित होत आहेत. जंगलाचे क्षेत्र कमी होत आहे, अनेक प्राणी-पक्षी नामशेष होत आहेत आणि हवामानातील बदलामुळे संपूर्ण जग संकटात आले आहे.

### बायबलमधील शिकवण

बायबलच्या उत्पत्तीच्या पुस्तकात देव मानवाला सृष्टीचा काळजीवाहू (Steward) म्हणून नियुक्त करतो (उत्पत्ती २:१५). ''परमेश्वर देवाने मनुष्याला घेऊन त्याला एदेन बागेची मशागत करण्यास व तिचे रक्षण करण्यास तेथे ठेवले.'' ह्याचा अर्थ असा की, निसर्गावर प्रभुत्व गाजवणे म्हणजे त्याचा नाश करणे नव्हे; तर एका चांगल्या माळ्याप्रमाणे त्याची निगा राखणे होय. सृष्टीचा खरा मालक देव आहे, मानव हा केवळ तिचा तात्पुरता विश्वस्त आहे.

मत्तय ६:२६मध्ये येशू म्हणतो, ''आकाशातील पाखरांकडे पाहा; ती पेरणी करीत नाही, कापणी करीत नाही आणि कोठारात साठवीतही नाहीत, तरी तुमचा स्वर्गीय पिता त्यांना पाळतो.'' आकाशातील पाखरांचे हे उदाहरण देऊन येशू आपल्याला निसर्गाच्या अस्तित्वाचे महत्त्व आणि देवाचे त्याच्यावरील प्रेम सांगतो.

''शेताच्या भुईकमळांचा विचार करा, ती कशी वाढतात; ती कष्ट करीत नाहीत, ती सूतही कातीत नाहीत; तरी मी तुम्हाला सांगतो की, शलमोन राजा आपल्या सर्व वैभवात ह्यांतील एकासारखाही नटलेला नव्हता'' (मत्तय ६:२८-२९). निसर्गाचे हे सौंदर्य मानवनिर्मित वैभवापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे, हेच येशूने स्पष्ट केले. येशूने आपल्या बहुतांश उपदेशांसाठी निसर्गाची पार्श्वभूमी निवडली - कधी डोंगरावर, कधी समुद्राच्या काठावर, तर कधी रोपे, द्राक्षवेली, मोहरीचे दाणे आणि मेंढ्यांची उदाहरणे देऊन त्यांनी निसर्गाशी असलेले आपले नाते अधोरेखित केले.

### संत फ्रान्सिस असिसी ह्यांचे निसर्गप्रेम

कॅथलिक चर्चमध्ये संत फ्रान्सिस असिसी ह्यांना 'पर्यावरणाचे संरक्षक संत' मानले जाते. निसर्गाशी असलेले त्यांचे नाते अथांग आध्यात्मिक प्रेमाचे होते. संत फ्रान्सिस निसर्गातील प्रत्येक घटकाला आपले कुटुंब मानत. ते सूर्याला 'भाऊ सूर्य', चंद्राला 'बहीण चंद्र' आणि पृथ्वीला 'माता पृथ्वी' म्हणून हाक मारतो. त्यांच्या 'सृष्टीच्या गीता'मध्ये (Canticle of the Creatures) ते म्हणतात, ''हे माझ्या प्रभू, आमची माता पृथ्वी हिच्याद्वारे तुझे स्तवन असो, जी आम्हांला सांभाळते, आम्हांला मार्गदर्शन करते आणि विविध फळे, रंगीबेरंगी फुले व वनस्पती निर्माण करते.''



### कॅथलिक चर्चची शिकवण

पर्यावरण संवर्धनाबाबत कॅथलिक चर्चने नेहमीच अत्यंत प्रगतिशील आणि आग्रही भूमिका घेतली आहे. पोप फ्रान्सिस ह्यांचे 'लाऊदातो सी' हे जागतिक परिपत्रक संपूर्ण मानवजातीला पर्यावरणाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन देते. पोप म्हणतात : ''आपली ही पृथ्वी, आपले हे सामायिक घर, आता एका अशा बहिणीसारखी ओरडत आहे, जिच्यावर आपण केलेल्या अत्याचारांमुळे ती घायाळ झाली आहे. पृथ्वीची आर्त हाक आणि गरिबांची आर्त हाक ह्या दोन वेगळ्या गोष्टी नसून एकच आहेत.'' म्हणूनच पर्यावरण संवर्धन म्हणजे केवळ झाडे लावणे नव्हे; तर न्याय, जबाबदारी आणि प्रेम ह्यांचा स्वीकार करणे होय.

कॅथलिक चर्च शिकवते की पाणी, हवा, जमीन आणि जंगल ही देवाची देणगी आहेत. भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक साधनसंपत्ती जपणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही सामाजिक न्यायाची कृती आहे. चर्चच्या सामाजिक शिकवणीनुसार आपण निसर्गाचा उपभोग असा घ्यायला हवा जेणेकरून पुढील पिढ्यांचे हक्क हिरावले जाणार नाहीत. ह्यालाच चर्च 'पर्यावरणीय परिवर्तन' असे संबोधते.

### आपण काय करू शकतो?

चर्च, सामाजिक संस्था आणि कुटुंब ह्यांनी मिळून पर्यावरणपूरक उपक्रम राबवले तर समाजात मोठा बदल घडू शकतो.

अधिकाधिक वृक्षारोपण करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाण्याची बचत करणे, वीज आणि इंधनाचा अपव्यय टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, मुलांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे.

पृथ्वी ही देवाची सुंदर निर्मिती आहे. तिचे संवर्धन करणे ही आपली नैतिक, धार्मिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. जर आपण आज जागरूक झालो नाही; तर पुढील पिढ्यांना गंभीर संकटांना सामोरे जावे लागेल. आपण एक ख्रिस्ती भाविक आणि सुजाण नागरिक म्हणून प्रतिज्ञा करू या की, प्रभू येशूने दाखवलेल्या मार्गावर चालून आणि संत फ्रान्सिस असिसी ह्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून देवाचे हे सुंदर सृष्टीरूपी वरदान आपण जपू आणि पुढच्या पिढीला एक हिरवीगार, समृद्ध पृथ्वी सुपूर्द करू.

मोबाईल : 98 81 62 26 61 •


St. John's
ALDEL
INSTITUTE OF
MANAGEMENT
LEARN | LEAD | LIBERATE
ST. JOHN'S
ALDEL INSTITUTE OF MANAGEMENT
Approved by AICTE
St. John Technical and Educational Campus, Vevoor, Manor Road., Palghar (E) 401 404
ALDEL
PGDM
ADMISSIONS OPEN 2026-27
FINANCE
PHARMA MANAGEMENT
HR
BUSINESS ANALYTICS
OPERATIONS
MARKETING
EXAMS ACCEPTED
CAT / XAT / CMAT / ATMA
MAT / GMAT / MH-CET
8484055109
8484055209
aldelinstituteofmanagement
aldel.aim
https://aimsj.edu.in/
admission@aimedu.org.in
SCAN QR CODE TO APPLY
Placement Associates
NOMURA
J.P.Morgan
AXIS BANK
TATA STEEL
gsk
accenture
CRISIL
ADITYA BIRLA GROUP
Alembic
IBM
MACLEODS
tcs TATA CONSULTANCY SERVICES
zomato
HDFC BANK We understand your world
ICICI Bank
ALKEM
zydus Dedicated To Life
mahindra LIFESPACES
100% Paid Summer Internships Average - 12.5k & Max - 15k (Batch 2025- 27)

# S.I.R. 2026 व मतदार मॅपिंग

-फा. ख्रिस्तोफर वाझ
संचालक, युवदर्शन

**उद्दिष्ट**

मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - S.I.R.) आणि मतदार मॅपिंग प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी जनजागृती करणे, नागरिकांना साहाय्य करणे, बूथ लेव्हल ऑफिसर्स ह्यांच्याशी समन्वय साधणे आणि आपल्या समुदायातील सर्व पात्र मतदारांची नावे मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट आहेत ह्याची खात्री करणे.

**कृती आराखडा : टप्पा १**
**पूर्व तयारी व माहिती संकलन**

**उपलब्ध माहितीचे स्रोत : -**

पॅरिश व समुदायनिहाय कुटुंब नोंदी, प्रत्येक पॅरिश अंतर्गत येणाऱ्या गावांची, वॉर्डाची व समुदायांची यादी, मतदान केंद्रांची यादी व संबंधित BLO ह्यांची माहिती, BLO कडून उपलब्ध करून दिलेली विद्यमान मतदार यादी, पूर्वीची मतदार पडताळणे नोंदी (उपलब्ध असल्यास), पॅरिश परिषद व गावस्तरीय समुदाय डेटाबेस.

**प्रारंभिक कामे : -**

BLO कडून अद्ययावत मतदार यादी प्राप्त करणे, प्रत्येक गाव/समुदायासाठी संबंधित मतदान केंद्रांची माहिती निश्चित करणे, पॅरिशनिहाय मतदार डेटाबेस तयार करणे, प्रत्येक गाव/क्षेत्रासाठी स्वयंसेवक व समन्वयक नियुक्त करणे, माहिती संकलन व पडताळणीसाठी आवश्यक नमुने (Formats) तयार करणे.

**टप्पा २ :**
**जनजागृती मोहीम : जनजागृती उपक्रम**

**अ) माध्यमे व संवाद**

सहभागासाठी प्रोत्साहन देणारा बिशप ह्यांचा व्हिडिओ संदेश, Justice and Peace आयोग ह्यांचा व्हिडिओ संदेश, पॅरिशस्तरीय जनजागृतीसाठी पॅरिश प्रिस्ट ह्यांचे व्हिडिओ संदेश, लघु जनजागृती व्हिडिओ व सोशल मीडिया मोहीम, व्हॉट्सॲप संदेश व माहितीपर पोस्टर्स.

**ब) चर्चमार्फत जनजागृती**

नियमित चर्च घोषणा, मिस्सानंतर जनजागृती सत्रे, माहितीपत्रके व माहितीपर पत्रकांचे वितरण.

**क) समुदाय संपर्क**

पॅरिश परिषदेचे संपर्क जाळे, सेवक नेते व स्मॉल ख्रिश्चन कम्युनिटी (SCC) नेते, गावातील सूचना फलक व सार्वजनिक ठिकाणी माहिती प्रदर्शन, आवश्यकतेनुसार घरभेटीद्वारे जनजागृती.

**ड) समन्वयक बैठका**

BLO ह्यांच्यासोबत नियोजन बैठक, प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रांबाबत स्पष्टीकरण, शासनाच्या मार्गदर्शक सूचना व कालमर्यादेची माहिती, नागरिकाभिमुख व सुलभ पडताळणे प्रक्रिया विकसित करणे.

**टप्पा ३ :**
**अंमलबजावणी व पडताळणी :**
**कार्यसंस्था व जबाबदाऱ्या**

**अ) युवक गट**

डिजिटल जनजागृती मोहीम राबविणे, माहिती संकलनात साहाय्य करणे, डेटा एन्ट्री व संगणकीय पडताळणी करणे, ज्येष्ठ नागरिकांना प्रक्रियेत मदत करणे, अर्ज व आवश्यक कागदपत्रे भरण्यास साहाय्य करणे.

**ब) सामाजिक संस्था**

स्वयंसेवकांचे संघटन करणे, समुदाय संपर्क मोहिमेत साहाय्य करणे, जनजागृती कार्यक्रमांचे समन्वयन करणे, आवश्यकतेनुसार BLO ह्यांना सहकार्य करणे.

**क) पॅरिश परिषद** (Parish Council)

गावस्तरीय पथकांचे समन्वयन करणे, माहिती संकलनावर देखरेख ठेवणे, कुटुंबांशी सातत्याने संपर्क राखणे, प्रगतीचे निरीक्षण करून अहवाल सादर करणे.

**ड) गाव समन्वयक** (Sevak Netas)

कुटुंबनिहाय पडताळणी करणे, मतदार नोंदीतील त्रुटी ओळखणे, नव्या मतदारांच्या नोंदणीस साहाय्य करणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची माहिती नोंदविणे.

**टप्पा ४ :**
**माहिती पडताळणी व मतदान मॅपिंग:**
**माहितीचे वर्गीकरण**

**१) विद्यमान मतदारांची पडताळणी**

नाव, वय, पत्ता व मतदान केंद्राची माहिती तपासणे, कुटुंब नोंदींच्या आधारे मतदाराची खात्री करणे.

**२) नव्या पात्र मतदारांची नोंदणी**

१८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांची ओळख पटविणे, नोंदणी व आवश्यक कागदपत्रांबाबत साहाय्य करणे.

**३) मृत व स्थलांतरित मतदार**

| 3) | FULL NOVENA NON-A/C TICKET & A/C ROOM WITH FOOD | 26,000/- |
| 4) | FULL NOVENA A/C TICKET & NON A/C ROOM | 21,500/- |
| 5) | FULL NOVENA ONLY FOOD WITH NON-A/C ROOM | 16,000/- |
| 6) | FULL NOVENA ONLY FOOD WITH A/C ROOM | 23,000/- |
| 7) | FULL NOVENA FOR 4 TO 11 YEARS CHILDREN NON-A/C PACKAGE | 14,000/- |
| 8) | FULL NOVENA FOR 4 TO 11 YEARS CHILDREN A/C PACKAGE | 22,000/- |

**5 DAYS NOVENA**

| | | |
|---|---|---|
| 1) | FOR 5 DAYS ONLY FOOD WITH NON-A/C ROOM | 12,500/- |
| 2) | FOR 5 DAYS ONLY FOOD WITH A/C ROOM | 16,500/- |
| 3) | FOR 5 DAYS FOR 4 TO 11 YEARS OLD CHILDREN NON-A/C ROOM & FOOD | 9,500/- |
| 4) | FOR 5 DAYS FOR 4 TO 11 YEARS OLD CHILDREN A/C ROOM & FOOD | 13,000/- |

**3 DAYS NOVENA**

| | | |
|---|---|---|
| 1) | FOR 3 DAYS ONLY FOOD WITH NON-A/C ROOM | 9,500/- |
| 2) | FOR 3 DAYS ONLY FOOD WITH A/G BOOM | 12,500/- |

**SPECIAL ROOM FOR 1 OR 2 PEOPLE**

| | | |
|---|---|---|
| 1) | FULL NOVENA - SPECIAL ROOM FOR 1 OR 2 PEOPLE (NON-A/C PACKAGE) NON-A/C TICKET & NON-A/C ROOM + FOOD | 46,000/- |
| 2) | FULL NOVENA - SPECIAL ROOM FOR 1 OR 2 PEOPLE (A/C PACKAGE) A/C TICKET & A/C ROOM + FOOD | 62,000/- |

**ONLY FOOD AVAILABLE**
**BREAKFAST, LUNCH & DINNER**
**RS.750/- PER PERSON PER DAY**



**SINCE THE RAILWAY TICKETS HAVE TO BE BOOKED 2 MONTHS IN ADVANCE, KINDLY BOOK YOUR SEATS AT THE EARLIEST**

**CONTACT NO.: 9987080007 / 8898578959 / 7977832861**

**Our Lady of GOOD HEALTH VAILANKANNI Pray for us**

# एका हरवलेल्या व सापडलेल्या माणसाची कथा

-विजया डिसा
बोरीवली

यरिहोमधील लोक त्याला अनेक नावांनी हाक मारायचे : चोर, देशद्रोही, रोमचा कुत्रा आणि त्या प्रत्येक शब्दात कितीतरी सत्य दडलेले होते. तो होता रोमन साम्राज्यातील मुख्य जकातदार जक्कय. भ्रष्टाचाराच्या शिडीवर तो दोन्ही हातांनी चढला होता. उत्तमोत्तम कपडे तो घालत असे. त्याच्या तिजोऱ्या विधवांच्या, व्यापाऱ्यांच्या आणि शेतकऱ्यांकडून हिसकावलेल्या पैसा, मालमत्तेने भरलेल्या होत्या. कोणीही त्याला 'नाही' म्हणण्याची हिंमत करत नव्हते, कारण त्याच्या मागे उभी होती कैसराची भक्कम सत्ता!

अशा प्रकारची अनिर्बंध सत्ता नशा देणारी असते. दररोज सकाळी तो ह्याच गर्वाने उठत असे की शहरात कोणीही त्याची अवज्ञा करण्यास धजत नाही. तो रोमच्या पगारावर नव्हे; तर लोकांच्या भीतीवर श्रीमंत झाला होता. माणसाला जे काही हवे असते ते सर्व त्याच्याकडे होते. सोने-नाणे, मान, मोठं घर. तरीही रात्री त्याला शांत झोप लागत नसे. त्याच्या मनाला सतत एक भूक कुरतडत होती, जी कोणत्याही मेजवानीने शांत होत नव्हती. त्याच्या टेबलावरील हशा विकत घेतलेला होता, नोकरांचे नमस्कार खरेदी केलेले होते. यरिहोत एकाही माणसाला तो आवडत नसे. अन्यायाने, लोकांच्या पोटावर पाय देऊन कमावलेल्या समृद्धीने त्याला शहरातील सर्वांत एकाकी माणूस बनवले होते आणि हेच त्याचे सर्वांत क्रूर दारिद्र्य होते.

एके दिवशी शहरात खळबळ उडाली. येशू ख्रिस्त यरिहोतून जाणार अशी खबर लोकांना मिळाली. कुष्ठरोग्यांना बरे करणारा, आंधळ्यांना दृष्टी देणारा, पापी लोकांना जवळ



करणारा, स्वर्गाच्या राज्याविषयी बोलणारा. जक्कयच्या अंत:करणात काहीतरी उलथापालथ झाली. त्याला येशूला पाहायचे होते. का? हे त्यालाही माहीत नव्हते. पण ती भावना इतकी तीव्र होती की तो स्वत:लाच थांबवू शकत नव्हता. पण एक अडथळा होता, गर्दी अफाट होती आणि तो होता ठेंगणा. तो आपला महागडा झगा वर उचलून लहान मुलासारखा पुढे पळाला. येशू पुढे जाणार होता त्या वाटेवरील एका उंबराच्या झाडावर तो चढला. हातपाय खरचटले,

> **''जक्कय, लवकर खाली ये! आज मला तुझ्या घरी उतरायचे आहे.''**

झगा जागोजागी फाटला, तरीही आपला अभिमान बाजूला सारून श्रीमंत, शक्तिशाली जक्कय येशूची फक्त एक झलक मिळवण्यासाठी झाडावर चढला. झाडावरून त्याला सगळे स्पष्ट दिसत होते. लोकांचा जमाव, त्यांची रेटारेटी आणि मध्ये चालणारा येशू. साधा वेश, कुठलाही लवाजमा नाही, लोकांसोबत संवाद साधत चालणारा एक माणूस.

हजारो लोकांसोबत चालत असलेला येशू अगदी त्या झाडाखाली थांबला, त्याने सरळ वर पाहिले, थेट जक्कयकडे. जणू तो त्यालाच शोधत होता आणि तो म्हणाला : ''जक्कय, लवकर खाली ये. आज मला तुझ्या घरी उतरायचे आहे.'' गर्दी स्तब्ध झाली. कोणालाच माहीत नव्हते की तो तिथे आहे, पण येशूने त्याला अगदी बरोब्बर ओळखले, त्याच्या नावानिशी! जक्कय धडपडत खाली उतरला. त्याचे हात-पाय कापत होते. इकडे गर्दी ही खूप संतापलेली होती, ''तो पाप्याच्या घरी कसा जातोय?'', पण येशू थांबला नाही. तो त्याच्या घरी गेला.

येशूने त्याला दोष दिला नाही. त्याच्या सोबत बसला. तप्त उन्हात पावसाच्या एका थंडगार सरीने अंत:करणात शिडकाव व्हावा असेच काहीसे घडले आणि त्या शांत दैवी उपस्थितीत जक्कयला स्वत:चे खरे दर्शन घडले. तो उभा राहिला, त्याचा आवाज थरथरत होता, पण त्याचा निर्णय ठाम होता : ''प्रभू, माझ्या संपत्तीचा अर्धा भाग मी गरिबांना देतो आणि ज्यांना मी फसवलं, त्यांना चौपट परत करतो!''

चारपट म्हणजे मोशेच्या कायद्यापेक्षा जास्त!! मग येशू म्हणाला, ''आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे. कारण हाही अब्राहामचा पुत्र आहे. मनुष्याचा पुत्र हरवलेल्यांना शोधण्यासाठी आणि तारण्यासाठी आला आहे.''

''अब्राहामचा पुत्र.'' तो आता बहिष्कृत नव्हता. देशद्रोही नव्हता. तो एक पुत्र होता, स्वीकारलेला, पुनर्स्थापित. येशू सापडलेल्यांसाठी नाही; तर हरवलेल्यांसाठी आला आहे आणि जर यरिहोत एका झाडावर त्याने जक्कयला शोधले तर नावाने हाक मारून तो तुम्हाला नि मलाही शोधेल. •

# मच्छीमार निघाले देवदर्शनाला



**-डॅनियल सांबऱ्या,** उत्तन

पावसाळा जवळ आला की मासेमारी व्यवसाय थंडावतो. ह्याचे कारण असे की १ जून ते ३१ जुलै हा दोन महिन्यांचा काळ माशांचा प्रजनन काळ असल्याने समुद्रातील मासळीच्या साठ्यात वाढ होते. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता असते. त्यापासून मच्छीमारांचे संरक्षण व्हावे ह्या हेतूने राज्यात दोन महिने शासनातर्फे मासेमारी बंदी जाहीर होते. वर्षातील जवळपास १० महिने मच्छीमार उसळत्या लाटांचा सामना करीत आपले जीवन बोटीवर व्यतीत करीत असतो. पंधरा दिवसांचे रेशन, पाणी व बोटीस लागणारे इंधन ह्या शिदोरीवर हा मच्छीमार मासेमारी करत असतो. समुद्राच्या लहरी सांभाळत, प्रसंगी आपला जीव धोक्यात घालून त्याचे काम सुरू असते.

दिवस-रात्र अतोनात कष्ट करणाऱ्या मच्छीमार समाजाला ह्या मासेमारी बंदीमुळे एक प्रकारे दोन महिन्यांची सुट्टीच मिळते. ह्यामुळे मच्छीमारांना आपल्या कुटुंबासमोबत वेळ घालवण्याची संधी मिळते. ह्या दोन महिन्याच्या काळात मच्छीमार आपल्या कुटुंबात रमतो.

मासेमारी बंदी लागू होताच मच्छीमार आपल्या बोटी खाडी किनाऱ्याला सुरक्षित ठिकाणी आणून ठेवतात. त्यानंतर कोळी बांधव आपल्या बोटीची डागडुजी, इंजिन दुरुस्ती, मासेमारीसाठी नवीन जाळी विणून घेणे, तुटलेल्या जाळ्या शिवणे इत्यादी कामे पार पाडत असतात. तसेच बोटी पावसात भिजू नयेत म्हणून प्लास्टिक ताडपत्रीने झाकून ठेवतात. पावसाळ्याच्या काळात बोटीचे नुकसान टाळण्यासाठी तसेच पुढील नव्या मासेमारी हंगामाची तयारी म्हणून ही देखभाल कामे करीत असतात.

मासेमारी बंदीच्या काळात मच्छीमार बांधव तीर्थक्षेत्र व देवदर्शनाला भेटी देतात. दर्यावर राज्य करणारा कोळी समाज हा धार्मिक व देवाला मानणारा समाज आहे. ख्रिश्चन समाजातील बहुतेक मच्छीमार कुटुंबासोबत मद्रास येथील वेलंकनी मातेच्या दर्शनाला जातात तर काही जण केवळ, नाशिक आणि कोल्हापूर येथील प्रार्थना मंदिरांना भेटी देतात. काही जण रोम (व्हॅटिकन) येथे पोपच्या दर्शनासाठी जातात. नारळी पौर्णिमेपूर्वी विविध ठिकाणी देवदर्शनासाठी गेलेला मच्छीमार बांधव परत जुलै महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात आपल्या घरी परततो. मासेमारी बंदीच्या काळात हा कोळी बांधव देवदर्शनात तल्लीन होऊन जातो आणि आपले कष्ट विसरून पुन्हा एका मच्छीमारीसाठी ताजातवाना होतो.

मोबाईल : 99 87 27 18 98


## SARAH & SARAH TOURS

Since 2005

१) **मद्रास-वेलंकनी नोव्हेना :** दि. २९ ऑगस्ट ते ८ सप्टें. २०२६. अलिशान चर्चजवळील हॉटेल्स, नॉनव्हेज बुफेची रेलचेल. हॉटेल सी गेट, रिसॉर्ट्स आणि बंगलोज, हॉटेल मेरी लँड सूट्स, हॉटेल क्लिंटन पार्क. वसई ते वेलंकनी आणि वेलंकनी ते वसई डायरेक्ट रेल्वेची तसेच विमान, कार, बसेस यांच्या सोयी उपलब्ध आहेत.

२) **लेडीज स्पेशल धमाल फुकेत व क्राबी :** दि. ११ ते १६ सप्टेंबर २०२६.

३) **सीनियर सिटीझन स्पेशल थायलंड, बँकॉक पट्टाया :** दि. २५ ते २९ सप्टेंबर २०२६.

४) **स्टॅच्यू ऑफ युनिटी-बडोदा-सुरत :** दि. २५ ते २७ सप्टेंबर २०२६. वंदे भारत ट्रेन, थ्री स्टार हॉटेल.

५) **अंदमान-निकोबार, पोर्टब्लेअर-हॅवलॉक :** दि. ०३ ते ८ ऑक्टोबर २०२६. रु. २७,०००/- + विमान.

६) **दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर, सेंट ज्युड नोव्हेना, झाशी :** दि. २० ते २९ ऑक्टोबर २०२६.

७) **रमणीय श्रीलंका-कॅन्डी बेनटोटा, न्यू एलिया, कोलंबो** दि. ७ ते १२ नोव्हेंबर २०२६.

८) **व्हिनस व्हिएतनाम-हनोई, दा नाग, हालोग बे क्रूज, हो ची मिन :** दि. ७ ते १६ नोव्हेंबर २०२६.

९) **थायलंड, बँकॉक, पट्टाया :** दि. १६ ते २२ नोव्हेंबर २०२६.

१०) **रॉयल राजस्थान -जयपुर, बिकानेर, जेसलमेर, जोधपुर, उदयपूर, चित्तोडगड :** दि. १३ ते २२ नोव्हेंबर २०२६.

**आम्ही शाळा, कॉलेज, चर्च संलग्न संघटना, सिनियर सिटीझन आणि स्वतंत्र ग्रुप तसेच देश विदेशातील हनिमून पॅकेजेस करतो.**

**Cont. :**


**Prop. Charles : 9930871303**

**C/O - William : 9930832035**

Office No. 02, SIMON SMRUTI BLDG,
Near PASAYDAN Centre, NALLA

# फादर एव्हरेस्ट फरेरा

-फा. बॉथम पाटील
प्रोव्हिन्शियल सेक्रेटरी, विद्याविहार



महाराष्ट्रातील संत बोनाव्हेंचर प्रांतातील कॅप्युचिन बंधू फादर एव्हरिस्ट फरेरा (OFM Cap.) ह्यांची ८जून २०२६ रोजी Portiuncula, उमराळे येथे वयाच्या ९१व्या वर्षी  प्राणज्योत मालवली.  फा. एव्हरेस्ट ह्यांचा जन्म बॅन्ड्रा, मुंबई येथे १० सप्टेंबर १९३५ रोजी झाला. आई ऑलिव्ह फरेरा व वडील आर्कदियुस फरेरा. फा. एव्हरेस्ट ह्यांनी प्रभूची हाक ऐकून उदार अंत:करणाने कॅप्युचिन फ्रान्सिस्कन जीवनाचा स्वीकार केला. त्यांनी १३मे १९५४ रोजी प्रथम व्रत आणि १३ मे १९५७ रोजी अंतिम व्रत घेतले. ४ जून १९६० रोजी त्यांनी याजकपदाची दीक्षा स्वीकारली. सत्तर वर्षांहून अधिक काळ एक कॅप्युचिन बंधू म्हणून आणि ६६वर्षे याजक म्हणून त्यांनी संत फ्रान्सिस ह्यांच्या पाऊलखुणांवर चालत ख्रिस्ताचे विश्वासूपणे अनुकरण केले.

फा. एव्हरेस्ट हे खऱ्या अर्थाने कॅप्युचिन बंधू होते. संत फ्रान्सिसप्रमाणे त्यांनी कधीही मान-सन्मान किंवा प्रसिद्धीची अपेक्षा केली नाही. ते बंधूंच्या समुदायात एक साधा आणि नम्र बंधू म्हणून राहण्यातच समाधानी होते.

साधेपणा हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या सहवासात राहिलेल्या बंधूंनी अनेकदा सांगितले की, आज्ञाधारकतेमुळे जेव्हा त्यांची बदली झाली, तेव्हा ते केवळ काही मोजक्या वैयक्तिक वस्तू घेऊन नव्या ठिकाणी जात असत. त्यांचे जीवन येशूच्या ह्या वचनाचे प्रतिबिंब होते.

प्रार्थना ही त्यांच्या जीवनाची प्राणशक्ती होती. ते आयुष्यभर देवाच्या सान्निध्यात रुजलेले राहिले. पवित्र मिस्साबलिदान, ख्रिस्तसभेची प्रार्थना आणि वैयक्तिक प्रार्थना ह्यांमधून त्यांच्या पाचारणाला सतत पोषण मिळत राहिले. वृद्धत्व आणि शारीरिक अशक्तता वाढत असतानाही त्यांनी प्रार्थनेशी असलेली निष्ठा कधी सोडली नाही.

त्यांच्या याजकीय सेवेमध्ये त्यांनी प्रांतातील विविध कम्युनिटीमध्ये कार्य केले. १९६०मध्ये फातिमा फ्रायरी विद्याविहार येथील पहिल्या नियुक्तीपासून त्यांनी साहाय्यक धर्मगुरू, सुपिरिअर, प्रशासक, आध्यात्मिक मार्गदर्शक, वित्त प्रशासक आणि सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. उमराळे, मांडवी, पिंपरी, नाशिक, भोपाळ, सोनगाव, हमरापूर किंवा Portiuncula- कोणतेही ठिकाण असो, त्यांनी प्रत्येक जबाबदारी निष्ठेने, कौशल्याने आणि आज्ञाधारकतेने पूर्ण केली. त्यांची सेवा स्वत:च्या गौरवासाठी नव्हे; तर देवाच्या महिमेसाठी व चर्चच्या कल्याणासाठी होती.

फा. एव्हरेस्ट ह्यांच्यात सर्वात ठळकपणे दिसून येणारी गोष्ट म्हणजे त्यांची फ्रान्सिस्कन वृत्ती. त्यांनी आपल्या धार्मिक पाचारणावर प्रेम केले आणि शेवटपर्यंत त्याच्याशी एकनिष्ठ राहिले. त्यांना बंधुभाव प्रिय होता. प्रत्येक बंधूचा ते आदर करीत आणि त्यांच्याशी स्नेहाने वागत. म्हणूनच त्यांना ओळखणाऱ्या सर्वांकडून ते प्रेम आणि आदराचे पात्र ठरले. त्यांची शांत उपस्थिती, शहाणपणाचा सल्ला आणि साधी जीवनसाक्ष प्रेरणादायी ठरली. आपल्या जीवनाच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी आजारपण आणि वृद्धत्वाचा स्वीकार विलक्षण शांततेने केला. त्यांनी कधीही तक्रार केली नाही किंवा सहानुभूतीची अपेक्षा केली नाही. उलट ते सतत देवाचे आभार मानत राहिले.

त्यांनी आपल्या मागे दगडांची स्मारके ठेवली नाहीत; परंतु त्याहून मौल्यवान अशी एका उत्तम बंधूची, विश्वासू याजकाची आणि खऱ्या फ्रान्सिस्कन भावाची आठवण ठेवली.

आज सुवार्तेतील हे वचन त्यांच्या जीवनात पूर्णत्वास गेले आहे : ''शाब्बास, चांगल्या व विश्वासू सेवका; आपल्या धन्याच्या आनंदात सहभागी हो'' (मत्तय २५:२३).

प्रभू, आपल्या प्रिय बंधू फादर एव्हरेस्ट फरेरा ह्यांना चिरविश्रांती आणि शाश्वत शांती प्रदान करो!

'सुवार्ता' परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

Ganesh academy (Estd. 1987)


# COMMERCE

**F.Y.J.C. to T.Y.B.COM**

## S.Y.J.C. Toppers : March 2026



Quincy S. Lemos 91.67 %
1st in St. Thomas
Maths:98 Eco:96 OC:92 IT:97



Christian J. D'silva 89.33 %
2nd in St. Thomas
Maths:95 Eco:95 OC:91 IT:93



Safa F. Nakid 89.17 %
BK:93 Eco:94 Eng:90



Roshan P. Kare 89.00 %
Eco:97 OC:91 SP:96 IT:94



Claire G.Ferreira 88.83 %
Eco:97 OC:92



Chirag M Chavan 88.00 %
Maths:90 Eco:96 OC:92 IT:93



Ankush K. Khanolkar
87.17 % BK: 97 IT:92



Michelle J. Fonseca
87.17 %



Neha B Chaudhary
86.50 % BK:91 Eco:91 OC:91



Soumya U. Shetty
86.00 % Maths:91 Eco:91



Marvi M. Mastan
83.67 %



Anthea L. Farel
82.83 % IT:90



Celvin K. Gonsalves
82.50 % Eco:90



Kimberley B. Dsouza
82.50 % OC:92



Pearl N. D'cunha
82.33 % Eco:92 OC:92



Palak M. Bhati
81.00 %

**Admissions in progress for FYJC (Std. XI)**

## Contact : Milind Mhatre

**9822683850 / 9850076252 / 9011209235**

**Head Office :** First Floor, Vasai Tower, Opp. S. T. Depot, Parnaka, Vasai Gaon.

# उद्योजक बॅप्टिस्ट ब्रिटो

-बावतीस पेडीकर
नंदाखाल

दिनांक ६ जून २०२६ रोजी उद्योजक बॅप्टिस्ट ब्रिटो ह्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या जाण्याने समाजाने एक होतकरू व्यावसायिक, एक द्रष्टा नेता आणि एक पर्यावरण प्रेमी गमावला.

३० ऑक्टोबर १९४९ रोजी नंदाखाल धर्मग्रामातील जेलाडी गावात बॅप्टिस्ट ह्यांचा जन्म झाला. त्यांचे शालेय शिक्षण सेंट जोसेफ हायस्कूल, नंदाखाल येथे झाले. मार्च १९६७ मध्ये ते एस.एस.सी. परीक्षा शाळेतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते मुंबई, विलेपार्ले येथील कॉलेजमध्ये १९७२ मध्ये प्रथम श्रेणीत बी.एस्सी. उत्तीर्ण झाले. पुढे ते विलेपार्ले येथे खादी ग्रामोद्योग कमिशन कार्यालयात लॅब असिस्टंट म्हणून रुजू झाले. तेथील एस.आर.श्रीनिवासन ह्या अधिकाऱ्याने त्यांना मद्रास येथे सेंट्रल इलेक्ट्रॉनिक केमिकल इन्स्टिट्यूट, येथे पाठविले. तेथील दोन वर्षांचा कोर्स त्यांनी पूर्ण केला. त्यानंतर त्यांना १९७४ साली 'विकास अधिकारी' म्हणून उच्च पदावर बढती मिळाली. त्यांनी ऑफिसमार्फत वसई तालुक्यात सर्व्हे केला असता येथील लोकांना गोबर गॅसची मागणी आहे, असे त्यांच्या निदर्शनास आले. मग अधिकारी श्रीनिवासन आणि शर्मा ह्यांच्या मार्गदर्शनाने १९७७ साली गोबर्स गॅस प्लांट सुरू केला.

बॅप्टिस्ट ब्रिटो ह्यांनी बायो गॅस प्रकल्प ह्या चाकोरीबाहेरील नव्या क्षेत्रात मोठ्या धाडसाने प्रवेश केला आणि त्यात ते यशस्वी झाले.

१ मे १९७९ रोजी त्यांनी 'ब्रिटो गॅस इंजिनिअर्स' ह्या नावाची कंपनी स्थापन केली आणि सत्पाळा येथे कारखाना सुरू केला. त्यानंतर त्यांनी सोलार हॉट वॉटर सिस्टिम सुरू केली. संबंध भारतात ज्या



अशा कंपन्या आहेत, त्यात ब्रिटो ह्यांचा आठवा क्रमांक आहे. त्यामुळे मोठमोठ्या नावाजलेल्या कंपन्यांमध्ये (उदा. लार्सन अँड टुब्रो), कॅन्टीनमध्ये ८० डिग्री पर्यंत १५००० लिटर पाणी तापविले जाऊन ते वापरण्यात येऊ लागले. असे प्लांट अनेक ठिकाणी सुरू केले. सोलार हिटिंग डिसालिनेशन सिस्टीम, सौर ऊर्जेपासून कुकर, सोलार बॉक्स, सोलार परबोलिक, स्टील अँड देसालिनेशन सिस्टिम, सोलार पॉवर बॅक, सोलार स्ट्रीट लाईट, सोलार होम लायटिंग, सोलार लॅन्टरन्स, सोलार वॉटर पंप, सोलार बॉम्ब अशी अनेक प्रकारची पर्यावरणपूरक उत्पादने त्यांनी सुरू केली आहेत.

आंतरराष्ट्रीय पातळीवर, इंटर नॅशनल कौन्सिल फॉर बिझनेस प्रमोशन दिल्ली, ह्या संस्थेतर्फे त्यांना १९९७ साली 'उद्योग रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याशिवाय रुरल एनर्जी टेक्निशियन अवॉर्ड, डहाणूकर इंत्रापेनार अवॉर्ड, रिन्युवेबल एनर्जी अवॉर्ड असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

ब्रिटो ह्यांना सामाजिक कार्याची आवड होती. सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ज्ञानदीप मंडळ उत्तर वसई ही संस्था १९९३ साली स्थापन केली आणि बॅप्टिस्ट ब्रिटो विश्वस्त झाले. १९९५ साली संत जोसेफ सिनि. कॉलेज सुरू झाले. विश्वस्त मंडळात आणि कार्यकारिणीत त्यांनी कार्य केले आणि काही काळ त्यांनी अध्यक्षपद सुद्धा भूषविले.

ते वटार ग्राम पंचायत सदस्य असताना १९८५ साली वटार शाळा ते रानावर हा रस्ता डांबरीकरण करण्याचे ठरले. तिन्ही गावांतील लोकांनी एकत्र येऊन, लोक वर्गणी, श्रमदान आणि अनेकांच्या सहकार्याने रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. त्यावेळी आमदार डॉमणिक घोन्सालविस व राज्यमंत्री सेलिन डिसिल्वा ह्यांच्या हस्ते २ जून १९८५ रोजी उद्घाटन झाले. संत मदर तेरेसा ह्यांच्या वसई व नंदाखाल येथे ६ एप्रिल १९८६ रोजी भेटीच्या वेळी त्यांना फादर सायमन बोर्जीसबरोबर मदर तेरेजा ह्यांना पुष्पहार घालण्याची संधी मिळाली होती.

जेलाडी, आडलय, तळई गावांतील लहानमोठे तरुण व वयस्कर एकत्र येऊन त्यांनी कम्युनिटी सेंटर उभारले. जानेवारी २००६ रोजी अवर लेडी ऑफ नाझरेथ सेंटरचे उद्घाटन झाले, त्यावेळी बॅप्टिस्ट ब्रिटो ह्यांनी त्या समितीमध्ये कार्य केले होते. त्यांच्या कंपनीने बिशप हाऊस, जी.जी. कॉलेज व नंदाखाल चर्च येथे ५० के वी चे सोलार यंत्रणा व पॉवर सिस्टिम बसविली आहेत. बनारस, वाराणसी येथील जीवन ज्योती ब्लाईंड अंध स्कूल येथे त्यांनी सोलार सिस्टिम बसवून दिली होती. कल्पक आणि दूरदर्शी उद्योजकाला 'सुवार्ता' परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

# माझ्या पालकांचा माझ्यावरील संस्मरणीय संस्कार

## आईवडिलांचे त्यागमय जीवन

माझ्या जीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे माझे आई-वडील. त्यांच्या त्यागमय जीवनाने आणि ख्रिस्ती मूल्यांनी माझ्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा दिली.

माझे वडील पेशाने शिक्षक होते. चर्चमधील त्यांचा सहभाग इतका मोठा होता की अनेक जण त्यांना प्रेमाने 'अर्धे फादर' म्हणत असत. चर्चप्रति त्यांची निष्ठा, सेवाभाव आणि श्रद्धा अतिशय प्रेरणादायी होती. गरीब, आदिवासी आणि गरजू लोकांविषयी त्यांना कळकळ होती. वडील कधी अन्नधान्ये, कपडे, जेवण देऊन त्यांना मदत करत असत. शिक्षक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडवले.



माझी आई ही सेवाभावी आणि धार्मिक वृत्तीची होती. विशेषत: आजारी, दु:खी किंवा अडचणीत असलेल्या लोकांच्या मदतीसाठी ती  तत्पर असायची. तिच्या प्रार्थनामय जीवनातून आणि प्रेमळ स्वभावातून मला दया, सहानुभूती आणि इतरांची सेवा करण्याचे महत्त्व शिकायला मिळाले.

आज मी शिक्षक आणि ख्रिस्ताचा सेवक म्हणून कार्य करत असताना माझ्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार माझ्या प्रत्येक कार्यात दिसून येतात. त्यांच्या जीवनाचा आदर्श माझ्यासाठी प्रेरणेचा स्रोत आहे.

- **(डॉ.) सुभाष डिसोजा,** भुईगाव

## श्रद्धामय बाबा

माझे बाबा फार प्रेमळ होते. ते अन्य मुलांवरसुद्धा आमच्यासारखेच प्रेम करत. आई लहानपणी गेल्यामुळे बाबाच अगदी जवळचे वाटतात. श्रद्धा, प्रेम, औदार्य आणि निष्ठा काय असते ते बाबांच्या जीवनामधून शिकलो. बाबा ख्रिस्तप्रेमी होते. बाबा आम्हांला बायबलमधील गोष्टी रसभरीत वर्णन करून सांगत. साधे आणि सरळ जीवन हे बाबांकडून आम्ही शिकलो. पवित्र मरियेची रोझरी ते ओटीवर बसल्या बसल्या करायचे. आमचे घर रस्त्यालगतचे. रविवारी बाबा घरी असायचे. सकाळी आमच्यासह देवळात जायचे. दारावर कोणी भिकारी जरी आला तरी त्याला बसायला सांगायचे आणि आम्ही जेवायला बसलो की त्यांनाही जेवण वाढायला माझी बहीण मार्था हिला सांगायचे. जाताना त्यांना कपडे, पैसे द्यायचे.

आमच्या घरी किरकोळ कामासाठी कोणीही मजूर आला तरी त्यालाही प्रेमाने घरच्यासारखे वागवले जायचे. बाबांनी रेव्हन्यु खात्यात तब्बल ३३वर्षे प्रामाणिकपणे नोकरी करून ते निवृत्त झाले. बाबांना वाचनाचा छंद होता तो छंद आम्हां सर्व भावंडांनासुद्धा लागला. माझ्या आईसारखी माझी मोठी बहीण मार्था बाय हिच्यावर बाबांचा विशेष जीव. आई पश्चात तिनेच आमच्या घरचा संसार सांभाळला. बाबांचे जीवन संघर्षमय होते पण बाबांनी ह्या संघर्षाचा श्रद्धेने सामना केला. ते प्रभू येशू ख्रिस्तावरील विश्वासामुळे मरणाला भ्यायले नाहीत. माझ्या आईची मला काही आठवण नाही. मात्र ती उत्साही, परिश्रमी आणि प्रेमळ होती असे मी माझ्या मार्था बाय आणि नातेवाईकांकडून ऐकले आहे.

**- फा. ॲण्ड्र्यू जोसेफ डाबरे,**
एस.जे., डांग, गुजरात

## स्वच्छतेचा मंत्र

माझी आई अशिक्षित, कष्टाळू, शांत स्वभावाची होती. घरी म्हशीचा तबेला होता. वाडीतील कामे, पस्तीस माणसांचे एकत्र कुटुंब तिने सांभाळले. तरीसुद्धा माझ्याकडे तिने कधीच दुर्लक्ष केले नाही. अंगाला शेणाचा, घामाचा वास कधीच येऊ दिला नाही. आईनेच मला स्वच्छतेचे धडे शिकविले. दर शनिवारी दुपारी नारळाच्या खोबऱ्याचे दूध काढून केसाला लावून केस धुणे व आंघोळ करून देवळात पाठविणे, हे आईने कधीच चुकविले नाही. माझ्या आईच्या तोंडात कधीच शिवीगाळ, अपशब्द नव्हते. माउलीच्या नोव्हेनाच्या वेळी रानातील तेरडे, कोंबडफुले गोळा करून तेरीच्या पानात गुंडाळून माझी आई मला घेऊन चर्चला जायची.

माझे बाबा समाज कार्यकर्ते. रेल्वेची नोकरी सांभाळून शेतीवाडी, दुधाचा धंदा सांभाळून माझ्यावर चांगले संस्कार त्यांनी घडविले. संध्याकाळी आठ वाजता मांडी घालून रोझरीची प्रार्थना करायची सवय मला आई-वडिलांनी लावली. शिक्षणाच्या बाबतीत आई अशिक्षित होती, तरीही मी अभ्यास करते की नाही ह्याकडे ती कटाक्षाने लक्ष द्यायची. त्यामुळे आज मी शिक्षिका म्हणून सेवानिवृत्ती जीवन जगत आहे. ह्याचे श्रेय मी माझ्या आईबाबांना देते.

**-जसिंटा पास्कोल डिसोजा,** भुईगाव, मारियानगर

## जीवनाचे खरे मार्गदर्शक

आमचे डॅडी नेहमी सांगायचे, ''कष्टाचे खाल तर पुरून उरेल; पण फुकटचे खाल तर फुकटच जाईल.'' त्यांनी आम्हाला मेहनतीचे, प्रामाणिकपणाचे आणि पाहुणचाराचे महत्त्व शिकवले. आपल्या दारातून कोणीही रिकाम्या हाताने परत जाऊ नये, ही त्यांची जीवनभराची शिकवण होती. ते म्हणायचे, ''आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांच्या पायाची धूळ जरी घराला लागली तरी आपली भरभराट होईल.''

आमची मम्मीसुद्धा तितकीच प्रेमळ आणि दयाळू होती. ती नेहमी सांगायची, ''कोणाचे भले करता आले नाही तरी चालेल, पण कोणाचे वाईट होणार नाही ह्याची काळजी घ्या. नाती जपा, आजारी आणि वृद्ध नातेवाईकांना भेटा, दु:खात असणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहा, घेते होऊ नका तर देते व्हा. माणुसकी म्हणून जे करता येईल ते मनापासून करा, परतफेडीच्या अपेक्षेने काही करू नका. देताना आनंदाने द्या आणि केलेल्या मदतीचा बाजार मांडू नका.''

आम्ही पाच भावंडे. आमचे भाऊ, वहिनी आणि मुले सगळे एकत्र राहत असू. रोज रात्री संपूर्ण कुटुंब गुडघे घालून रोझरी प्रार्थना करत. डॅडी म्हणायचे, ''परमेश्वराने दिलेल्या चोवीस तासांपैकी पंधरा मिनिटे तरी आपण त्याला द्यायला हवीत.'' त्या प्रार्थनांनी आमच्या कुटुंबाला प्रेम, एकता आणि विश्वासाचे बळ मिळाले. आज त्यांचे संस्कार आणि शिकवण आमच्या प्रत्येक श्वासात जिवंत आहे.

**- प्रतिमा व्हॅलेरियन कोलासो,** आकाशवाडी, गिरीज

## मी जे कल्पिलेच नाही!

''घडलो मी, पाहुनी आईचं जगणं'', ह्याची प्रचिती मला अगदी बालपणापासूनच आली. बालवयातच पितृछत्र हरवलं. अगोदरच जो कर्जाचा बोजा होता, तो आईच्या अंगावर येऊन पडला. पुढे काय? पण आईने हार मानली नाही. आम्हां चार भावंडांच्या निर्वाहाचा निर्धार तिने मनाशी पक्का केला. पन्नाशीच्या दशकात आईने इतरांच्या घरात भांडी घासणे, कपडे धुण्याची कामं केली. माझ्या आईने बालकांना आंघोळ घालणे, अंगाला मालिश करणे ही कला आत्मसात केली. उत्तम सुईण म्हणून ती नावाजली गेली. आमच्या कुटुंबाचा उदहरनिर्वाहाचा प्रश्न तात्पुरता मिटला. गरिबीतही काबाडकष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, हे तिने मला शिकवले. नायगाव कोळीवाड्याच्या बंदरात माझी आई मासळी निवडण्याचे आणि ती सुकविण्याचे काम करी. त्याच्या बदल्यात तिला मासळी मिळत असे.

चर्चमध्ये वेदीसेवा केल्यावर व बायबलचा उतारा वेदीवरून वाचल्यावर माझी आई कौतुकाने माझे मुके घेऊन मला प्रोत्साहन देई. त्या काळात केवळ प्रार्थनेच्या बळावर चालणारी 'लिजन ऑफ मेरी' नावाची संस्था वसईत मूळ धरून होती. त्या संस्थेत तिने मला रुजवलं. तेथे कार्यरत असताना मी 'वसई ज्युनियर क्युरिया'चा अध्यक्ष झालो. १९७५पासून मी सेंट विन्सेंट डी पॉल ह्या संस्थेचा संस्थापक सदस्य झालो. ''तुला शिकण्यास कोणाकडूनही मदत मिळाली नाही; पण तू इतर गरीब विद्यार्थ्यांना मदत करतोस, हाच माझा खरा आनंद!'' असे ती म्हणत असे. तिच्याच प्रेरणेने, संस्कारामुळे मी आज ह्या संस्थेत सेवेची ५० वर्षे पूर्ण केली. त्यानंतर मी 'वसई मध्यवर्ती कौन्सिल'चा अध्यक्ष झालो. ती सदैव माझी प्रेरणास्रोत होती.

आम्हां भावंडांना तिने स्वयंपाक करायला, भांडी घासायला शिकवले. पडत्या काळातही स्वाभिमानाने जगण्याचे धडे तिने आमच्याकडून गिरवून घेतले.

**- सिडनी जस्टीन मोरायस,** नायगाव-पाली
मोबाईल : 96 04 38 59 85

## संस्काराचा ठेवा

माझ्या वयाच्या आठव्या वर्षी माझे वडील मरण पावले. त्यामुळे आम्हां तिन्ही भावंडांचा संपूर्ण भार आईवर पडला. आई अशिक्षित होती पण श्रमिक होती. त्यामुळे तिने आमच्यावर जे संस्कार केले आहेत ते कधीच न विसरण्यासारखे आहेत. लहानपणापासून ती आम्हांला देवळात घेऊन जात असे. तिथूनच मला रोजच्या मिस्साची आवड निर्माण झाली. देवळात मिस्सावेळी गायन करण्याची माझी इच्छा होती व मी गायन मंडळाची सभासद झाले. ख्रि. फादर इग्नेशियस रस्किना ह्यांनी मर्सिसमध्ये पवित्र आत्म्याच्या प्रार्थनेची चळवळ सुरू केली त्या प्रार्थनेचा मी एक भाग बनले व तेथूनच चर्चमध्ये काम करणे, बायबल वाचन, वैयक्तिक प्रार्थना, रोझरी करणे हा छंद मी जोपासला. आजही न चुकता रोजचा पवित्र मिस्सा माझ्या जीवनाचा एक भाग बनला आहे. माझ्या स्वर्गीय आईने दिलेला हा संस्काराचा ठेवा मी आजदेखील प्रामाणिकपणे पुढे नेत आहे.

**- शिला डिकुन्हा,** मर्सिस
मोबाईल : 90 96 27 12 21

## मौल्यवान धन

व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देणाऱ्या मूल्यांची शिदोरी मला माझ्या आई-वडिलांनी लहानपणापासूनच दिली. नैतिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक विचारांचे बीज प्रत्यक्ष कृतींतून त्यांनी मला शिकविले.

मेहनत, शिस्त, जबाबदारी ह्यांची योग्य सांगड घालून योग्य मार्गावर चालणे हे अमूल्य ज्ञान मला कायम मिळाले आणि

त्यामुळेच जबाबदारपणा मी फार लहानपणीच अंगीकारला. शालेय जीवनापासून तर आजतोवर अनेक जबाबदाऱ्या स्वखुशीने स्वीकारल्या आणि पार पाडल्या. आज समन्वयक म्हणून कार्य करीत असताना आव्हाने, संकटे पेलण्याची ताकद ह्या संस्कारामुळे मिळाली. म्हणूनच माझ्या पालकांनी दिलेले संस्कार हेच माझ्या आयुष्यातील सर्वांत मौल्यवान धन आहे.

- **ब्रिनल सेल्विन क्रास्टो,** परसाव नंदाखाल

## स्वप्नपूर्ती

१९६४चा काळ होता. तेव्हा आम्ही अंगणात खाट टाकून त्यावर झोपून आकाशातील चांदण्या पाहत होतो. एक दिवस मी व माझा छोटा भाऊ आम्ही अभ्यास पूर्ण करून दोघे रात्रीच्या जेवणाअगोदरच बाहेर खाटेत बसलो होतो. तेवढ्यात आमचे वडील मुंबईहून भाजीपाला विकून आले. कपडे बदलून ते आमच्या जवळ खाऊ घेऊन आले. ते आम्हांला म्हणाले, ''मी तुमच्यापैकी एकाला डॉक्टर व एकाला वकील करीन. हे माझं एक स्वप्न आहे.'' त्यावेळी मी तर सहावीत होतो. त्यानंतर अनेकदा त्यांनी आम्हांला ते बोलून दाखवले. परंतु दुर्दैव, मी दहावीत असतानाच ते देवाघरी निघून गेले.



धर्मगुरू झाल्यानंतर धर्मप्रांताने मला एम.ए.साठी न्यूयॉर्कला पाठवले. तिथे मला प्रिन्सिपल व प्रोफेसर म्हणाले, तुला युनिव्हर्सिटीमध्ये आम्ही पीएच.डी.साठी प्रवेश देतो. माझे पीएच.डी.चे स्वप्न होते म्हणून पाच वर्षांनी मला कॅलिफोर्नियाच्या सेंट फ्रान्सिस्को युनिव्हर्सिटीमध्ये पाठवले. वडील गेले परंतु त्यांचं स्वप्न पूर्ण करून त्यांना स्वर्गात स्वर्गानंद देण्याच्या विचारात मी जीव ओतून पाच वर्षांचा पीएच.डी. दोन वर्षांत करून घरी परतलो. आई-वडिलांचं स्वप्न पूर्ण करण्याचा आनंद मला झाला.

- **फादर फिलीप वाझ,** पसायदान, नाळा

## सुखी जीवनाचा कानमंत्र

माझे वडील पाचवीपर्यंत शिकले होते. आई अशिक्षित. तिला १०८ वर्षांचे आयुष्य मिळाले. ती रोज सकाळी उठली की देवाचे आभार मानायची. पालकांनी जे आमच्यावर संस्कार केले ते आम्हां बहीण-भावंडांच्या आयुष्याला कारणीभूत ठरले. आई शिकलेली नव्हती; परंतु सुसंस्कृत होती. लहानपणापासूनच नीतिमूल्यांचे धडे तिने आम्हां भावंडांना दिले. रोज रोझरी केल्याशिवाय जेवायचे नाही, शक्य असेल तर मिस्सा ऐकायचे. सकाळी उठताच देवाचे आभार मानायचे. जेवणापूर्वी कपाळावर क्रुसाची खूण करून देवाला धन्यवाद द्यायचे. कामानिमित्ताने बाहेर पडताना आल्तारासमोर एक मिनिट उभे राहून पवित्र पाणी शिंपडून पुढचा प्रवास देवाच्या हातात द्यायचा. देव तुमचे रक्षण करील असे ती नेहमी आम्हांला सांगायची.

लग्नानंतर कुटुंबात वादविवाद झाला तर आपण नमते घ्यायचे. त्यात आपल्या मनाचा मोठेपणा असतो. माहेरच्या कुटुंबात ढवळाढवळ करायची नाही. आई-वडील, सासू-सासरे ह्यांच्या डोळ्यांत अश्रू येतील असे वागायचे नाही. मोठ्यांचा मान-सन्मान करायचा. नाती-गोती सांभाळायची. नेहमी सकारात्मक विचार करायचा म्हणजे तुम्ही सुखी व्हाल, असा कानमंत्र तिने आम्हांला दिला. ह्या चांगल्या संस्कारामुळे मी आज सुखी जीवन जगत आहे.

-**रूबी मच्याडो,** सातोडी, गिरीज

मोबाईल : 77 98 17 58 3

## रोझरीचे सामर्थ्य

माझ्या आईवडिलांच्या आम्ही पाच मुली. आई-वडिलांनी आम्हांला उत्तमरीत्या वाढवले. ते जरी पैशाने मोठे नसले तरी मनाने आणि संस्काराने खूप मोठे होते. माझे वडील रोजची पहिली मिस्सा व आई रोजची तिसरी मिस्सा कधीही चुकवत नसत. ते नित्यनियमाने संध्याकाळी रोझरीची प्रार्थना करायचे. वडील तर झोपी जाताना बिछान्याच्या चारही कोपऱ्यांना पवित्र क्रुसाची खूण काढायचे. वडील आम्हांला नेहमी सांगायचे की माणसाने सतत देवावरील अढळ श्रद्धेने व स्वत:च्या हिमतीवर जीवन जगावे. ते आम्हांला सांगत की, आपल्यापेक्षा खालच्या विभागातील लोकांकडे पहा. आपण रोज दोन वेळचं जेवण घेतो. कितीतरी लोकांना एक वेळचं देखील जेवण मिळत नाही. आपण चांगल्या अंथरुणात झोपतो परंतु अनेक लोक रेल्वे प्लॅटफॉर्मवर झोपतात.

खूप वर्षांपूर्वी माझ्या मामाच्या मुलाचं आणि एका हिंदू मुलाचं काही क्षुल्लक गोष्टीवरून भांडण झालं. ते इतकं विकोपाला गेलं की, त्या हिंदू मुलाकडची माणसं काही हत्यारे घेऊन मामाकडे आली. त्यामुळे आजूबाजूची माणसं भीतीने दरवाजे बंद करून घरात शिरली. कोणाचीही त्यांच्यापुढे येण्याची हिम्मत झाली नाही. तेव्हा माझे वडील त्यांच्यापुढे जाऊन खिशातली रोझरी काढून त्यांना दाखवत म्हणाले, ''तुमच्याजवळ ती हत्यारे आहेत परंतु माझ्याकडे हे हत्यार आहे.'' त्याच क्षणी ती सगळी मंडळी काहीही न बोलता निघून गेली. त्यावेळी आम्हां सर्वांना रोझरीमध्ये किती ताकद आहे ह्याचं महत्त्व समजलं.

माझी आई देवळात प्रवेश करताना कुंडलीतलं पवित्र पाणी घेऊन कपाळाला लावून म्हणायची, 'आगू मॅत', छातीला लावून म्हणायची, 'तुझं मला बळ', डाव्या खांद्याला लावून म्हणायची, 'सैतान दुष्मन पळ', उजव्या खांद्याला लावून म्हणायची, 'तू मला मिळ' ही खूप अर्थपूर्ण पिता, पुत्र, पवित्र आत्म्याची प्रार्थना तिने आम्हांला शिकवली. जोपर्यंत तिच्या शरीरात शक्ती, बळ होतं तोपर्यंत तिने देवळात होणारी कॅरिजमॅटिक प्रार्थना व व्हिजील कधी चुकवली नाही.

- **आयरीन सायमन कोरीया,** नंदाखाल

मोबाईल : 93 20 70 87 91

## प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा

माझ्या आईवडिलांनी मला केवळ शिक्षणच दिले नाही; तर चांगले संस्कारही दिले. त्यांच्या संस्कारांमुळे मला योग्य-अयोग्य ह्यांतील फरक समजला आणि जीवनात चांगली व्यक्ती बनण्याची प्रेरणा मिळाली. ''दुसऱ्यांना काहीही देताना चांगलेच द्यावे, चांगले बोलावे आणि शक्य तेवढी मदत करावी'' हा त्यांचा संदेश माझ्या मनात कायम आहे. ''चांगल्या कार्यक्रमाला नाही गेले तरी चालेल, पण एखाद्याच्या दु:खाच्या प्रसंगी आपण नक्की उपस्थित राहिले पाहिजे, कारण दु:खात साथ देणे हीच खरी माणुसकी आहे'', असे ते नेहमी सांगत. त्यामुळे इतरांच्या अडचणींच्या काळात मदतीचा हात पुढे करणे आणि त्यांना धीर देणे मी शिकले.

माझ्या पालकांनी मला नेहमी सत्य बोलणे, प्रामाणिक राहणे, मोठ्यांचा आदर करणे आणि सर्वांशी प्रेमाने वागणे हे संस्कार दिले. तसेच गरजू लोकांना विशेषत: अनाथ, विधवा आणि गरिबांना मदत करणे, इतरांच्या भावना समजून घेणे आणि निसर्गाची काळजी घेणे ह्याचे महत्त्वही त्यांनी पटवून दिले. माझे पालक नेहमी सांगतात की, कोणतेही काम मनापासून आणि प्रामाणिकपणे केले तर यश नक्की मिळते. हा संस्कार माझ्या जीवनाचा आधार बनला आहे. ह्याशिवाय त्यांनी पैशाची बचत, शिस्त, वेळेचे महत्त्व, लहानांवर प्रेम आणि कष्टाची सवय हे अनेक चांगले संस्कार माझ्यावर व माझ्या तिन्ही भावंडांवर केले आहेत. ह्या संस्कारांमुळे आमचे व्यक्तिमत्त्व घडत आहे.

- **कॅथरीन इरेमस फरगोज**, गास

## भ्रष्टाचारमुक्त जीवन

आमचे वडील (ख्रि.) पास्काल मच्याडो (पाली) हे भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर येथे सायंटिफिक ऑफिसर (सिव्हिल इंजिनियर) ह्या हुद्द्यावर होते. बीएआरसी साठी मोठ्या प्रमाणात स्टील, लोखंड, सागवान लाकूड इत्यादी खरेदी करण्याचे कामही त्यांच्याकडे होते. इतकी मोठी ऑर्डर मिळण्यासाठी काही कंत्राटदार खुशीने त्यांना मोठमोठी आमिषे दाखवत. मात्र ते त्यांना चांगलंच फैलावर घेत व धुडकावून लावत. ''मी बीएआरसी साठी काम करतो व त्याचा मला पगार मिळतो'', असे ते ठणकावून सांगत.

दिवाळीत स्टीलचे व्यापारी मिठाईचे व ड्रायफ्रूट्सचे बॉक्स देतील म्हणून वडील तेथे मुद्दामहून जात नसत. एक व्यापारी मुंबईहून आमचं घर शोधत आले. ''आपके पिताजी भगवान है, इतना सच्चा आदमी मैने कभी नही देखा।'' असं सांगत ते त्यांच्या पाया पडले. वसईच्या कित्येक तरुणांना त्यांनी बीएआरसीत नोकरीसाठी मार्गदर्शन केले. ते केंद्र सरकारचे राजपत्रित अधिकारी होते. परिसरात ते तसे एकमेव असल्याने गुणपत्रिकांच्या टू कॉपीज प्रमाणित करण्यासाठी खूप जण त्यांच्याकडे येत. मात्र त्यांनी कधीच कुणाला परत पाठवले नाही.

वडिलांची शिस्त फार कडक होती. शाळेत नंबर काढला तर कौतुक करत. पण 'अर्ध्या हळकुंडात पिवळे होऊ नका' असा सल्लाही ते देत. ते साहित्याचे दर्दी होते. त्यांनी विकत घेतलेल्या पुस्तकांची लायब्ररी घरात असल्याने आमच्या आईसह सर्व भावंडांना वाचनाची गोडी लागली. आमची आई (ख्रि.)कॅथरीना प्रेमळ, समंजस व शालीन होती. तिने उभ्या आयुष्यात कुणाशीही भांडण केले नाही. स्वयंपाक, विणकाम आणि भरतकाम ह्यांमध्ये ती पारंगत होती. आईच्या सर्वच गुणांचा आदर्श संसार करताना उपयोगी पडतो.

- **उज्ज्वला लेमॉस,** नेवर्ले, सांडोर

मोबाईल : 77 98 17 58 3


## माता-पित्यांच्या संस्कारांचे संचित

माझ्या जीवनात जे घडले त्यातील चांगल्या गोष्टी आई-वडिलांकडून प्राप्त झाल्या. वडील गिरणी कामगार. आयुष्याची ४५ वर्षे त्यांनी कोहिनूर मिलमध्ये शिवाजी पार्कजवळ नोकरी केली. 'वसईकर जॉबर' असे त्यांना अन्य कामगार संबोधित असत. माझे प्राथमिक शिक्षण व नोकरी करून एम.ए.पर्यंतचे शिक्षण दादरला झाले. मी एकुलता एक मुलगा, भाऊ नाही, बहीण नाही, राजकपूरच्या भाषेत 'जिता जागता वन पीस.' काबाडकष्ट करणाऱ्या वडिलांनी मला शिकविले, ''प्रामाणिकपणे आयुष्य जग, लबाडी करू नकोस, मी फक्त सातवी फायनल पर्यंत शिकलो. बोर्डी येथे जाऊन परीक्षा दिली. तू मोठा हो, पण माणुसकी सोडू नकोस. परिस्थिती कितीही वाईट असली तरी भ्रष्टाचार करू नकोस. जे दोन घास मिळतील, ते खा. तू माझ्या वाटेने येऊ नकोस तर दुसरी वाट शोध.''

माझी आई म्हणजे करुणेची सावली. लहानपणी माझे बोट धरून मुळगाव चर्चमध्ये, दादरच्या साल्वेशन चर्च (पोर्तुगीज चर्च)मध्ये मला घेऊन जायची. तिच्या डोक्यावर 'ओल' असायची. ख्रिस्तावर प्रेम करण्यास तिने मला शिकविले. माता-पित्यांनी माझ्यावर उत्तम संस्कार केले. जीवन कसे जगावे ह्याचे प्राथमिक धडे दिले. दादरच्या बालक विहार विद्यालयात जेथे सर्व मुले-मुली ब्राह्मण, सीकेपी, मराठा, मागास वर्गीय होती व मी एकटाच रोमन कॅथलिक ख्रिश्चन होतो. मराठी आणि संस्कृत माझे आवडीचे विषय होते. गीतेच्या अध्यायाचे पाठांतर व त्यासाठी झालेल्या स्पर्धांमध्ये मी भाग घेत असे व पहिल्या किंवा दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होत असे. त्यानंतर नोकरी मिळाली. नोकरी करून सायंकाळच्या कॉलेजमध्ये (कीर्ती) शिक्षण घेण्याची संधी मिळाली. प्रा. रमेश तेंडुलकर शिक्षक म्हणून लाभले. सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. सुभाष भेंडे अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. एम.ए.साठी प्रा.सरोजिनी वैद्य, वसंत बापट, वा.ल.कुलकर्णी, व.दि.कुलकर्णी देखील लाभले. वडिलांची शिकवण होती श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. नोकरी करून शिक्षण घेताना वडिलांचे वचन आठवायचे. वडील देवाघरी गेले. संस्कार ठेवून गेले.

- **पिटर फिलीप कर्नेल,** मुळगाव

मोबाईल : 74 48 26 94 08




**Sophia**
**BEAUTY PARLOUR**
"HIGHLIGHT YOUR NATURAL BEAUTY"
SOPHIA ANDRADES
9823301327
7744000333
9049000555
◈ **अपॉइन्टमेंन्ट स्विकारल्या जातील** ◈

* रोज Rs.99 फक्त 15 वर्षे बचत करा आणि Rs. 9 करोडची Property बनवा.
*बचत करा रोज Rs.333 व Rs.1,40,000 दरवर्षी आयुष्यभर, टॅक्स फ्री घ्या. सोबत Rs. 40 लाखांची **Maturity** पण मिळवा. तसेच Rs. 80 लाख **Family** साठी देखील.
*ही Offer मर्यादित कालावधीसाठीच उपलब्ध.
* Contact For Mediclaim Policy, Cancer Cover Plan, Pension, SIP & SWP.
**Jayesh Chaudhari**
**9422483785**

## युनिक पेस्ट कंट्रोल



**प्रो. : थॉमस वर्गिस**
माळुंगी, मुळगाव, वसई.
**7770026783,**
**9320032074**

१) २६ वर्षे कार्यरत असलेली.
२) सेवाभावी संस्था, हॉस्पिटल्स, कार्यालये, हाऊसिंग सोसायटी, हॉटेल्स, बंगलोज, फॅक्टरी यांसारखे संतुष्ट ग्राहक.
३) नवीन बांधकाम, नूतनीकरण व राहत्या घरासाठी वाळवी प्रतिबंधक योजना.
४) झुरळ, मुंग्या, कोळी, रांगणारे किटक, उंदीर, पाली ह्यांच्यासाठी जनरल प्रतिबंधक योजना.
५) नॉन टॉक्सीन केमिकल हर्बल व जेलमध्ये सर्विस उपलब्ध.


**-: संपर्क :-**
**9323232074, 7768000260**
**ऑफिस :** डिकुनावाडी, मुळगाव, वसई.

## मच्याडो टूर्स आणि कॅटरर्स, नाळा

**मद्रास वेलंकनी सहल :** संपूर्ण नोव्हेना : दिनांक २७ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६. प्रवास : ३टायर ए.सी. व ए.सी. रूम. एकूण खर्च प्रत्येकी रु. २७,५००/- व संपूर्ण नोव्हेना प्रवास : नॉन ए.सी. व ए.सी. रूम. एकूण खर्च प्रत्येकी रु. २४,०००/-.
पाच दिवसांचा नोव्हेना : ए.सी. रूम, एकूण खर्च प्रत्येकी रु. १४,०००/- + प्रवास खर्च. स्वतंत्र येणाऱ्यांस जेवणाची व्यवस्था केली जाईल. घरचे जेवण.

**अधिक माहितीसाठी संपर्क**
**लॉडसन मच्याडो :** 9923640082, 9892012890
**लिप्सन मच्याडो :** 8108340640, 9011986305
**ऑस्टीन कोरिया :** 9527888469
**मायकल रॉड्रिग्ज :** 9527832169
**विल्यम परेरा,** रुनपाळ : 9923993868
**ग्रेव्ही मच्याडो, आगाशी :** 8087187597, 9730863207

## युद्ध



युद्ध असेही असते
जिथे लढाई नसते.
शस्त्रे-अण्वस्त्रे नसतात
तरीही लोक मरतात.
निसर्ग तेवढाच नसतो,
जो डोळ्यांना दिसतो
अदृश्य रूपातले सूक्ष्मजीव
निसर्गाचे घटक असतात.
तेही क्रियाशील असतात, परिसरात
सांगतात आक्रोशाने
त्यांचाही हक्क ह्या वसुंधरेवर.
मग दृश्यांची अदृश्यासोबतची
घनघोर लढाई जुंपते
बेसावध ऐकतो, पुढल्या लाटा.
करतो फितुरी अदृश्य शत्रूंशी
महामारीचे आयतेच फावते.


**- जोसेफ तुस्कानो,** बोरिवली

## जिवंत विद्यापीठ

जुनी झाडं, ऐश्वर्य कुटुंबाचे
नका करू प्रहार कृतघ्नतेने
घट्ट रोवली आहेत ती मातीशी
प्रेमाने सदा जपा सावली तयांची.
आजी-आजोबा घरात असण्याने
निर्जिव भिंतीसुद्धा होतात बोलक्या
आभाळाएवढ्या त्यांच्या मायेने
संकटांच्या फांद्या होतात हलक्या.
सुरकुतलेल्या स्पर्शात नसते चिंता
असतो मात्र विश्वास जिव्हाळ्याचा
आजारपणात फिरणारा हात कपाळी
अन् भीती लपविण्यासाठी हक्काची कुशी.
फांद्यांवर खेळले निरागस बालपण
काळाची झाली ती साक्षीदार
पानात साठविले गीत आठवणींचे
जिवंत विद्यापीठं ती संस्कारांची.



**- जेन ग्रेगरी मच्याडो,**
करीजभाट, पाली
मोबाईल : 99 23 71 41 54



## ऋण

जन्म दिधला ह्या भूवरी
अनंत उपकार मजवरी
मातृ-पितृत्वाची छाया
परमेश्वरासम अढळ माया ॥
सहवास तो कृपाछत्राचा
अभेद अशा कवचाचा
विसावता तव कुशीत
आपसूक येई मी खुशीत ॥
करिता मम पोषण
तव नामाचे भूषण
मायेच्या अथांग डोहात
गुंतवून गेले तव मोहात ॥
दिवस-रात्र पाठीराखे
आई-बाबा नाम सदा मुखे
चिंतिती मज सदा सुख
कधी न होऊ देती म्लानमुख ॥
मातृ-पितृत्वाचे ऋण
सांगण्या शब्दांची वाण
ऋणानुबंधाच्या जाळ्यात
गुरफटून जाऊ दे हयात ॥

**- ब्रिजदिन गिल्डस लोपीस,** न्यू गिरीज
मोबाईल : 88 06 04 61 99

## स्वप्नांची नीट हत्या

नीटच्या त्या परीक्षेसाठी
घाम गाळला वर्षानुवर्षे
आई-बाबांच्या आशासंगे
जपली स्वप्ने हृदयामध्ये
पण अचानक जसा यम आला
पेपर फुटला, मीडियाचा बाजार भरला
नोटांच्या त्या अंधखेळाने डाव मांडला
मेहनतीचा, जिद्दीचा जणू जीवच हरला
कोणी हरला नैराश्येपुढे
कोणी जीवनच संपविले
स्वप्नांच्या त्या चित्तेवरती
अश्रूंनी जग भिजविले
विद्यार्थ्यांच्या जखमांवरती
राजकारणांचे मेळे भरले
सत्ता, खुर्ची, मतांचा हिशेब
ह्यांतच सारे गुंतून गेले.

**- ज्यो परेरा,** ज्योती




## जाहिरातदारांसाठी खुलासा

**'सुवार्ता'मध्ये जाहिराती व शोकसमाचार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंतच स्वीकारल्या जातात** हे आपणास माहीतच आहे. मात्र एकूण पृष्ठसंख्या व जाहिरातींची पृष्ठसंख्या मर्यादित ठेवावी लागत असल्यामुळे रंगीत व कृष्णधवल जाहिरातींची पाने वरील तारखेच्या आत भरली गेल्यास नाईलाजास्तव आम्ही आपली जाहिरात स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून कृपया शेवटच्या घटकेपर्यंत थांबणाऱ्यांना जाहिरातीसाठी जागा उपलब्ध होऊ शकेलच ह्याची शाश्वती आम्ही देऊ शकत नाही.


**- व्यवस्थापक**

# माझे मत

## शोकप्रसंगी संवेदनशीलतेचे भान

वसईतील ख्रिस्ती समाजात अंत्यसंस्कार आणि शोकसभा ह्यांना विशेष महत्त्व आहे. एखाद्या कुटुंबावर दु:खाचा प्रसंग ओढवल्यावर नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली सहवेदना व्यक्त करतात. ही आपल्या समाजाची एक सुंदर परंपरा आहे. परंतु काळाच्या ओघात काही गोष्टींकडे नव्याने पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

अंत्यदर्शनानंतर दु:खित कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी हात मिळविण्याची किंवा त्यांच्याशी संवाद साधण्याची प्रथा आहे. हा केवळ एक सामाजिक संकेत नसून त्यांच्या दु:खात आपण सहभागी आहोत ह्याची खात्री देण्याचा प्रयत्न असतो. परंतु अनेकदा हा क्षण केवळ औपचारिकतेत बदलल्याचे दिसून येते. दु:खित व्यक्तीकडे न पाहता, कोणतीही भावना व्यक्त न करता किंवा घाईगाईने हात मिळवून पुढे जाण्याने अपेक्षित मानसिक आधार मिळत नाही. कधीकधी शब्द नसले तरी चालतात; परंतु डोळ्यांतील सहानुभूती, चेहऱ्यावरील आपुलकीचा भाव आणि मनापासूनचा स्पर्श दु:खितांना मोठा दिलासा देऊ शकतो.



काही वेळा असेही आढळून येते की, शोकसभेच्या वेळी रांगेत बसलेल्या कुटुंबीयांपैकी केवळ आपल्या परिचयाच्या व्यक्तींचे हात मिळवून सांत्वन केले जाते. असे वर्तन तितकेसे योग्य वाटत नाही. प्रत्यक्षात दु:ख एका व्यक्तीचे नसून संपूर्ण कुटुंबाचे असते. आई-वडील, पती-पत्नी, मुले, भावंडे आणि नातेवाईक ह्या सर्वांच्या जीवनात त्या निधनामुळे एक पोकळी निर्माण झालेली असते. त्यामुळे ओळखी-अनोळखीचा भेद न करता सर्व कुटुंबीयांशी आदराने आणि सहानुभूतीने वागणे ही ख्रिस्ती प्रेमभावनेची खरी अभिव्यक्ती ठरेल.

अंत्यदर्शन, प्रार्थनासभा किंवा शोकसभेच्या वेळी मोबाईलवर मोठ्याने बोलणे, रिंगटोन वाजणे, सतत संदेश तपासणे किंवा फोनमध्ये गुंतून राहणे हे प्रसंगाच्या गांभीर्याला बाधा आणते. काही वेळा लोक आपापसांत गप्पा मारण्यात किंवा फोनवरील संभाषणात इतके रमून जातात की ते नेमके कोणत्या कारणासाठी तेथे उपस्थित आहेत, ह्याचाच विसर पडतो. अशा प्रसंगी मोबाईल सायलेंट मोडवर ठेवणे आणि शक्य तितका त्याचा वापर टाळणे.

काही ठिकाणी मृत व्यक्तींच्या पार्थिवाचे, छायाचित्रे काढून ते तत्काळ समाजमाध्यमांवर पोस्ट करणे. अशा कृती नकळतपणे मृत व्यक्तीच्या सन्मानाला आणि दु:खित कुटुंबाच्या भावनांना धक्का पोहोचवू शकतात.

शोकसभा संपल्यानंतर शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी मृत व्यक्तीच्या रक्तातील अतिजवळच्या कुटुंबीयांनी फक्त सांत्वनासाठी पुढे उभे राहणे सोयीस्कर ठरेल. काही वेळा दूरच्या नात्यातील किंवा परिचित व्यक्तीही अनावश्यकपणे पुढे उभ्या राहतात. त्यामुळे सांत्वनासाठी उभे असलेल्यांची संख्या वाढते. त्यामुळे श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आलेल्या लोकांचा वेळही वाया जातो.

सांत्वन करण्याच्या उद्देशाने बोलताना आपल्या शब्दांमुळे दु:खितांच्या भावना नकळत दुखावल्या जाणार नाहीत, ह्याची काळजी घेणे गरजेचे आहे. विशेषत: मृत व्यक्तीच्या स्वभावातील उणिवा, भूतकाळातील चुका किंवा वादग्रस्त प्रसंग ह्यांची चर्चा अशा वेळी टाळली पाहिजे. अशा प्रसंगी न्यायनिवाडा करण्यापेक्षा सहवेदना व्यक्त करणे, चांगल्या आठवणींना उजाळा देणे आणि दु:खित कुटुंबाला मानसिक आधार देणे हेच अधिक मानवी, सुसंस्कृत आणि ख्रिस्ती मूल्यांना साजेसे ठरेल.

ख्रिस्ती परंपरेत प्रार्थनेला महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे शोकप्रसंगी उपस्थित राहणे म्हणजे केवळ दर्शन घेणे किंवा हात मिळविणे नव्हे; तर मृतात्म्यासाठी आणि दु:खित कुटुंबासाठी मनापासून प्रार्थना करणे होय. आपल्या उपस्थितीमुळे त्यांना मानसिक बळ, धीर आणि देवावरील विश्वास दृढ व्हायला हवा.

वसईतील ख्रिस्ती समाज हा प्रेम, एकोपा, परस्पर सहकार्य आणि सामुदायिक भावनेसाठी ओळखला जातो. आपल्या पूर्वजांनी जपलेल्या ह्या सुंदर परंपरा पुढील पिढीकडे अधिक संवेदनशीलतेने पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने थोडी अधिक सहवेदना, थोडी अधिक शिस्त आणि थोडी अधिक संवेदनशीलता दाखवावी.


- **बॅप्टिस्ट एम वाझ,** दारसेंग, गोम्सआळी
मोबाईल : 99 70 65 07 57

## ‘शब्दात झेललेला अबोली’चा झेला

मौखिक परंपरेतून लिखित स्वरूपात असलेली लोकगीते वा एकूणच लोकसाहित्य हे आजच्या पिढीसाठी हाती आलेलं मोठं घबाड आहे.. खजिना आहे. हेलन डिसिल्वा ह्यांनी वाडवळी ख्रिस्ती समाजात प्रचलित असलेल्या लोकगीतांचे संकलन करून मुंबई विद्यापीठासाठी एम.फिल. पदवीसाठी प्रबंध सादर केला. कित्येक वर्षांनी त्यांनी प्रबंधातील गीतांत भर घालून त्या गीतांचा आस्वाद घेत असताना, त्या गीतांतील सौंदर्यस्थळं उलगडून दाखवलेली आहेत. असे करीत असताना त्यांनी गीतांतून प्रतीत होणारा काळ, राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थिती.. कुटुंबव्यवस्था, नातेसंबंध, शिक्षणाची आस, कष्टकरी... शेतीवाडीत राबणारी स्त्री, नवऱ्याच्या सहवासास आसुसलेली.. सासुरवास सोसणारी.. नोकरी करणाऱ्या नवऱ्याकडून काही वस्तू, दागिने, मिष्टान्न ह्यांची अपेक्षा करणारी स्त्री, त्याचबरोबर साध्वी (सिस्टर) बनू इच्छिणारी तरुणी, लग्न करण्यास उत्सुक असलेली तरुणी, मुलीला उजवण्यास उत्सुक असणारे आई-बाप, समूह-जीवन, तत्कालीन रीतिभाती किंवा चालीरीतींनी पीडलेले माय-बाप, सोहळ्यासाठी होणारा अमाप खर्च आणि अनेक दिवस चालत राहणारे लग्नसोहळे, शेती-वाडीची वर्णने, निसर्गाचे वर्णन, ह्यातून त्यांनी मानवी भावभावनांचे केलेले वर्णन ह्यांचा यथास्थित धांडोळा हेलन डिसिल्वा ह्यांनी घेतलेला आहे.

ख्रिस्ती समाजातील एखादी मुलगी व्रतस्थ जीवन जगण्याचा निर्णय घेते तेव्हा तिच्या आईला चिंता वाटते. ती म्हणते -

*डोंगरावरनं डेवला रे जोगी*
*जोगी वाजवितो रे जोगी वाजवितो रे*
*नाना का पनकारू*
*जोग्यासरी जाशील,*
*काय गो दुये खाशील*
*आये खाईन गे, आये खान गे*
*वडाशी वडफळं..*



डोंगरावरून उतरलेला जोगी म्हणजे योगीपुरुष, येशू ख्रिस्त. तो डोंगरावरून म्हणजे उंचीवरून जमिनीवर आला. सामान्य माणसांची सेवा करण्यासाठी त्यांच्यासारखाच अतिसामान्य झाला. त्याच्या मार्गावरून जाण्यासाठी तुला खूप कष्ट पडतील.. तू त्याच्या मागोमाग जाशील तर काय खाणार? काय पांघरणार.. त्या प्रश्नांना उत्तरं देताना मुलगी म्हणते मी वडाची (वटवृक्षाची) फळं खाऊन राहीन. साधी कापडं वापरीन.. परंतु त्याचा खडतर मार्ग मी पत्करीनच. हा त्या मुलीचा सकारात्मक भाव किंवा ह्याचा अर्थ वेगळ्या प्रकारेही घेता येईल.

फनकर (पनकारू) म्हणजे कलेचा आविष्कार करणारा. एखादी मुलगी कलावंताच्या प्रेमात पडली आहे. अशा लहरी पुरुषाबरोबर सडाफटिंग प्रियकराबरोबर तू कशी आयुष्य कंठशील? ह्या प्रश्नावर ती मुलगी आपल्या कलावंत प्रियकराबरोबर सर्वसंगपरित्याग करायला सिद्ध असल्याचे सांगते. हा तिचा सकारात्मक दृष्टिकोन!

वसईतील ख्रिस्ती हे पिढीजात ख्रिस्ती असून आपल्या पूर्वजांनी दिलेला भाषा-संस्कृतीचा ठेवा त्यांनी आजही जपलेला आहे. म्हणूनच कितीतरी सांस्कृतिक संदर्भ सदर ग्रंथातील लोकगीतांतून दृग्गोचर होतात. लाल टोपी घालणे, धोतर नेसणे, सवाष्णींनी उंबराचं पाणी आणणे, स्वाष्णींनी वरातीपुढून पाण्याचे हंडे घेऊन जाणे, शायेलीचा झेला वा फुलं केसात माळणे हे सौभाग्याचं, सधवेचं लक्षण, मुहूर्तमेढी रोवणे, बांगड्या भरण्याचा विधी, मुलीचे लग्न करणे, कपाळी तिला (टिळा) लावणे, पितांबर शेले नेसणे, हळद लावणे, वाजंत्री आणणे, सातशे घोड्यांच्या टापा वाजतात (पूर्वी लग्नात मुलीला गोधन, अश्वधन दिले जात असे.) देऊळ, नऊशे रुपये देऊन मुलगी ‘देणे’ (हुंडा पद्धती आणि कन्यादान, बांगडी टिचणे, फुटणे नाही. त्यामुळे वैधव्याचे सूचन होते.) इत्यादी.

लोकगीतं... लोकसाहित्य हा सांस्कृतिक दस्तावेज आहे. आपले पूर्वज कोण होते.. कसे जीवन व्यतीत करीत होते, हे सारं त्यांनी काव्यात्मक भाषेत व्यक्त.. अभिव्यक्त केले आहे. हेलन डिसिल्वा ह्यांनी मेहनतपूर्व एकत्रित आणि संग्रहित केलेल्या गीतांतून आपल्या पूर्वसुरीचा.. पूर्वजांचा आवाज आपल्यापर्यंत पोहचवलेला आहे आणि ‘शायली झेला’ वा अबोलीच्या झेल्याला.. ‘बोली’त झेलून घेतले आहे... वाडवळी अबोलीचा आणि बोलीचा सुगंध सर्वदूर पसरत राहो, ही शुभेच्छा!

- **डॉ. सिसिलिया कार्व्हालो**, वसई

**‘शायेली झेला’**
हेलन रॉबी डिसिल्वा
प्रकाशक : ग्रंथाली प्रकाशन
मूल्य : रुपये ३००/-.

## समानुभूती जागवणाऱ्या ‘सहवेदना’

फ्रान्सिस मिस्किटा ह्यांचा प्रकाशित झालेला कथासंग्रह म्हणजे ‘सहवेदना’.

सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सहकारी क्षेत्रांत एक सामान्य कार्यकर्ता म्हणून सक्रिय असल्याने फ्रान्सिस ह्यांना सामाजिक प्रश्नांची उत्तम जाण आहे. सामाजिक कार्य, एकेकाळचा त्यांचा वाहतूक व्यवसाय आणि सध्याची दुकानदारी ह्यामुळे त्यांचा जनसंपर्कही दांडगा आहे. तळागाळातील माणसांची दु:खे, समस्या जाणून घेण्याचा, त्यांच्या जीवनातील पडझड पाहून त्यांच्या अंतरंगात शिरून त्यांच्या समवेत एक सहअनुभूती जागवत, ती कथारूपात वाचकांपर्यंत नेण्याचा त्यांचा प्रयत्न म्हणजे ‘सहवेदना’ कथासंग्रह.

प्रस्तुत संग्रहात सुमारे २५ कथा आहेत. फ्रान्सिस मिस्किटा ह्यांचे कथाविश्व सभोवतालचा समाज व त्यामधील माणसांभोवती गुंफलेले आहे. त्या अर्थाने ह्या कुटुंबकथा आहेत. सामान्य नोकरदार,

मजूर, शेतकरी, मध्यमवर्गीय पती-पत्नी, तसेच उच्चभ्रू जमीनदार-व्यावसायिक, प्रियकर-प्रेयसी, सासू-सून, आईबाप-मुले ह्यांच्या नातेसंबंधांच्या, त्यांच्यातील संघर्ष व ताणतणावाच्या तसेच अहंभावाच्या ह्या कथा आहेत. सामाजिक उच्च-नीचतेच्या तसेच घराण्याच्या श्रेष्ठत्वाच्या पोकळ कल्पना, छचोरपणा, बदफैलीपणा, संपत्तीची हाव, लबाडी, व्यभिचार, नैराश्य इत्यादींमुळे उद्ध्वस्त झालेले संसार, भावजीवने आणि एकूणच अधोगतीची किनारही अनेक कथांना आहे. त्या दृष्टीने ह्या समाजकथा ठरतात.



पहिलीच 'भेट' ही प्रेमभंगाची कथा आहे. पश्चात्तापदग्ध तरुणीची कथा 'नवा निर्धार'मध्ये वाचायला मिळते. संशयाचे भूत डोक्यात शिरले की सुखी संसाराची कशी मोडतोड होते हे 'भूत' ह्या कथेत दाखवून दिले आहे.

ख्रिस्तवचनाने प्रेरित होऊन एका मजुराला वाचवण्याची कथानायकाने केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा 'माझा शेजारी' कथेत वर्णिली आहे. हुंडा द्यायला नकार देणारी स्वाभिमानी स्त्री आपल्याला 'प्रतिकार' कथेत; तर गर्भपात करण्यास ठाम नकार देणारी श्रद्धावंत डॉक्टर साधना 'कोणाचा जीव घेऊ नकोस' ह्या कथेत भेटते. पतीचे प्रेम झिडकारून वाममार्गाला वळलेल्या नायिकेचे अध:पतन 'सौभाग्य' कथेत दिसून येते. संग्रहातील बऱ्याच कथांचा शेवट हा शोकान्त आहे. सध्याची आपली एकूणच सामाजिक वाटचाल त्यातून प्रतीत होते. बहकलेली तरुण पिढी, विवाह-विच्छेदांचे वाढते प्रमाण, आत्महत्या, तुटलेली-दुभंगलेली कुटुंबे हे सारे लेखकाने संयत शब्दांतून दाखवून दिले आहे. सामाजिक व्यवहारांकडे लेखक माणुसकीच्या दृष्टिकोनातून पाहतो. त्यातून त्याची सामाजिक जबाबदारी आणि सामाजिक भान जसे दिसते, तसेच एक श्रद्धावंत ख्रिस्ती म्हणून त्याच्या धार्मिक धारणा व नैतिकतेचा ठाम पाया ह्यांचाही प्रत्यय येतो.

ह्या कथांना रुढार्थाने लघुकथा म्हणता येणार नाही. एका हज शैलीत केलेले हे गोष्टीरूप कथन आहे. आधुनिक कथेचा तोरा ही कथा मिरवित नसली तरी गोष्टीरूपाने वाचकाशी अकृत्रिमरीत्या संवाद साधण्याची कला लेखकाकडे आहे. इथे काही नवखेपणाच्या खुणा, योगायोगाच्या घटना जरूर आढळतात; मात्र एका कार्यकर्त्या लेखकाची ही प्रथम साहित्यकृती त्यामधील सच्चेपणामुळे दखलपात्र ठरते. संग्रहाला कवी सायमन मार्टिन ह्यांची प्रस्तावना आहे.

- **स्टॅन्ली गोन्सालविस,** पापडी

**'सहवेदना'**
लेखक:फ्रान्सिस मिस्किटा ऊर्फ स्वच्छंद वसईकर
प्रकाशक : डायना मिस्किटा, वसई
मुखपृष्ठ : राजेश जाधव

●

# 'सुवार्ता'ला प्रेमाचे दान

| | | |
|---|---|---|
| अनामिक | माणिकपूर | ४०००/- |
| जेवीऑन आयवन लोपीस | गोखिवरे | १००१/- |
| आयवन लोपीस | गोखिवरे | १०००/- |
| आगथा जेफ्री डायस | मुळगाव | १०००/- |
| कॅरल बरबोज | ज्योती | १०००/- |
| सॅम्युएल डेजमन डुंगा | उत्तन | १०००/- |
| ट्रिजा रॉकी फर्नांडीस | उत्तन | १०००/- |
| मायकल पिटर रॉड्रिक्स | नंदाखाल | ७५०/- |
| काश्मिरो बरेटो | मनोरी | ७००/- |
| नाताल आल्बर्ट कुटिनो | पापडी | ५००/- |
| ग्रेसी ॲन्थनी कर्व्हालो | पापडी | ५००/- |
| जोकीम जॉन डिकुना | पाली | ५००/- |
| पिटर फिलीप डिक्रुज | सांडोर | ५००/- |
| झेक एम. मिस्कीटा | सांडोर | ५००/- |
| शैला मच्याडो | गिरीज | ५००/- |
| ख्रि. जोसेफ लुजबो, स्मर. | गिरीज | ५००/- |
| ख्रि. मर्सेलीन डिसिल्वा, स्मर. | रमेदी | ५००/- |
| प्रेसिला ॲन्थनी मिरांडा | रमेदी | ५००/- |
| ॲन्थनी फ्रा. घोन्सालवीस | आगाशी | ५००/- |
| दिपक लखमा सनवार | आगाशी | ५००/- |
| रॉयडन मार्शल डिकुन्हा | आगाशी | ५००/- |
| ब्रिजेटा इनास मिरांडा | चुळणे | ५००/- |
| बिजॉय डिमेलो | मुळगाव | ३००/- |
| हिलरी डाबरे | भुईगाव | ३००/- |
| ॲन्थनी डायस | पापडा | ३००/- |
| प्रेसिला व्ही. मच्याडो | मर्सेस | ३००/- |
| मकारियुस एडवर्ड कोयलो | आगाशी | २००/- |
| रूडॉल्फ जॉर्ज | आगाशी | २००/- |
| डॉमणिक परेरा | शिर्लय | २००/- |
| प्रमिला राकेश वाडू | उपलाट | २००/- |
| रेचल कॅजीटन कोलासो | माणिकपूर | २००/- |
| आल्बर्ट पास्काल नुनीस | गिरीज | २००/- |
| अक्षय वेलेरीयन परेरा | मुळगाव | १५०/- |
| मोना सातु परेरा | आगाशी | १००/- |
| ॲन्थनी साल्वादोर परेरा | आगाशी | १००/- |
| निलेश बरबोज | ज्योती | १००/- |
| अनामिक | गिरीज | १००/- |
| सिसीलीया परेरा | गिरीज | १००/- |
| अनामिक | गिरीज | १००/- |
| व्हिक्टर वाझ | गोम्सआळी | १००/ |
| अनामिक | गोम्सआळी | १००/- |
| बॉनी बावतीस डाबरे | वाघोली | १००/- |
| ॲलन मायकल डाबरे | वाघोली | १००/- |
| रिचर्ड घोन्सालवीस | वंडा | १००/- |
| जसिंता पास्कोल डिसोजा | भुईगाव | १००/- |
| सिसिलीया विल्सन पिमेंटा | पापडी | १००/- |
| मिलीटा कोलासो | पापडी | १००/- |
| कोशाव अथाईत | सांडोर | १००/- |
| वियान पॅट्रीक परेरा | मुळगाव | १००/- |
| जेरास्टेनली जोसेफ डिसा | मर्सेस | १००/- |
| वेरोणिका चार्लस मेन्डोसा | उत्तन | १००/- |
| लेस्ली नुनीस | उत्तन | १००/- |
| मार्शल नरोन्हा | पाली | ५०/- |
| मदल्यान सांतुस मच्याडो | पाली | ५०/- |
| कॅथरीन ब्रिटो | आगाशी | ५०/- |
| सुमन पिटर लोपीस | शिर्लय | ५०/- |
| वेल्स विजय तुस्कानो | नंदाखाल | ५०/- |
| एलीस रॉड्रिग्ज | निर्मळ | ५०/- |
| अनामिक | रमेदी | ५०/- |

- *(पुढील नावे पान ९३वर पहा)*

- झेविअर डिमेलो

## पोप लिओ ह्यांचा स्पेनचा प्रेषितीय दौरा



**व्हॅटिकन :** पोप लिओ ६ ते १२ जून २०२६ ह्या कालावधीत स्पेनच्या प्रेषितीय दौऱ्यावर गेले होते. स्पेनचे राजे फिलीप सहावे ह्यांनी माद्रिद विमानतळावर पोपचे स्वागत केले. माद्रिद, बार्सिलोना व कॅनरी बेटांना पोप ह्यांनी भेट दिली. आपल्या दौऱ्यादरम्यान पोपनी शांती, स्थलांतर तरुण आणि चर्चची समाजातील भूमिका हे मुद्दे मांडले. संसदेच्या संयुक्त सत्रात संबोधित करताना लोकशाही समाजासाठी विचार स्वातंत्र्य, विवेक आणि धर्म हे निर्णायक मुद्दे असल्याचे त्यांनी सांगितले. माद्रिदमधील मिस्सामध्ये बारा लाख भाविक सहभागी झाले होते. त्यावेळी पोप म्हणाले की, जगाला शांती हवी आहे. जागतिक नेत्यांनी संयम पाळावा. जगाची विभागणी होऊ देऊ नये. माद्रिदमध्ये स्थलांतरितांसाठी काम करणाऱ्या संस्थेला तसेच तुरुंगाला त्यांनी भेट दिली. बार्सिलोनामध्ये प्रसिद्ध सॅग्राडा फॅमिलिया बॅसिलिकाच्या टॉवरचे त्यांनी उद्घाटन केले.

## पोप लिओ ह्यांचे नवीन ज्ञानपत्र जारी




**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांचे नवीन ज्ञानपत्र 'मॅग्निफिका ह्युमनिटास' प्रसिद्ध झाले आहे. 'एआय' चे नियंत्रण हे काही मोजक्या लोकांच्या हातामध्ये राहता कामा नये असे ह्या ज्ञानपत्रात म्हटले आहे. ह्या तंत्रज्ञानामुळे जागतिक संघर्षांना खतपाणी मिळत असल्याचा इशारा त्यांनी दिला. लष्करी क्षेत्रामध्ये 'एआय'च्या वापराबद्दल सुरू असलेल्या शर्यतीचा निषेध करून मानवाच्या जीवन-मरणाशी संबंधित निर्णय यंत्राकडे सोपविणे हे एका विनाशकारी चक्रासारखे आहे. तंत्रज्ञानाने लोकांच्या नोकऱ्यांचे संरक्षण केले पाहिजे, असे त्यांनी अधोरेखित केले.

## ...आणि उद्योगपती झाले धर्मगुरू



**कॅलिफोर्निया (अमेरिका) :** येथील स्कॉर्ट बोर्बा ह्यांनी फ्रेस्नो धर्मप्रांतात कॅथलिक धर्मगुरुपदाची दीक्षा घेतली. एक सौंदर्यशास्त्रज्ञ, मॉडेल, गायक, अभिनेता आणि प्रसिद्ध सौंदर्यप्रसाधन व्यावसायिक म्हणून त्यांनी अमेरिकेत नाव कमावले होते. देवाचा माणूस होण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यांनी सेन्ट पॅट्रिक सेमिनरीत प्रवेश घेतला. 'पवित्र मरियेने मला मार्ग दाखवला', अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

## आमची श्रद्धा दुणावली आहे - क्लेअर

**हाँगकाँग :** कॅथलिक विचार मुक्तपणे व्यक्त करणारे जीमी लाय २०२०पासून चीनच्या राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार हाँगकाँगमध्ये तुरुंगवास भोगत आहेत. त्यांची मुलगी क्लेअर म्हणते, ''माझ्या वडिलांनी काही चूक केलेली नाही. शांततेने आणि कायद्यानुसार ते न्याय्य हक्कांसाठी लढले. त्यांना देवाच्या कृपेचा अनुभव येतोय. ते तुरुंगात जो त्रास सहन करीत आहेत त्यामुळे आमची श्रद्धा दुणावली आहे.''

## ऐक्य व पर्यावरण संवर्धनासाठी...

**जकार्ता (इंडोनिशिया) :** जकार्ता सरधर्मप्रांताच्या वर्धापन दिनानिमित्त कॅथलिक चर्चने ऐक्य, विविधता आणि पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष वेधण्यासाठी पदयात्रेचे आयोजन केले होते. ह्या पदयात्रेत कॅथलिक धर्मीयांबरोबर अन्य धर्मीयदेखील सहभागी झाले होते. इंडोनेशियाचे धार्मिक बाबींचे मंत्री नसरुद्दीन उमार ह्यावेळी हजर होते. जकार्ताचे आर्चबिशप इग्नेशियस म्हणाले की, पर्यावरण आणि आंतरधर्मीय सुसंवाद वाढावा म्हणून चर्च पदयात्रेसारखे उपक्रम आयोजित करते.

## आम्ही अनेक दिवस उपाशी आहोत...

**हवाना (क्युब) :** कॅरिबियन समुद्रातील क्युबा देशावर अमेरिकेने लादलेल्या आर्थिक, व्यापारी निर्बंधामुळे तसेच देशांतर्गत सरकारी धोरणांमुळे सामान्य जनतेचे जीवन हलाखीचे झाले आहे. देशात अन्नधान्य, ऊर्जा आणि संसाधनांचा तीव्र तुटवडा आहे. दररोज १६ ते २२ तास वीज नसते. औषधांची कमतरता आहे. पाणी आणि विजेअभावी शस्त्रक्रिया होत नाही. पेट्रोलअभावी सार्वजनिक वाहतूक महाग झाली आहे. हवानाचे बिशप मार्सेलो अमादोर म्हणतात, ''पोटात अन्न नसल्याने चर्चमध्ये अनेकांना चक्कर येते.''

## कोरियन तरुणाईला हवीय शांती व समेट

**सेऊल (दक्षिण कोरिया) :** २०२७मध्ये येथे जागतिक युवादिन संपन्न होणार आहे. युवादिनाच्या पूर्वतयारीचा एक भाग




म्हणून दक्षिण कोरियन तरुणांनी दक्षिण व उत्तर कोरियाच्या सीमाभागाचा दौरा केला. सुमारे ६० कि.मी. सीमेवरील पर्यावरणीय उद्याने, ऐतिहासिक ठिकाणे ह्यांना त्यांनी भेट दिली. प्रार्थना, चर्चासत्रे, प्रबोधन व संगीत मैफिलीद्वारे विभक्त कोरियाच्या एकीकरणासाठी आवाहन केले आणि शांती, समेट व पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

## ब्राझिलमधील ऐतिहासिक चर्च आगीत नष्ट

**फ्लोरेंस दा कुन्हा (ब्राझिल) :** दक्षिण ब्राझिलमधील अवर लेडी ऑफ लुर्ड्स ह्या १२० वर्षांच्या ऐतिहासिक चर्चला आग लागून ते नष्ट झाले. चर्चच्या नूतनीकरणाचे काम सुरू असताना ही आग लागली. त्यामुळे मनुष्यहानी झाली नाही. गोथिक शैलीतील हे चर्च फ्रेंच कॅप्युचिन फ्रायर्स धर्मगुरूंनी बांधले होते.

## पोलिश लुर्ड्स तीर्थस्थानात

**वॉरसा (पोलंड) :** पोलंडमधील ग्रामीण भागातील ग्येट्श-बोट हे ठिकाण लवकरच जगातील कॅथलिक श्रद्धावंतांचे लक्ष वेधून घेणार आहे. येथे आहे पवित्र मरियेचे तीर्थस्थान जे पोलिश लुर्ड्स म्हणून ओळखले जाते. ह्या ठिकाणी १८७७ मध्ये दोन मुलींना (जस्टिना व बार्बरा) मरिया मातेने दोन महिन्यांमध्ये १६०वेळा दर्शन दिले होते. पुढील वर्षी २०२७ मध्ये ह्या घटनेला १५०वर्षे होत आहेत. त्या निमित्ताने ह्या तीर्थस्थानाला भेट देण्याचे आमंत्रण पोप लिओ ह्यांना पोलिश बिशप व सरकारने दिले आहे.

## पाकिस्तानी बिशप व्हॅटिकनमध्ये

**व्हॅटिकन :** पाकिस्तानमधील कॅथलिक बिशपांनी AD Limina निमित्ताने पोप लिओ ह्यांची व्हॅटिकनमध्ये भेट घेतली.



त्यांनी पाकिस्तानमधील सुमारे ३३लाख ख्रिस्ती लोकांना भेडसावत असलेल्या समस्यांची पोपना माहिती दिली.

## स्थलांतरितांचे संरक्षण करा-
### इथिओपियन बिशप

**आदिस अकाबा :** जगभरातील इथिओपियन स्थलांतरित शोषण, हिंसाचार, भीती, गैरवर्तन ह्यांच्याशी सामना करीत आहेत. मध्यपूर्व, आफ्रिका, युरोप ह्या ठिकाणी अधिक चांगल्या जीवनमानासाठी स्थलांतर केलेल्या ह्या इथिओपियन नागरिकांना अमानवी वागणूक मिळत आहे. इथिओपियन बिशपांनी त्याविरुद्ध आवाज उठवला असून त्यांना दयेची वागणूक मिळावी आणि त्यांचे संरक्षण व्हावे, असे आवाहन केले आहे.

## ब्रुनेईमधील ख्रिस्ती जीवन आहे कसे?

**बंदरसेरी बेगवान (ब्रुनेई) :** बोर्निओ बेटाच्या एका बाजूला ब्रुनेई हा छोटासा, श्रीमंत आणि मुस्लिमबहुल देश असून शरिया कायदा पाळणाऱ्या ह्या देशाच्या प्रमुखपदी सुलतान आहे. ह्या देशात तीन चर्च व तीन धर्मगुरू आहेत. सध्या ब्रुनेईचा एक नागरिक परदेशात धर्मगुरुपदाचे शिक्षण घेत आहे तर एक महिला धर्मभगिनी होण्यासाठी परदेशात शिकत आहे. बाहेरच्या देशातील धर्मगुरू/धर्मभगिनींना येथे काम करता येत नाही चर्चबाहेर कोणताही धार्मिक विधी करता येत नाही. नवीन शाळा बांधण्यास परवानगी नाही. कॅथलिक चर्च तीन शाळा चालवते. बहुसंख्य विद्यार्थी मुस्लिम धर्मीय आहेत.

## गाझामधील विद्याथी शिक्षणासाठी रोममध्ये

**रोम :** रोम धर्मप्रांत, सॅपियेन्झा विद्यापीठ आणि सेन्ट एगिडिओ ह्यांच्या संयुक्त विद्यमाने युद्धमय परिस्थितीमुळे शिक्षण अपुरे राहिलेल्या गाझातील ७२ विद्यार्थ्यांची रोममधील विविध विद्यापीठांमध्ये शिक्षणाची मोफत सोय करण्यात आली आहे. सॅपियेन्झा विद्यापीठातील कार्यक्रमात पोप लिओ ह्यांनी ह्या विद्यार्थ्यांची भेट घेतली आणि त्यांना सदिच्छा दिल्या.

## दहा धर्मगुरूंनी घेतली गुरुपदाची दीक्षा

**चार्लोटी (अमेरिका) :** सेन्ट मार्क चर्चमध्ये बिशप मायकल मार्टिन ह्यांनी दहा धर्मगुरूंना आपल्या पदाची दीक्षा दिली. ह्या धर्मप्रांतातून पहिल्यांदाच एवढ्या संख्येने धर्मगुरू झाल्याने



श्रद्धावंतांनी मोठ्या प्राणात दीक्षाविधीमध्ये भाग घेतला. बिशप आणि ९५ धर्मगुरूंनी नूतन धर्मगुरूंच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला.

## आणखी एक महिला व्हॅटिकन प्रशासनात



**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांनी मारिया मॉन्टसेराट अलवाराडो ह्यांची व्हॅटिकनच्या संप्रेषण खात्याच्या प्रमुख (Prefect of the Dicastary for Communication) म्हणून नेमणूक केली आहे. त्या EWTN ह्या जागतिक कॅथलिक संप्रेषण नेटवर्कच्या अध्यक्ष होत्या मारिया मॉन्टसेराट धर्मभगिनी नाहीत, विवाहित आहेत.

धार्मिक

## गावकी क्रॉसचा आशीर्वादविधी

**सांडोर :** येथील नागळई, तळई, वैतोडी व आगरदम गावकीतर्फे ५० वर्षांपूर्वी (२९ मे १९७६) बांधलेल्या आणि त्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त नूतनीकरण केलेल्या क्रुसाचा



आशीर्वादविधी वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या शुभहस्ते शुक्रवार २९ मे २०२६ रोजी पार पडला. ह्या प्रसंगी सांडोर धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फा. रेमंड रुमाव तसेच फा. (डॉ.) अनिल परेरा, फा. अ‍ॅन्ड्र्यू रॉड्रिग्ज, फा. वालेंटाईन पावकर आणि अनेक धर्मभगिनी उपस्थित होत्या. आशीर्वाद विधीनंतर पवित्र मिस्सा साजरी करण्यात आली. त्यावेळी बोलताना बिशप थॉमस डिसोजा म्हणाले, ''क्रूस आपल्याला त्याग, क्षमा, सेवा आणि प्रेम ह्यांचा संदेश देतो. आजच्या काळातही हा संदेश आपण आपल्या कुटुंबात, गावकीत, समाजात आणि विशेषत: तरुण पिढीमध्ये जपला पाहिजे.'' ह्याप्रसंगी स्मरणिकेचे प्रकाशन बिशपांच्या हस्ते करण्यात आले. स्मरणिकेसाठी आर्चबिशप (एमेरितुस) (डॉ.) फेलिक्स मच्याडो ह्यांनी महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे.

**- नाझरेथ अथाईत,** नागळई, सांडोर

## ९०वा वर्धापनदिन

**डहाणू :** अवर लेडी ऑफ डॉलर्स चर्चची स्थापना सन १९३५ मध्ये झाली असून ह्यावर्षी चर्च आपल्या स्थापनेची ९०वर्षे पूर्ण करीत आहे. ह्या वर्धापन वर्षानिमित्त ७ जून रोजी सेंट मेरी हायस्कूल, डहाणू येथे भव्य सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. फा. रिचर्ड रोझारिओ ह्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अजय फर्नांडिस, डॉ. रोमियो मस्कारेन्हास, विनय रोझारिओ आणि इतर अनेक सहकाऱ्यांच्या प्रयत्नांतून हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅरल मोरायस आणि पर्ल डिसोजा ह्यांनी केले.

ह्या कार्यक्रमास सेंट जॉन कॉलेज, पालघरचे अध्यक्ष आल्बर्ट डिसोजा व त्यांच्या पत्नी एल्व्हिना डिसोजा, आमदार विनोद निकोले, डॉ.रोमियो मस्कारेन्हास, हेमंत पांचाळ, विल्यम डिसोजा, सेंट मेरी शाळेच्या मुख्याध्यापिका नीता वाझ तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. ह्यावेळी चित्रकला, वक्तृत्व, निबंध, नाटिका, गायन आणि नृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

**- विनस रोझारिओ,** डहाणू

## तलासरी मिशन शताब्दी सांगता सोहळा

**तलासरी :** ९ जून रोजी मिशन शताब्दी वर्षाचा सांगता सोहळा पार पडला. फा. अनिल परेरा, ये.सं., जेज्वीट प्रोव्हिन्शियल ह्यांनी अनेक धर्मगुरूंसह मिस्सा साजरी केली. त्यांनी तलासरी मिशनच्या कार्याचा आणि सर्व मिशनऱ्यांच्या योगदानाचा गौरव केला.




मिस्सानंतर आदिवासी संस्कृती, मिशन इतिहास, मिशनचे धार्मिक, शैक्षणिक कार्य ह्याविषयी विविध कार्यक्रम झाले. तसेच मिशनविषयी तयार केलेला व्हिडिओ दाखवण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळी बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या हस्ते 'शतपावली मिशनची' ह्या अंकाचे प्रकाशन झाले. ह्या अंकासाठी फा. जॉन फरोज, फा. रॉबर्ट डिसोजा, फा. सॅबी कोरिया, फा. थॉमस लोपीस आणि संपादक मंडळ सदस्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. विविध विषयांवरील लेखांतून संपूर्ण तलासरी मिशनचे दर्शन चित्रित केले आहे. बिशष थॉमस डिसोजा ह्यांनी तलासरी मिशनच्या योगदानाविषयी आणि भविष्याविषयी मनोगत व्यक्त केले.

**- फा. जॉन मॅथ्यू फरोज,** ये. सं.

## एक वर्ष विशेष तीर्थस्थान



**उमराळे :** संत फ्रान्सिस असिसी ह्यांच्या मृत्यूला ८००वर्षे पूर्ण झालेली आहेत. उमराळे येथील सेंट जोसेफ चर्च हे वसई धर्मप्रांतातील एकमेव फ्रान्सिस्कन मिशनरी चर्च आहे. वसईचे मेंढपाळ बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी भाविकांच्या उपस्थितीत हे वर्ष उमराळे चर्च 'विशेष तीर्थस्थान' म्हणून ७जून २०२६ रोजी घोषित केले. ह्या प्रसंगी बोनावेंचर धर्मप्रांताचे प्रांताधिकारी रे.फा.ब्रायन बांड्या, प्रमुख धर्मगुरू रे.फा. नितीन डिसोजा उपस्थित होते. हा कालावधी ७ जून २०२६ ते १० जानेवारी २०२७ पर्यंत असेल.

## धर्मशिक्षक मेळावा

**बोळींज :** जीवन ज्योती धर्मशिक्षण केंद्रतर्फे धर्मशिक्षक मेळावा ख्रिस्तराजा चर्च, बोळींज येथे १४ जून रोजी संपन्न झाला. युवदर्शन टीम व फादर निलेश ह्यांनी स्तुती आराधनेने कार्यक्रमाची सुरुवात केली. बोळींज धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फादर विकेश

कोरिया ह्यांनी केलेल्या प्रास्ताविकात ख्रिस्तराजा चर्चच्या नवीन वास्तुविषयी व प्रतीकाची महती सांगत प्रभू ख्रिस्ताच्या दयेचा अनुभव व्यक्त केला.

जीवन ज्योतीचे संचालक फादर निलेश तुस्कानो रचित मेळाव्याचे थीम साँग प्रदर्शित केले. त्यांनी 'ख्रिस्तासोबत चालत,



शिष्य घडवू या' ह्या धर्मशिक्षण विषयावर पुढील प्रमाणे मार्गदर्शन केले : १) धर्मशिक्षणाचे स्तंभ, प्रार्थना, चर्चात्मक शिक्षण, आनंद, सेवा, प्रेम, क्षमा, त्याग ह्याद्वारे शिक्षण देत एकत्र ख्रिस्ताबरोबर चालणे. २) श्रद्धा बांधणी - fostering the faith of the pilgrim people, ख्रिस्ती श्रद्धा म्हणजे हृदय, मन व कृती ह्यांची सर्वांगीण बांधिलकी. ३) धर्म शिक्षणाचे पैलू - पवित्र शास्त्र, ख्रिस्ती परंपरा, ख्रिस्तसभेची शिकवण, उपासना, प्रार्थना. ४) धर्मशास्त्र - देवाचे प्रकटीकरण व धर्मशिक्षण कसे प्रभावी बनवावे, मुलांना येशूच्या जवळ कसे आणावे ह्याविषयी प्रबोधन केले.

जून २०२५ ते एप्रिल २०२६ ह्या संडे स्कूल वर्षात जीवन ज्योतीतर्फे आयोजित व नियोजित संडेस्कूल व दृढीकरण वर्गाच्या कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल पॉवर पॉईंटद्वारे डॉल्सी डिकोस्टा ह्यांनी सादर केला. धर्मशिक्षिका स्नेहल मार्टिन, ह्यांनी चौथी ते पाचवीच्या वर्गावर 'देवाचे प्रेम' ह्या विषयावर बायबल वचन, व्हिडिओ, ॲक्शन साँग, फ्लॅश कार्ड उपक्रम व प्रश्नमंजुषा ह्या सर्वांची सांगड घालत आदर्श पाठ सादर केला. त्यानंतर शैला डायस, रेजिना लोपीस, प्रेसि डिसोजा, सारा मर्ती, ब्रिजदिन लोपीस ह्यांनी आपले अनुभव कथन केले.

बोळींज पॅरिशच्या धर्मशिक्षकांनी ॲक्शन साँग द्वारा सहभागी धर्मशिक्षकांचा उत्साह टिकून राहण्यास प्रोत्साहन दिले. तद्नंतर उपस्थित सर्व धर्मगुरू-धर्मभगिनी ह्यांच्या साक्षीने जीवन ज्योती चे संचालक व उपसंचालन फा. अविनाश ह्यांनी संडे स्कूल प्लॅनरचे अनावरण केले. उपस्थित सर्व धर्मशिक्षकांचा फा. जॉन्सन मिनेजिस ह्यांच्या मार्गदर्शनाखाली शपथविधी झाला. फा. अविनाश ह्यांनी धर्मशिक्षकांना व त्यांना देण्यात येणाऱ्या स्मृतिचिन्हांना आशीर्वाद दिला. फा. अविनाश ह्यांनी आभार प्रदर्शन केले. 'ख्रिस्ताबरोबर चालत शिष्य घडवू या' ह्या थीम प्रेरित स्मृतिचिन्ह व प्लॅनर वाटपाद्वारे कार्यक्रमाची सांगता झाली. एकूण ३५० शिक्षकांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन ग्लोरीया रॉड्रिग्ज व डॉल्सी मिनेजिस ह्यांनी केले.

- **प्रमिला नितीन डाबरे**, निर्मळ

**क्रीडा**

## भुईगावचा सुपुत्र 'आयर्नमॅन'



**वसई :** जर्मनीतील हॅम्बर्ग येथे पार पडलेल्या, पूर्ण आयर्नमॅन स्पर्धेमध्ये भुईगाव येथील प्रीत नेपोलियन गीता डाबरे ह्या तरुणाने २२४.८ कि.मी.चे अंतर १४ तास, १२ मिनिटे, ११ सेकंद ह्या अवधीत पूर्ण करून 'आयर्नमॅन' हा किताब पटकावला. 'सुवार्ता' परिवारातर्फे प्रीत आणि त्याच्या माता-पित्यांचे अभिनंदन!

**सामाजिक**

## वार्षिक वर्धापनदिन

**माणिकपूर :** गुरुवार २८ मे रोजी ज्येष्ठ नागरिक संघ, माणिकपूर ह्यांचा वार्षिक वर्धापन दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षा मॅटिल्डा आल्फान्सो ह्यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे फिलीप घोन्सालवीस ह्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष फा. आसिस रॉड्रिग्ज ह्यांनी ज्येष्ठांच्या उत्साहामधून तरुणांनी काहीतरी शिकण्यासारखे आहे असे सुचविले. ह्या प्रसंगी वयाची ७५ व ८० वर्षे पूर्ण केलेल्यांचा तसेच लग्नाची ५० वर्षे पूर्ण केलेल्यांचा सन्मान करण्यात आला.

## जयंतीनिमित्त व्याख्यान

**निर्मळ :** दिवंगत माजी आमदार प्रा. स.गो.वर्टी ह्यांच्या जयंतीनिमित्त रविवार ७ जून रोजी निर्मळ येथील समाजसेवा मंडळ, सभागृह येथे भाषा अभ्यासक प्रा. दीपक पवार ह्यांचे 'मराठी वाचवूया' ह्या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. ह्या व्याख्यानाचे आयोजन प्रा.स.गो.वर्टी मेमोरियल ट्रस्ट ह्यांनी केले होते. प्रास्ताविक उपाध्यक्ष कुमार राऊत ह्यांनी केले. अध्यक्षा जयश्रीताई सामंत ह्यांनी वर्टी सरांच्या आठवणींना उजाळा दिला. ह्या प्रसंगी वसईतील वाचनालयांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. आभार हर्षद चौधरी ह्यांनी मानले. सूत्रसंचालन कॅलिस ब्रास ह्यांनी केले.

## वसई नागरी समस्या

**गिरीज :** न्याय व शांती आयोगातर्फे वसईच्या सध्याच्या स्थितीबाबत विविध विभागांतील कार्यरत सदस्यांची चौथी सभा रविवार १४ जून रोजी गिरीज चर्च हॉलमध्ये बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. वसईच्या विविध भागांतून ३३ कार्यकर्ते सभेसाठी उपस्थित होते. पुढील समित्यांनी अहवाल सादर केले : १) रस्ते, गटारे व परिवहन २) पाणी व घरे ३) आरोग्य व शिक्षण ४) पर्यावरण ५) संविधान जागर ६) जनजागृती व मीडिया. त्यानंतर नागरी समस्या निवारण समितीने त्यांचा अहवाल सादर केला.

उपरोक्त समित्या आपल्या अखत्यारीतील कामाचा अभ्यास करताना सुकाणू समिती पुढील कार्यदिशा ठरवील. पुढील विषयांबाबत प्राधान्याने काम करण्याचे ठरले : SIR, घरे व पिण्याचे पाणी, वाढीव घरपट्टी रद्द करणे आणि स्मार्ट मीटर. रविवार १९ जुलै रोजी आगामी सभा घेण्याचे ठरले.

## खासदार व आमदारांसोबत नागरिकांचा संवाद

**निर्मळ :** नागरी समस्या निवारण समिती, वसई आणि जीवन विकास मंडळ ह्यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १४ जून रोजी जीवन विकास मंडळ, नवाळे सभागृहात कार्यक्रम पार पडला. ह्या प्रसंगी पालघर मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत सावरा आणि नालासोपारचे आमदार राजन नाईक ह्यांनी उपस्थित राहून नागरिकांशी थेट संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा होते. प्रा.डॉ. प्रसाद डाबरे ह्यांच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. रेजिना आल्मेडा ह्यांनी




उपस्थितांचे स्वागत केले. समितीचे अध्यक्ष ॲड. विल्यम फर्नांडिस ह्यांनी वसई तालुक्यातील सुमारे १८ प्रमुख समस्यांचे सविस्तर विवेचन केले. आमदार राजन नाईक व खासदार हेमंत सावरा ह्यांनी, ''ह्या सर्व समस्या सोडवण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत'', अशी ग्वाही नागरिकांना दिली. अध्यक्षीय भाषणात बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी उपस्थितांना उद्‌बोधक मार्गदर्शन केले.

संसदरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार डॉ. हेमंत सावरा ह्यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. ह्या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनीही आपल्या प्रभागांतील समस्या थेट खासदार व आमदारांसमोर मांडल्या. ह्या प्रसंगी धर्मस्वातंत्र्य विधेयक (२०२६) रद्द करण्यात यावे ह्यासंबंधी डॉमणिका डाबरे ह्यांनी नागरी समस्या निवारण समितीतर्फे माननीय मुख्यमंत्री ह्यांना उद्देशून असलेल्या निवेदनाचे वाचन केले आणि सर्व मान्यवरांनी ते निवेदन खासदार व आमदार ह्यांना सुपूर्द केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोसेफ डाबरे ह्यांनी केले, अंतोन परेरा ह्यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. ह्यावेळी वसईभरातील अनेक सुजाण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गार्डवेल इंडस्ट्रीजचे विल्यम तुस्कानो ह्यांना पुरस्कार

**वसई :** गार्डवेल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विल्यम तुस्कानो ह्यांचा वसई येथे उद्योगभूषण पुरस्काराने गौरव करण्यात येऊन त्यांचा भव्य सत्कार उत्साहात पार पडला. ह्या कार्यक्रमास खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार राजन नाईक, आमदार स्नेहा दुबे पंडित, आमदार विलास तरे, महाराष्ट्र लघुउद्योगचे अध्यक्ष अमित घैसास, माजी महापौर राजीव पाटील, वसईचे अध्यक्ष अरविंद पाटील आदी मान्यवरांनी तुस्कानो ह्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. ह्यावेळी उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



ख्रि. ॲन्थनी तुस्कानो ह्यांनी ४० वर्षांपूर्वी सुरू केलेला 'गार्डवेल उद्योग' देशभर स्टील फर्निचर निर्मितीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले उत्पादन पोहचविले आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## कॅथलिक बँकेला भारतरत्न सहकारिता सन्मान

**वसई :** भारत सहकारी बँकिंग सुमित २०२६ तर्फे लखनऊ येथे जून २०२६ मध्ये आयोजित कार्यक्रमात बसिन कॅथलिक को-ऑप. बँक लि. ची 'भारतरत्न सहकारिता सन्मान' ह्या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झालेली आहे. ह्या पुरस्कारासाठी दोन प्रमुख श्रेणींमध्ये सर्वोत्कृष्ट 'एन.पी.ए. व्यवस्थापन' आणि सर्वोत्कृष्ट 'डिजिटल पेमेंट'साठी निवड करण्यात आली आहे.

'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

**साहित्यिक**

## 'प्रसादचिन्हे' पुस्तकास पुरस्कार

**वसई :** शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट ह्यांच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिका डॉ. सिसिलिया कार्व्हालो ह्यांच्या 'प्रसादचिन्हे' ह्या साहित्यकृतीस लक्षणीय गद्य साहित्यकृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'सुवार्ता' परिवारातर्फे डॉ. कार्व्हालो ह्यांचे अभिनंदन!



## ‘पाऊलखुणा’चे प्रकाशन

**नंदाखाल :** गुजरात येथे सेवाकार्य करीत असलेले ज्येष्ठ येशूसंघीय धर्मगुरू रे.फा.टोनी दिब्रिटो ह्यांच्या जीवनानुभवावर



आधारित ‘माझ्या पाऊलखुणा’ (सहयोग प्रकाशित) ह्या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार २६ मे रोजी नाझरेथ माऊली सेंटर (जेलाडी, आडले, तळई), नंदाखाल येथे झाले. ह्या प्रसंगी फा. ॲण्ड्र्यू रॉड्रिग्ज, फा. रेमंड रुमाव, फा. (डॉ.) शैलेंद्र रॉड्रिग्ज, फा. विन्सेंट डिमेलो, कवी सायमन मार्टिन, उद्योजक शिलू दिब्रिटो उपस्थित होते. अस्मिता दिब्रिटो ह्यांनी प्रास्ताविक केले. रुबिना डिमेलो ह्यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘वर्ष - १५७३’चे प्रकाशन



**नंदाखाल :** क्रॉस ग्रुप संघटना, नंदाखालतर्फे बुधवार ३जून रोजी फादर (डॉ.) रॉबर्ट मच्याडो लिखित ‘वर्ष - १५७३’ ह्या पुस्तकाचे प्रकाशन नंदाखाल चर्चचे प्रमुख धर्मगुरू रे.फा. डॉमनिक डिआब्रिओ ह्यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक ॲण्ड्र्यू लोबो ह्यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विन्सेंट परेरा ह्यांनी केले.

## ‘कृतज्ञतेची ज्योत’ प्रकाशित



**निर्मळ :** रविवार ७ जून रोजी प्रा.स.गो.वर्टी मेमो. ट्रस्टतर्फे झालेल्या व्याख्यानात ग्रंथाली प्रकाशित लेखक जॉन गोन्सालविस लिखित ‘कृतज्ञतेची ज्योत’ ह्या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. दीपक पवार ह्यांच्या हस्ते झाले.

## ‘गीत’ नाताळ अंकास पुरस्कार

**सांडोर :** ‘छंद्श्री’ दिवाळी अंक स्पर्धा, पुणे आयोजित उत्कृष्ट नाताळ अंकाचा प्रथम पुरस्कार ‘गीत’ नाताळ अंकाला मिळालेला आहे. संपादक लेस्ली डायस व त्यांच्या सहकाऱ्यांचे ‘सुवार्ता’ परिवारातर्फे अभिनंदन!



## सहवेदना



**गास :** ‘सुवार्ता’ वितरक आग्नेलो फ्रान्सिस परेरा ह्यांचे १७ मे २०२६ रोजी वयाच्या ६४व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.



**गिरीज :** ‘सुवार्ता’ वितरक मिल्टन फरेरा ह्यांच्या आई श्रीमती मॅग्दलेन निकलस फरेरा ह्यांचे २५मे रोजी वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले.



**नंदाखाल :** कोलभाग येथील ‘सुवार्ता’ वितरक आयरीन कोरिया ह्यांच्या आई श्रीमती मेरी सायमन कोरिया ह्यांचे २८ मे रोजी वयाच्या९३व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.



**नंदाखाल :** रुमावआळी येथील ‘सुवार्ता’ वितरक ज्युलियन रुमाव ह्यांची बहीण रेजिना आलेस डायस, आगाशी, धोबी तलाव, खारोडी ह्यांचे २८ मे रोजी वयाचा ६६व्या वर्षी अकाली निधन झाले.




**बरामपूर :** ‘सुवार्ता’ वितरक सुरेखा ख्रिस्तॉय डिसोजा ह्यांच्या सासू श्रीमती फिलोमेरी फ्रान्सिस डिसोजा ह्यांचे ८ जून रोजी वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले.

## माजी तहसीलदार पास्कोल डिसोजा ह्यांचे निधन



**वाघोली :** वाघोली, मर्देस येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पास्कोल डिसोजा ह्यांचे वयाच्या ८६व्या वर्षी दिनांक २जून रोजी निधन झाले. ते महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातून तहसीलदार पदावरून निवृत्त झालेले होते. उत्तर वसई समाजसेवा मंडळ, जीवन विकास मंडळ आदी संस्थांचे ते संस्थापक सदस्य होते. प्रबोधन सेवा मंडळाद्वारे गरीब शेतकऱ्यांना मदत व सल्ला देण्याचे कार्य त्यांनी केले होते. मुंबई आणि वसई येथील चर्चचे अनेक वर्षे सल्लागार म्हणून त्यांनी विना मोबदला योगदान दिलेले आहे. अभ्यासू, प्रामाणिक व स्वच्छ चारित्र्याचे अधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती.

## उद्योजक पायस रॉड्रिग्ज ह्यांचे निधन



**नंदाखाल :** परसाव येथील प्रसिद्ध सुकेळी उद्योजक पायस रॉड्रिग्ज यांचे १९ जून रोजी वयाच्या ५८व्या वर्षी निधन झाले. वसईतील पारंपरिक सुकेळी व्यवसाय लोकाभिमुख करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी तयार केलेल्या सुकेळीला देशा-विदेशात मागणी होती.

‘सुवार्ता’ परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# 'सुवार्ता'ला वितरकांद्वारे आलेले प्रेमाचे दान

**आर्थर लोबो, मढ-आयलँड**

| | |
|---|---|
| सन्नी आंद्रू कोळी | २०००/- |
| लिला विन्सेंट कोळी | ११००/- |
| इंदिरा डॉमणित कोळी | १०००/- |
| एकनाथ फ्रान्सिस धाके | १०००/- |
| नाझरेथ डिलीमा | १०००/- |
| दत्ताराम आंद्रू कोळी | ५००/- |
| प्रेसी लिओ मिरांडा | ५००/- |
| संज्याव शिमांव कोळी | ५००/- |
| जॉन कोळी | ५००/- |
| मिल्टन पेद्रु धाके | ५००/- |
| रमेश पेद्रु धाके | ५००/- |
| राजेश संज्याव कोळी | ५००/- |
| एलिजा किशोर कोळी | ५००/- |
| सोवार शिलू कोळी | ५००/- |
| संजय सुरपिदे | ५००/- |
| अंजू मोजेस कोळी | ५००/- |
| विजय अगस्तीन अेरंगळे | ५००/- |
| लविना सुनील कोळी | ५००/- |
| हरेश झुजीन कोळी | ३००/- |
| वजिना रिची परेरा | ३००/- |
| रिता विन्सेंट किल्मो | २५०/- |
| रॉय मिरांडा | २००/- |
| व्हॅलेरियन ब्लेज मिरांडा | २००/- |
| स्टॅनी पास्कोल किल्मो | २००/- |
| मायकल कोळी | २००/- |
| डेनीस ना. कोळी | २००/- |
| सारिका लॉरेन्स कोळी | २००/- |
| मेरी सुरेश भोतकर | २००/- |
| झुज्या ज्याव कोळी | २००/- |
| विनय गरिबा कोळी | २००/- |
| एड्रियन लेवनाथ लोबो | २००/- |

**प्रमिला बुरकेन, भाटेबंदर**

| | |
|---|---|
| क्रिझम बोट ग्रुप | १०००/- |
| दाविद बोट ग्रुप | १०००/- |
| ब्लेस फ्रान्सिस गौऱ्या | ५००/- |
| नोहा बोट ग्रुप | ५००/- |
| याजक बोट ग्रुप | ५००/- |
| मार्क व मिस्कीना गौऱ्या | ३००/- |
| डेजी रिर्चड घोन्सालवीस | ३००/- |
| फुलोमीना गौऱ्या | ३००/- |
| वेस्टीना बुनकवली | ३००/- |
| रेनी बुनकवली | ३००/- |
| नेल्सन गौऱ्या | ३००/- |
| गोल्डन जेरोल गौऱ्या | २००/- |
| केवीन बुनकवली | २००/- |
| शॉनल रूपेश गौऱ्या | २००/- |
| गॉडवीन नारळ्या | २००/- |
| वालेंतीन बुरकेन | २००/- |
| क्लिफ्टंन भगत | २००/- |
| रायसा गौऱ्या | १५०/- |
| अनिता गौऱ्या | १००/- |
| रेनॉल्ड इलक्या | १००/- |
| ज्युलियाना नारळ्या | १००/- |
| फ्रॅन्की गौऱ्या | १००/- |
| वेलस्ली नारळ्या | १००/- |
| रेशमा गौऱ्या | १००/- |
| बेल्जम गौऱ्या | १००/- |
| लिबान रोमन बुनकवली | १००/- |
| महिमा रॉबीन बुनकवली | १००/- |
| फुलेमेना फ्रान्सिस गौऱ्या | १००/- |
| हॅरी गौऱ्या | १००/- |
| कलमेत गौऱ्या | १००/- |

**रॉबी मार्टिन, गिरीज**

| | |
|---|---|
| लुईस जोजेप मार्टिन | १०००/- |
| अपलन जॅक बॅप्टीस्टा | ५००/- |
| राजू आल्बर्ट लोपीस | ५००/- |
| जोजेफ फ्रान्सिस डाबरे | ५००/- |
| सुभाष बारात | ५००/- |
| जोसेफ मार्शल बॅप्टीस्टा | ३००/- |
| आग्नेलो बॅप्टीस्टा | ३००/- |
| मायकल डिसोजा | ३००/- |
| चर्चिल बॅप्टीस्टा | ३००/- |
| कोसेसाव झेवीयर बॅप्टीस्टा | ३००/- |
| ऐबेन फ्रेडी कर्व्हालो | २२०/- |
| रेखा डेनिस कुटिनो | २००/- |
| रॉस्टन मनवेल कर्व्हालो | २००/- |
| नॉलटन मनवेल कर्व्हालो | २००/- |
| रीटा गोम्स | २००/- |
| रॉकी कर्व्हालो | १०१/- |
| लेस्ली फिलीप बॅप्टीस्टा | १००/- |
| पॅट्रीक कर्व्हालो | १००/- |
| मायकल पॉल मार्टिन | १००/- |
| नेल्सन बॅप्टीस्टा | १००/- |
| मनोज दतु वेखंडे | १००/- |
| सदानंद दाडेकर | १००/- |
| नाताल डिसोजा | ३०/- |
| गोल्बेट बॅप्टीस्टा | ३०/- |

**सेबेस्टीयन परेरा, सांडोर**

| | |
|---|---|
| रिचर्ड सेबेस्टीन कोयलो | ५००/- |
| प्रविण अगस्तीन अंड्राडीस | ५००/- |
| सिथीया सेबेस्टीन परेरा | ५००/- |
| बेसिल जेम्स कोलासो | २००/- |
| मार्था जेम्स कोलासो | २००/- |
| डॉमिनीक एम. परेरा | २००/- |
| व्हिक्टर फ्रान्सिस परेरा | २००/- |
| जॉना आसिस परेरा | १००/- |
| अनामिक | १००/- |

**फ्रान्सिस रॉड्रिक्स, गास**

| | |
|---|---|
| ग्रेगरी फरगोज | ५००/- |
| सेबेस्टीयन अगस्टीन फोस | ५००/- |
| थॉमस परेरा | ५००/- |
| जोसेफ आलेक्स फरगोज | ५००/- |
| वेलेरीयन मायकल परेरा | ५००/- |
| मनवेल एलायस डिसिल्वा | ४००/- |
| घोन्सालो सिल्वेस्टर परेरा | ३००/- |
| सिल्वेस्टर परेरा | ३००/- |
| वेननसीयो फिदेलीस परेरा | २००/- |
| मायकल अंतोन अल्फान्सो | २००/- |
| सेबेस्टीयन थॉमस फरगोज | २००/- |
| ॲन्सी सायमन परेरा | २००/- |
| बोनाव्हेंचर अं. अल्फान्सो | २००/- |
| सायमन मतेस तुस्कानो | १००/- |
| जोकीम इनास घोन्सालवीस | १००/- |
| घोन्सालो जोकीम तुस्कानो | १००/- |
| प्रेसीला पी. रॉड्रिग्ज | १००/- |
| थॉमस कैतान अल्फान्सो | १००/- |
| शोभा फरगोज | १००/- |
| संगीता केवीन आल्मेडा | १००/- |
| जोसेफ परेरा | १००/- |
| पास्कोल फ्रान्सिस फिगेर | १००/- |

**स्विटी कोलासो, माणिकपूर पीठा**

| | |
|---|---|
| वेरोणिका लोपीस | ८००/- |
| जॉन आसाव | ८००/- |
| रेनॉल्ड फरोज | ३००/- |
| जॉन लोपीस | ३००/- |
| लिओ कोलासो | ५०/- |

**जॉनी मिनेजीस, माणिकपूर**

| | |
|---|---|
| अनामिक | ५००/- |
| यशवंत भामरे | ५००/- |
| नॉबी सेबेस्टीन डिसोजा | ५००/- |
| मार्शेल पॉल डिमेलो | ३००/- |
| इजाबेल मर्यान आल्मेडा | २००/- |

**लुकस लोपीस, गोखिवरे**

| | |
|---|---|
| जेनी वैती | १०००/- |
| ऑगस्टीन संजाव लोपीस | ५००/- |
| फ्लेवीयन जॉर्ज लोपीस | ५००/- |
| झीना वेन्सी डिसोजा | ५००/- |
| अंतोन लोपीस | ५००/- |
| डॉमणिका फ्रा. घोन्सालवीस | २००/- |
| सुजाता शांताराम पाटील | २००/- |
| सरीता घोन्सालवीस | २००/- |
| अनामिक | १००/- |
| अनामिक | ५०/- |
| अनामिक | २०/- |

**आग्रेस एलायस परेरा, पापडी**

| | |
|---|---|
| सिलीन परेरा | ५५०/- |
| विल्टन परेरा | ५००/- |
| आयरीन परेरा | २००/- |
| रेखा कोलासो | ३००/- |
| रॉय फर्नांडीस | ५०/- |
| रेनॉल्ड परेरा | ५०/- |
| डिक्सी परेरा | ५०/- |
| आयवी परेरा | ५०/- |
| प्रायमस परेरा | ५०/- |
| गिल्बर्ट परेरा | ५०/- |
| शिला परेरा | ५०/- |
| मेल्वीन परेरा | ५०/- |
| झेवीयर वाझ | ५०/- |
| आयडा परेरा | ५०/- |
| रुपाली डॉनल परेरा | ५०/- |
| सचीन परेरा | ५०/- |
| स्वीटसन परेरा | ५०/- |
| मार्तीन परेरा | ५०/- |
| उर्मिला परेरा | ५०/- |
| सिंथोल फर्नांडीस | ५०/- |
| गिल्बर्ट कोलासो | ५०/- |
| ऑस्टीन परेरा | ५०/- |
| डॉल्सी परेरा | ५०/- |
| लिवीया परेरा | ५०/- |
| वायलेट परेरा | ५०/- |
| लुकस परेरा | ५०/- |
| वेरोणिका परेरा | ५०/- |
| भारती परेरा | ५०/- |
| जोसेफ परेरा | ५०/- |
| आग्नेलो परेरा | ५०/- |
| अनिल परेरा | ५०/- |
| ब्रिन्स्टन परेरा | ५०/- |

**अंतोन डिमेलो, नंदाखाल**

| | |
|---|---|
| ॲन्ड्र्यू जॉन डिब्रिटो | १००५/- |
| फिलीपा जॉन डिमेलो | ५५०/- |
| रॉयल सि. परेरा | २००/- |
| क्लमेंट सि. परेरा | २००/- |
| बेंजामीन लुईस रॉड्रिग्ज | २००/- |
| अनामिक | २००/- |
| रोजी अंतोन डिमेलो | १००/- |
| इग्रेशियस डॉ. रॉड्रिग्ज | १००/- |
| आलेक्स विन्सेंट डिमेलो | १००/- |
| सुनीता जोजेफ कोरीया | १००/- |
| सिसीलीया फ्रान्सिस रूमाव | १००/- |
| अनामिक | ५०/- |
| एलायस थॉमस डिमेलो | ५०/- |
| लेस्ली बा. रॉड्रिग्ज | ५०/- |

*- (उर्वरित नावे आगामी अंकात)*

**सहामाही स्मृती**



**ख्रिस्तवासी फादर झेवियर जोजेप (झुजू) अथाईड**
कौलार, सालोली, सांडोर (वय वर्षे : ७२)
मृत्यू : १३/०१/२०२६
सहा महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक १२/०७/२०२६
सकाळी ७.३०वाजता, सांडोर चर्च.

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू आमच्या फादरांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी मार्गारेट फ्रान्सिस कार्लोस**
कोकरमवाडी, दिघा, पापडी
जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

**In Loving Memory of**



**Late Eric Francis Pereira**
New Giriz, Opp. Talao, Giriz
D.O.B : 19/10/1941; D.O.D. : 11/06/2026
Month's Mind Mass : Sunday 12/07/2026
7.00 a.m. at St. Francis Xavier Church, Giriz

***"Blessed are those who mourn, for they will be comforted."*** (Mathew 5:4)

May your soul rest in eternal peace!

**Wife : Margaret; Son's: Vivian, Clayton; Daughter-In-Law : Karuna, Shalini; Grandchildren's: Karina, Carissa & Sierra**

**दोन वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी दुमीबाई पास्कोल कोलासो**
गोखिवरे
मृत्यू : १९/०७/२०२४

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कोलासो कुटुंबीय**

## पाच वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी निकिता नॉर्मन लेमॉस

नागभाट, चवरीवाडी, सांडोर

जन्म : ११/०३/१९९२; मृत्यू : ०९/०७/२०२१

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या निकिताला सदैव सुखी ठेव,*
*हीच तुजचरणी विन्रम प्रार्थना!*

**मम्मी-डॅडी : साधना व नॉर्मन लेमॉस; सिस्टर हिल्डा व कुटुंबीय**

नागभाट, सांडोर (चवरीवाडी)

# ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक - ११

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | | | ४ |
| ५ | | | X | X | X | X | |
| | X | X | X | ६ | | ७ | X |
| X | ८ | | | | X | ९ | १० |
| ११ | X | X | X | X | X | X | |
| १२ | | | १३ | | १४ | | X |
| | X | X | | X | | X | १५ |
| X | १६ | | | X | X | १७ | |

**आडवे शब्द :-** १) निंबोणीच्या झाडामागे, चंद्र झोपला गं बाई; केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर; नाविका रे वारा वाहे रे, नाना करते प्यार... असे नानाविध मनाला स्पर्श करणारे गीत गाणाऱ्या सुप्रसिद्ध पार्श्वगायिका ××× ××××× ह्यांचे नुकतेच निधन झाले (८)

५) श्रेष्ठ, थोर, उत्कृष्ट, उत्तम प्रकांड ××× (३)

६) रोहिणी, शुद्ध रक्तवाहिनी शीर ××× (३)

८) जसे, महात्मा गांधी राजघाट, डॉ. आंबेडकर चैत्यभूमी, राजेन्द्र प्रसाद महापधनघाट, तसे पंडित नेहरू ह्यांचे समाधी स्थळ ×××× (४)

९) ज्योतिषशास्त्रात आकाशातील ताऱ्यांच्या समूहाला ××म्हणतात (२)

१२) नामवंत लेखक जॉन गोन्साल्वीस ह्यांचे नुकतेच ××××× ×× हे पुस्तक प्रकाशित झाले. (७)

**रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस**
उमराळे

१६) साधू संन्यासी, योगी ××× (३)

१७) राघू, पोपट ×× (२)

**उभे शब्द :-** १) फूल, पुष्प, कुसुम ××× (३)

२) मोठा, विशाल ×× (२)

३) ख्रिस्ती जोगीण ×× (२)

४) खून, लहू, शोणित, रूधिर ×× (२)

६) पैसा, संपत्ती ×× (२)

७) ×× हा ताड, माड (नारळ), शिंदी किंवा खजूर ह्यांसारख्या वृक्षांच्या फुलोऱ्यातून, सूर्योदयापूर्वी काढलेला एक गोड आणि पारदर्शक रस आहे ×× (२)

१०) थंड, गार ×× (२)

११) लिव्हर ××× (३)

१३) कांतिमय, प्रकाशमान, ओजस्वी ××× (३)

१४) शिखा, ज्वाला, अग्नी, दिवटा ×× (२)

१५) क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील छोटे राज्य ×× (२)

**‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक -१०चे उत्तर**

**आडवे शब्द :-** १) सात हिंदोळ्याची बय ६) दर ७) बारावी १०) हानी ११) राव १२) पावन १३) उसनवार १५) हित १८) रात्र २०) राजेश खन्ना २२) स्तवन.

**उभे शब्द :-** १) सातबारा उतारा २) हिंदवी ३) दोर ४) चीज ५) यवनी ८) रावस ९) वावर १२) पावा १४) नम्र १६) तमन्ना १७) पाश १९) त्रस्त २०) रान २१) खर्च.

## हास्यरंग

### धडक

सुरेशच्या टेम्पोला एका ट्रकने मागून जोरात धडक दिली.

दीपक : अरे, जे होणार होते, ते होऊन गेले. तो ट्रकवाला तुझ्या टेम्पोला धडक देऊन गेलासुद्धा! पण तू अजूनही इतका भयभीत का आहेस?

सुरेश : अरे मित्रा, त्या ट्रकच्या मागे लिहिले होते, ‘फिर मिलेंगे...’

* * * *

### टाइमपास

सर : जो वर्गात निव्वळ टाइमपास करायला येतो त्याने उभं राहावं. खूप वेळ झाला तरी वर्गातील कुणीच उभे राहत नाहीत, म्हणून थोड्या वेळाने बंडू उभा राहतो.

सर (रागाने) : काय रे बंडू, तू वर्गात टाइमपास करायला येतो का?

बंडू : नाही सर, पण खूप वेळ झाला, तुम्ही एकटेच उभे आहात म्हणून मला बरं नाही वाटलं!...

### नाव मोठं

दीपक : आपल्या नावाप्रमाणे लोक वागतातच असं नाही.

राजेश : एखादं उदाहरण दे बघू!

दीपक : यार, बिल गेट्स जरा विचित्रच माणूस वाटतो मला.

राजेश : तो का?

दीपक : नाव गेट्स आहे आणि तयार करतो विंडोज.

* * *

### परीक्षेची प्रश्नपत्रिका

पुण्याच्या एका स्टेशनरी दुकानावर पाटी लावलेली असते, ‘परीक्षेशी संबंधित सर्व साहित्य येथे उपलब्ध आहे.’

ती वाचून बाळूने दुकानदाराला विचारले, “काका, प्रश्नपत्रिका मिळेल काय?”

दुकानदार : ती फक्त मोटेगावकर सरांकडेच मिळते.

# लक्ष्य : श्रद्धा आणि नीतिमत्त्व मानवतेसाठी

एक होते गाव. स्पर्धेसाठी प्रसिद्ध होते. दरवर्षी आगळ्यावेगळ्या स्पर्धा असायच्याच. स्पर्धेचे रूपांतर कधी-कधी चुरस, आरोप-प्रत्यारोप व हाणामारीत होत असे. तरीसुद्धा, गावकऱ्यांमध्ये स्पर्धेची खुमखुमी काही ओसरत नसे. मागचे सारे विसरून परत, प्रत्येक वर्षी, स्पर्धेला उभे. अशी जगावेगळी 'खिलाडूवृत्ती' आणि कल्पनेपलीकडच्या विषयांवर स्पर्धा आयोजित करणे हा त्या गावचा खाक्या होता...

एके वर्षी आयोजकांनी 'धावण्याची स्पर्धा' घोषित केली, बेडकांची स्पर्धा 'Frog Marathon'. अजब स्पर्धा. उलट-सुलट चर्चा झाली. नेहमीप्रमाणे पाठिंबा व विरोध सुरू झाला. नाना प्रकारे चर्वित-चर्वण झाले. फायद्या-तोट्याचे गणित मांडण्यात आले. विविध प्रकारे कारणमीमांसा झाली. आयोजकांच्या मूळ हेतूंवर बोट ठेवले गेले, 'ह्यांना बेडूक मारायचे आहेत, बेडकांचा सूप प्यायचा आहे', 'हे पर्यावरणविरोधी' इ. पण त्यांच्या आडकाठीला जुमानतो कोण?



ठरल्या दिवशी गावकऱ्यांनी पोसलेले बेडूक रस्त्यावर उतरले, 'डरांव', 'डरांव' करू लागले. सारा रस्ता भरून गेला. बेडूक धावत होते, पळत होते. आयोजकांची त्रेधा-तिरपीट उडत होती. पण करणार काय? अनेक बेडूक थकले, थांबले, बेशुद्ध झाले. काही बेडूक मेलेसुद्धा. पण स्पर्धा थांबली नाही. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांच्या टाळ्या, प्रोत्साहन, आधार ह्यांमुळे बेडकांची स्पर्धा रंगली आणि ईप्सित स्थळी पोहोचली.

शेवटी, एक बेडूक शेवटपर्यंत टिकला, जिंकला. सर्वांनी त्याचे हार-तुरे घालून अभिनंदन केले, सन्मान केला; विरोधाला न जुमानता घेतलेल्या सहभागाबद्दल प्रशंसा केली. स्पर्धा जिंकल्याबद्दल गौरव केला नि सत्काराला उत्तर देण्याची संधी दिली. बोलायला सांगितले पण विजेता बेडूक काही बोलेना. परत-परत प्रश्न विचारले, ''तुला धावण्याची कधीपासून सवय?'', ''तुझी प्रेरणा कोण?'', 'आणखीन अशा स्पर्धा आयोजित कराव्या का?'' इ.

आयोजकांना प्रश्न पडला, असे का बरे व्हावे? इतका विरोध, टीका, बदनामी स्वीकारून हा बेडूक जिंकला. काहीतरी गुपित असावे? जगासाठी नाही, पण किमान गावकऱ्यांसाठी तरी काही 'संदेश' त्याने द्यावा ही त्यांची माफक अपेक्षा होती. म्हणून त्यांनी एका प्राणितज्ज्ञाला बोलावले, त्याचा सल्ला घेतला तेव्हा कळले, विजेता बेडूक मुका व बहिरा होता; त्याने ना कुणाचे ऐकले की तो न वादात पडला, म्हणून तो ईप्सित ध्येय गाठू शकला.

ध्येय गाठण्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती लागते, वैचारिक स्पष्टता हवी असते. कष्ट-त्याग-चिकाटी अत्यावश्यक असते. लक्ष्य प्राप्त झाले आहे अशा बालंबाल खात्रीने झोकून द्यावे लागते, झिजावे लागते, झटावे लागते. प्रसंगी, प्राणार्पणाची तयारी ठेवावी लागते. मानापमान-पद-प्रतिष्ठा ह्यापेक्षा 'श्रद्धा व नीतिमत्ता' (Faith & Morals) ह्यांना झुकते माप द्यावे लागते. आशा-आकांक्षा मनी बाळगून, महत्त्वाकांक्षांना काबूत ठेवावे लागते.

श्रद्धा असेल तर धर्म समजतो आणि धर्मामुळे श्रद्धा मजबूत होते. अर्थात, त्यासाठी आपापल्या धर्माचा अभ्यास करणे क्रमप्राप्त असते. 'धा धारयति इति धर्मः।'' म्हणजे धारण करतो, एकत्र करतो, दिव्यत्वाचे दर्शन घडवतो तो धर्म. संस्कृत मधील 'धर्म' ह्या शब्दाचा दुसरा अर्थ 'कर्तव्य' हासुद्धा होय. त्यामुळे कोणताही धर्म दुसरा माणूस, अन्य धर्म व देश-परदेश ह्यांच्या विरुद्ध असू शकत नाही. ह्यालाच आपण 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणतो.

धर्म हा आपल्या आईसारखा असतो. आपल्या आईवर प्रत्येकाचे प्रेम असते. त्याप्रमाणेच इतरांच्या आईवर त्यांचे त्यांचे प्रेम असते. त्यामुळे शहाणा माणूस इतरांच्या आईचा देखील मान-सन्मान करतो. तद्वत, स्वतःच्या धर्माप्रमाणे इतरांच्या धर्माचा, त्यांच्या रीतिरिवाजांचा आदर करणे अपेक्षित असते. ते वृत्ती-प्रवृत्तींतून प्रकट होते. नीतिमत्ता ही आपल्या श्रद्धेची, धर्माची दुसरी बाजू होय. माणसांनी माणसांना माणसांप्रमाणे वागवणे म्हणजे नीतिमत्त्व.

सरतेशेवटी, मानवी जीवनाचे लक्ष्य सुख-समाधान-शांती होय. त्यामध्येच मानवी जीवनाचे साफल्य असते. श्रद्धा आणि नीतिमत्त्व ह्यांच्याद्वारे मानवधर्माचे रक्षण-संरक्षण-संवर्धन होते तेव्हा... समजावे की आपण सामूहिक हितासाठी (Common Good) धर्म पाळतो, आपल्याला ह्या जगात पाठवताना सोपविलेले कर्तव्य करतो आणि परमेश्वराची, म्हणजे त्याच्या परमप्रिय गरीब-गरजवंत-उपेक्षित जनांसह, एकाच देवाची लेकरे बनतो.

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

# उपासना वर्ष दिनदर्शिका : जुलै २०२६

**वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष**

१. आमोस ५:१४-१५,२१-२४
स्तोत्र ५०:७-१३,१६-१७
मत्तय ८:२८-३४

२. आमोस ७:१०-१७
स्तोत्र १९:८-११
मत्तय ९:१-८

३. **संत थॉमस - भारताचा प्रेषित - सोहळा**
प्रे.कृ. १०:२४-३५
स्तोत्र ४२:२-३;४३:३-४
१पेत्र १:३-९
योहान २०:२४-२९

४. **पोर्तुगालची संत एलिझाबेथ - स्मृती**
आमोस ८५:९,११-१४
मत्तय ९:१४-१७

५. **सामान्यकाळ १४वा रविवार**
जखऱ्या ९:९-१०
स्तोत्र १४५:१-२,८-९, १०-११,१३-१४
रोम ८:९,११-१३
मत्तय ११:२५-३०

६. **संत मारिया गोरेटी - स्मृती**
होशेय २:१४-१६,१९-२०
स्तोत्र १४५:२-९
मत्तय ९:१८-२६

७. होशेय ८:४-७,११-१३
स्तोत्र ११५:३-१०
मत्तय ९:३२-३८

८. होशेय १०:१-३,७-८,१२
स्तोत्र १०५:२-७
मत्तय १०:१-७

९. होशेय ११:१-४; ८-९
स्तोत्र ८०:२-३,१५-१६
मत्तय १०:७-१५

१०. होशेय १४:१-९
स्तोत्र ५१:३-४,८-९, १२-१४,१७
मत्तय १०:१६-२३

११. **संत बेनेडिक्ट-स्मृती**
यशया ६:१-८
स्तोत्र ९३:१-२,५
मत्तय १०:२४-३३

१२. **सामान्यकाळ १५वा रविवार**
यशया ५५:१०-११
स्तोत्र ६५:१०-१४
रोम ८:१८-२३
मत्तय १३:१-२३

१३. यशया १:१०-१७
स्तोत्र ५०:८-९,१६-१७, २१,२३
मत्तय १०:३४-११:१

१४. यशया ७:१-९
स्तोत्र ४८:२-८
मत्तय ११:२०-२४

१५. **संत बोनाव्हेंचर-स्मृती**
यशया १०:५-७,१३-१६
स्तोत्र ९४:५-१०,१४-१५
मत्तय ११:२५-२७

१६. **कार्मेल मातेचा सण**
यशया २६:७-९,१२, १६-१९
स्तोत्र १०२:१३-१५, १६-१८, १९-२१
मत्तय ११:२८-३० किंवा
जखऱ्या २:१०-१३
स्तोत्र : लूक १:४६-५५
मत्तय १२:४६-५०

१७. यशया ३८:१-६,२१-२२, ७-८
स्तोत्र ३८:१०-१२,१६
मत्तय १२:१-८

१८. मीखा २:१-५
स्तोत्र १०:१-४,७-८,१४
मत्तय १२:१४-२१

१९. **सामान्यकाळ १६वा रविवार**
प्रज्ञाग्रंथ १२:१३,१६-१९
स्तोत्र ८६:५-६,९-१०, १५-१६
रोम ८:२६-२७
मत्तय १३:२४-४३

२०. मीखा ६:१-४,६-८
स्तोत्र ५०:५-६,८-९, १६-१७,२१,२३
मत्तय १२:३८-४२

२१. मीखा ७:१४-१५,१८-२०
स्तोत्र ८५:२-८
मत्तय १२:४६-५०

२२. **संत मेरी माग्दालेना-सण**
गीतरत्न ३:१-४
स्तोत्र ६३:२-६,८-९
योहान २०:१-२,११-१८

२३. यिर्मया २:१-३,७-८, १२-१३
स्तोत्र ३६:६-११
मत्तय १३:१०-१७

२४. यिर्मया ३:१४-१७
स्तोत्र : यिर्मया ३१:१०-१३
मत्तय १३:१८-२३

२५. **संत याकोब (जेम्स) प्रेषित-सण**
२करिंथ ४:७-१५
स्तोत्र १२६:१-६
मत्तय २०:२०-२८

२६. **सामान्यकाळ १७वा रविवार**
१राजे ३:५,७-१२
स्तोत्र ११९:५७,७२,७६-७७ १२७-१३०
रोम ८:२८-३०
मत्तय १३:४४-५२

२७. यिर्मया १३:१-११
अनुवाद ३२:१८-२१
मत्तय १३:३१-३५

२८. **संत अल्फोन्सा-स्मृती**
यिर्मया १४:१७-२२
स्तोत्र ७९:८,९,११,१३
मत्तय १३:३६-४३

२९. **संत मार्था, मरिया व लाझरस - स्मृती**
१योहान ४:७-१६
स्तोत्र ३४:२-११
लूक १०:३८-४२

३०. यिर्मया १८:१-६
स्तोत्र १४६:१-६
मत्तय १३:४७-५३

३१. **संत इग्नेशिअस लोयोला-स्मृती**
यिर्मया २६:१-९
स्तोत्र ६९:५,८-१०,१४
मत्तय १३:५४-५८

## ऑगस्ट २०२६

१. **संत आल्फोन्सस लिगोरी-स्मृती**
यिर्मया २६:११-१६,२४
स्तोत्र ६९:१५-१६,३०-३१, ३३-३४
मत्तय १४:१-१२

२. **सामान्यकाळ १८वा रविवार**
यशया ५५:१-३
स्तोत्र १४५:८-९,१५-१८
रोम ८:३५,३७-३९
मत्तय १४:१३-२१
,

३. यिर्मया २८:१-१७
स्तोत्र ११९:२९,४३,७९-८० ९५, १०२
मत्तय १४:२२-३६

४. **संत जॉन मारी व्हियानी-स्मृती**
यिर्मया ३०:१-२,१२-१५, १८-२२
स्तोत्र १०२:१६-२१,२९, २२-२३
मत्तय १५:१-२,१०-१४

५. यिर्मया ३१:१-७
स्तोत्र : यिर्मया ३१:१०-१३
मत्तय १५:२१-२८ किंवा
प्रकटीकरण २१:१-५
स्तोत्र : यहुदीथ १३:१८-१९
लूक ११:२७-२८

६. **प्रभू येशूचे रूपांतर-सण**
दानिएल ७:९-१०,१३-१४
स्तोत्र ९७:१-२,५-६,९
२पेत्र १:१६-१९
मत्तय १७:१-९

७. नहूम १:१५;२:२;३:१-३,६-७
स्तोत्र : अनुवाद ३२:३५-३६, ३९, ४१
मत्तय १६:२४-२८

८. **संत डॉमनिक-स्मृती**
हबक्कूक १:१२-२:४
स्तोत्र ९:८-९,१०-१३
मत्तय १७:१४-२०




JEWEL OF CHIRABAZAR
MK JEWELLERS
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124 | Fax : 022 - 2206 5421
Email : mkshahjewellers@gmail.com
HALLMARK JEWELLERY 100%
जिथे प्रत्येक दागिना सांगतो
गुणवत्ता आणि विश्वासाची गोष्ट
प्रत्येक स्त्रीच्या सौंदर्याला परिपूर्ण स्पर्श
Dear Customer Please Save Our Mob No 7718019981 to your Contact List & get Daily updates of New Collection & Prices
OUR NEW LANDMARK
Now Facing Kalbadevi Metro Station
WE HAVE NO BRANCH AT VIRAR, VASAI & MUMBAI
Our Showroom is Very Nearby Marine Lines Station (Mumbai)
Valet Parking Available

RNI MAHMAR - 11692 / 1960




हे मासिक, मालक, मुद्रक, सुवार्ता ट्रस्ट ह्यांनी मॅन्युएल प्रिन्ट, वालीव फाटा, सातिवली, ता. वसई, जि. पालघर -४०१ २०८ महाराष्ट्र येथून छापून सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, जि. ४०१ २०१ येथून प्रकाशित केले. संपादक : फा. डॉ. जोएल डिकुना.